ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

मूल्य ८० रुपये

जुलै २०११

## महाराष्ट्र २०२०



## बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन, शिकागो विशेषांक

पुढील दहा वर्षांत महाराष्ट्र अव्वल क्रमांक गाठेल – पृथ्वीराज चव्हाण


कमी वेळेत जास्त काम करण्याची आवश्यकता – सुरेश प्रभू

पन्नास वर्षांत गमावलेलं पुढील दहा वर्षांत कमावू या – कुमार केतकर

TATA CHEMICALS

TATA



Living, Industry and Farm Essentials.

With the mission of "Serving Society through Science",

Tata Chemicals is focused on driving sustainability in all its offerings around LIFE- Living, Industry, and Farm Essentials, across its global operations spanning four continents.

We harness the fruits of science for goals that go beyond business and uphold a commitment to sustainable development that has a direct bearing on the welfare of the communities we serve and the

www.twitter.com/TataChemicals www.facebook.com/TataChemicals www.linkedin.com/company/tata-chemicals

www.tatachemicals.com

Tata Chemicals Europe Tata Chemicals North America

Tata Chemicals Magadi Tata Chemicals South Africa Tata Chemicals (Soda Ash) Partners

THE POWER of one



Incredible !ndia
MAHARASHTRA
unlimited
MAHA RAJA
As you take your first step on the white sands of Tarkarli, the palm trees sway and bow in submission, promising you breeze that caresses your skin and runs through your hair softly, fondly. The clear blue sky beckons and as you keep walking, you realize that the cool water has spread a blue carpet at your feet. The gurgle of the sea announces your arrival on this beach to the world - and yet, your kingdom has an abundance of everything but people. Your Excellency may feel refreshed – but the service is not through yet. Welcome to Maharashtra, an experience that's truly unforgettable.
Diveagar
Ganpatipule
Tarkarli
Ganpatipule
Tarkarli
Diveagar
*Destinations marked on the map are only for demonstration purposes
Website: www.maharashtratourism.gov.in
Tel: 91-22-22845678
MAHARASHTRA TOURISM



ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# रुची

**जुलै २०११, बृहन्महाराष्ट्र अधिवेशन, शिकागो**
**वर्ष ३० वे, मूल्य ८० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
या अंकाचे अतिथी संपादक : **राजीव खांडेकर**
मुखपृष्ठ : **उदय पटवर्धन**
मांडणी : **योगिता मोरे**
वितरण व्यवस्था : **सुदेश हिंगलासपूरकर**
**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला, टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर, ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
☎ २३८९ २४ ४५ ● फॅक्स : २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर(प), मुंबई ४०० ०२८ ☎ २४४७ ४८ ४३
Email - granthali01@gmail.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

## अनुक्रम

### महाराष्ट्र २०२०

पुढील दहा वर्षांत महाराष्ट्र अव्वल क्रमांक गाठेल / ९
पृथ्वीराज चव्हाण
कमी वेळेत जास्त काम करण्याची आवश्यकता / १७
सुरेश प्रभू
पन्नास वर्षांत गमावलेलं पुढील दहा वर्षांत कमावू या / २१
कुमार केतकर

### अन्य लेख

**लोकपाल की लोकइच्छा!** / २७
प्रफुल्ल पाठक
**रवींद्रनाथांची विश्वात्मक रूपे** / ३२
कुमार नवाथे
**आगे, परदेपर देखिए** / ४५
अरुण पुराणिक
**'थिंक महाराष्ट्र' प्रगतीची पावले** / ५१
दिनकर गांगल
**रयतेचे दिवस** / ५४
नरेंद्र पटवारी
**जन्मजात बहिरेपणावर उपाय** /५७
लतिका भानुशाली
**टेलरमेड जीन्स** / ६३
डॉ. उज्ज्वला दळवी
**मराठी अभ्यासकेंद्र : एक आवाहन** / ७१
दीपक पवार

# विशेषांकाच्या निमित्ताने

◆ *अरुण जोशी*

**साधारण** पाच दशकांपूर्वी अमेरिकेत आताच्या अनिवासी मराठींची पहिली पिढी पोचली. गेल्या चार दशकांत बरीच मंडळी तिथे स्थिरावली, तर गेल्या वीस वर्षांत कॅलिफोर्नियाचा कोकण झाला! आपली सांस्कृतिक भूक आणि जन्मभूमीची ओढ यातून तिथे विविध उपक्रम रुजले. बृहन्महाराष्ट्र मंडळाची सुरुवात तीस वर्षांपूर्वी झाली. तेव्हापासून दर दोन वर्षांनी त्याचं अधिवेशन अमेरिकेतल्या वेगवेगळ्या ठिकाणी भरतं. 'मराठी तिथे मराठी पुस्तक' असं स्वप्न पाहिलेल्या ग्रंथालीस यापासून दूर राहणं शक्य नव्हतं. १९९३ सालच्या बाल्टिमोर अधिवेशनात सुदेश हिंगलासपूरकर प्रथम 'ग्रंथाली'ला अमेरिकेत घेऊन गेले तेव्हापासून सातत्यानं ते जात आहेत. या दहा अधिवेशनांचं वैशिष्ट्य म्हणजे या काळात दरवेळी 'ग्रंथाली'च्या कुठल्यातरी अनिवासी मराठी लेखकाचं पुस्तक त्या त्या अधिवेशनात प्रसिद्ध झालं. त्याची सुरुवात बृहन्महाराषट्र मंडळाचे एक संस्थापक यशवंत कानिटकर यांच्या 'येईल तो दिन माझा' या पुस्तक प्रकाशनानं झाली. त्यानंतर डॉ. प्रकाश लोथे, अनुराधा गानू, विजय सबनीस, सुधीर कुलकर्णी, सुधीर आंबेकर, लता देशपांडे, ललिता गंडभीर, रवींद्र गोडसे, विद्या हर्डीकर-सप्रे, विद्युल्लेखा अकलूजकर, गजानन सबनीस, भूषण केळकर, संध्या कर्णिक, रोहिणी द्रविड, स्मिता भागवत, डॉ. विजय जोशी-जयश्री जोशी, राकेश भडंग, अरुण जातेगावकर, वासंती जातेगावकर असे अनेक लेखक 'ग्रंथाली'साठी लिहिते झाले. स्मिता भागवत यांच्या 'मातृभूमी सेवा ट्रस्ट'च्या सहकार्यातून यातील काहींची पुस्तकं प्रसिद्ध झाली. 'ग्रंथाली' अमेरिकेत रुजली आणि तिथे रुजलेल्यांचं विचारधन महाराष्ट्रात.

शिकागो येथील अधिवेशनात तीच परंपरा कायम राहिली आहे. विद्या हर्डीकर-सप्रे यांचं 'संवादने', प्रगती कोळगे यांचं 'मनातल्या वावटळी', स्मिता भागवत यांची 'तेजस्विनी', 'परक्या भूमीवर घर' आणि गजानन सबनीस यांच्या 'ही आपलीच माणसं' या पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद ही पुस्तकं प्रसिद्ध होत आहेत.

प्रत्येक अधिवेशनासाठी 'ग्रंथाली'च्या 'रुची' मासिकाचा विशेषांक प्रसिद्ध झाला. या वर्षी शिकागो येथे हे संमेलन होत आहे. विवेकानंदांनी भारतीयत्वाची मोहोर उमटवली ते हे ठिकाण. आज, महाराष्ट्रातून तिथे पोचलेल्यांनी व इथे महाराष्ट्रात

2020

असलेल्यांनी काय ठसा उमटवला हे पाहताना, महाराष्ट्र स्थापनेची पहिली पंचवीस वर्षं मनोहारी असली तरी पुढची मात्र 'आहे मनोहर तरी!' अशी आहेत. त्याचा आढावा 'महाराष्ट्र २०२०' या विभागात घेत आहोत.

मराठी माणसाला लढल्याशिवाय काही मिळालं नाही. भाषावार प्रांतरचना झाल्यानंतर संयुक्त महाराष्ट्र संघर्षातूनच निर्माण झाला. यशवंतराव चव्हाणांनी १९६० साली त्याचा मंगलकलश आणला. सांस्कृतिक-सामाजिक भान असलेल्या महाराष्ट्राच्या या पहिल्या द्रष्ट्या मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाची स्वप्नं पाहिली. त्या दृष्टीनं कारभार चालवला. स्थापनेपासून रौप्यमहोत्सवी वर्षापर्यंत महाराष्ट्र देशात अग्रेसर राहिला. या काळातही संकटं होतीच. १२ जुलै १९६१ रोजी पानशेत धरण फुटून हाहाकार माजला. त्याला पन्नास वर्षं होत आहेत. कोयना भूकंपानं हादरा दिला. दुष्काळातून मार्ग काढावा लागला. तरी महाराष्ट्र मागे पडला नव्हता. पुढच्या पंचवीस वर्षांत त्याला ओहोटी लागायला सुरुवात झाली. महाराष्ट्रातली आणीबाणी वाढत गेली, ती वाढत्या अनास्थेतून. लातूर-किल्लारीचा भूकंप, नागोठण्याचा पूर, मुंबईतील बॉम्बस्फोट मालिका, २६ जुलैचं पावसाचं थैमान, २६/११चा दहशतवादी हल्ला असे नैसर्गिक आणि मानवी आघात पुढच्या पंचवीस वर्षांनी झेलले, तरी जनता त्यात खंबीरपणे उभी राहिली. मात्र याच पंचवीस वर्षांत राजकीय दिवाळखोरीनं महाराष्ट्राला अधिक खोलात ढकललं. आज सुवर्णमहोत्सव साजरा करताना हाती कथलाचा वाळा उरल्याची खंत कुठेच जाणवत नाही. इतकं निर्ढावलेपण सुसंस्कृत म्हणवणाऱ्या आणि पुरोगामित्वाची झूल पांघरणाऱ्या महाराष्ट्रात आलं आणि विवेकाचाच दुष्काळ लांबत गेला.

या पार्श्वभूमीवर 'स्टार माझा' वाहिनीचे राजीव खांडेकर यांनी २०२० साली महाराष्ट्र कसा असेल, कसा असावा यासाठी व्हिजन डॉक्युमेंट तयार व्हावं म्हणून विविध विषयांवर, विविध प्रांतांतल्या, विविध क्षेत्रांतल्या विचारवंतांना बोलतं केलं. त्यात महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांसह पत्रकार, अर्थतज्ज्ञ, कलावंत, लेखक आदींचा सहभाग होता. हा उपक्रम जाणीवसंपन्न विचारांतून प्रकट झाला होता. त्यामुळे हा विशेषांक तयार करताना त्याचं संपादकत्व स्वीकारायची विनंती राजीव खांडेकर यांना केली व त्यांनी ती मान्यही केली. त्यांचं विशेष संपादकीय आणि मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, सुरेश प्रभू व कुमार केतकर यांनी 'महाराष्ट्र २०२०'बद्दल मांडलेले विचार या अंकाचा प्रमुख विषय आहे. 'रुची'चे अन्य लेख नेहमीप्रमाणे आहेतच.

'ग्रंथाली'नं संस्कृतिकरणाचा वसा घेतला. त्यातून विविध उपक्रम आणि नवजाणिवांचं प्रकाशन यातून बदलता महाराष्ट्र दिसत राहिला. आता डोळ्यांवरचं कातडं दूर सारून पुढील काळासाठीच्या व्हिजन डॉक्युमेंटमध्ये सहभागी होऊ या.

**– अरुण जोशी**

## शिकागो अधिवेशनात प्रसिद्ध होत आहेत...


**विद्या हर्डीकर-सप्रे** यांचं **'संवादने'**

**प्रगती कोळगे** यांचं **'मनातल्या वावटळी'**


**स्मिता भागवत** यांची **'तेजस्विनी'** आणि **'परक्या भूमीवर घर'**


**गजानन सबनीस** यांच्या **'ही आपलीच माणसं'** या पुस्तकाचा **इंग्रजी अनुवाद**







बृहन्महाराष्ट्र
मंडळ
अधिवेशन,
शिकागो

# महाराष्ट्राला दृष्ट लागली?

## संपादकीय

*राजीव खांडेकर*

**महाराष्ट्र** मेला तरी राष्ट्र मेले, मराठ्याविना राष्ट्रगाडा न चाले.. असं सेनापती बापट यांनी ज्याचं वर्णन केलं होतं त्या महाराष्ट्र राज्याचा सुवर्णमहोत्सव नुकताच कसाबसा पार पडला. ना राज्यकर्त्यांमध्ये त्याबाबत कसला उत्साह होता ना जनतेमध्ये कसलं चैतन्य! कसातरी आपला रडतखडत, जीवावर आल्यासारखा हा सुवर्णमहोत्सवाचा सांगतासमारंभ पार पडला. सुवर्णमहोत्सवाची सुरुवात झाल्यापासून तो संपेपर्यंतच्या वर्षभरात या एवढ्या मोठ्या उपलब्धीची कुठे हलकीशी चाहूलही लागली नाही. सगळ्याच आघाड्यांवर सामसूम.

मोठा संघर्ष करून स्वतंत्र महाराष्ट्राचं स्वप्न आपण साकार केलं. अवघ्या पन्नास वर्षांत त्यावेळच्या सगळ्या भावना हवेत विरून गेल्याचं प्रत्यंतर आल्यानं मन फारच अस्वस्थ झालं. प्रत्येक आघाडीवर प्रकर्षानं जाणवणारी अनास्था मनाला आणखी उदास करून गेली. १९६० मध्ये महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर लगेचच राज्याचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण यांचं सांगलीमध्ये जाहीर व्याख्यान झालं होतं. त्यामध्ये ते म्हणाले होते, 'आज सगळ्या वातावरणात आनंद भरून राहिलाय, सगळं काही मनासारखं घडताना दिसतंय, पण त्यामुळेच मन कातरही झालंय. कुठल्याशा अनामिक भीतीनं व्याकूळ होतंय. मनात सारखी कुशंका येतेय, माझ्या महाराष्ट्राला दृष्ट तर लागणार नाही ना?'

यशवंतरावांनी भावनेच्या भरामध्ये बोलून दाखवलेली भीती गेल्या पन्नास वर्षांमध्ये आपण सगळ्यांनी मिळून, आपल्या कर्मानं सार्थ करून दाखवल्याची खंत आज मनाला डाचतेय. पुन्हा पुन्हा स्वतःलाच प्रश्न विचारावासा वाटतोय, माझ्या महाराष्ट्राला खरंच दृष्ट लागली नाहीये ना?

अन्यथा, या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये प्रत्येक मराठी माणसाच्या मनात उत्साह आणि जल्लोषच असायला हवा होता. विविध आघाड्यांवर महाराष्ट्रानं केलेल्या प्रगतीचा अभिमान ओसंडून वाहायला हवा होता. सहकाराच्या क्षेत्रात, शेतीच्या क्षेत्रात गेल्या पन्नास वर्षांत केलेल्या प्रगतीच्या खुणा गावोगावी दिसताहेत. त्यानं मनामध्ये समाधानाची भावना दाटून यायला हवी होती. पण त्याऐवजी नैराश्य आणि

2020

खंतावलेपणाच भरून गेलाय... असं का झालंय...?

पन्नास वर्षांपूर्वी इथल्या चार कोटी जनतेनं अनेकांचा आणि साक्षात पंडित नेहरूंचा विरोध असतानाही संयुक्त महाराष्ट्राचं स्वप्न पाहिलं आणि संघर्ष करून, रक्त सांडून ते प्रत्यक्षातही उतरवलं. त्यामागची प्रेरणा ही होती की, राज्याला हर क्षेत्रामध्ये गरूडभरारी घेण्यास आपल्याला मोकळीक मिळेल. अर्थकारण, राजकारण, समाजकारण, साहित्य, कला या प्रत्येक क्षेत्रामध्ये जिथे आहोत तिथून आणखी पुढे, आणखी उंचीवर जाता येईल. नव्या राज्याचा पाळणा हलवताना पहिले मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाणांनी केलेली भाषणं वाचली तरी त्यामध्ये जनमानसाच्या या साऱ्या इच्छा-आकांक्षांचं स्वरूप नेमकेपणानं ध्यानात येईल. चौफेर प्रगती करणाऱ्या मराठी माणसाला आपलं वारू तेव्हा चौखूर उधळायचं होतं. प्रत्येक क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी करायची होती. नवनवी क्षेत्रं पादाक्रांत करायची होती. विकासाची गंगा गावागावापर्यंत पोहोचवायची होती. विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र यांच्यात एकजिनसीपणा निर्माण करायचा होता. गरीबाचा जीवनस्तर उंचावून त्याला श्रीमंताच्या अधिक जवळ न्यायचं होतं, भेदाभेद नाहीसे करायचे होते, जातीयता तर समूळ नष्ट करायची होती. खूप स्वप्नं होती आणि खूप अपेक्षाही होत्या. प्रत्यक्षात काय झालं ते आज आपल्यासमोर आहे. पन्नास वर्षांपूर्वी जिथं होतो, तिथूनही खाली जाण्याची आणि असलेलं स्थान गमावून बसण्याची पाळी महाराष्ट्रावर आली.

तेव्हाच्या राजकारणावर नजर टाकली तर आपल्या लक्षात येईल की, तत्कालीन राजकीय पटलावर मराठी माणसांचा देशव्यापी दबदबा होता. राजकीय विचारधारा कोणतीही असो, मराठी माणसाच्या शब्दाला मान होता. मग ते डाव्या विचारसरणीचे कॉम्रेड डांगे किंवा  कॉम्रेड रणदिवे असोत, समाजवादी विचारांचे मधू लिमये असोत, हिंदुत्ववादी विचारांचे गोळवलकरगुरुजी असोत की काँग्रेसचे आध्यात्मिक गुरू विनोबा भावे! या नेत्यांचं श्रेष्ठत्व देशपातळीवर मान्य होतं. त्यांच्या शब्दाला वजन होतं. जे राजकीय क्षेत्रामध्ये तेच उद्योगाच्या बाबतीतही होतं. मराठी उद्योजकांना भले टाटा, बिर्लाएवढी मजल मारता आली नसेल, पण किर्लोस्कर, बजाज, गरवारे, वालचंद, आपटे या मराठमोळ्या उद्योजकांचा देशव्यापी लौकिक होता. टाटा, बिर्लानंतर त्यांच्याच शब्दाला औद्योगिक क्षेत्रात मान होता.

महाराष्ट्राच्या साहित्य विश्वामध्ये तेव्हा फडके-खांडेकरांचा दबदबा होता. त्यांच्याच बरोबरीनं अत्रे, भावे, माडगूळकर, शिरवाडकर, अण्णाभाऊ अशा प्रतिभावंतांचं गारूड मराठी माणसाच्या मनावर होतं. त्यांच्या श्रेष्ठत्वाचा डंका फक्त महाराष्ट्रातच वाजत होता असं नाही, तर त्याचे प्रतिध्वनी राज्याबाहेरही उमटत होते. तेंडुलकर, नेमाडे, चित्रे यांच्या साहित्याला बहर येण्याचा काळही याच वेळेस सुरू झाला. सिनेमा आणि संगीताच्या क्षेत्रात तर तोवर महाराष्ट्रानं नवे मापदंड निर्माण केले होते. दादासाहेब फाळकेंनी सिनेसृष्टीचा पाया रचला त्यावर व्ही. शांताराम, मास्टर विनायक, भालजी अशा दिग्गजांनी कळस चढवला होता. वसंत देसाई, सी. रामचंद्र आणि मंगेशकर कुटुंब तोवर भारतीय सिनेसंगीताचा अविभाज्य भाग बनले होते. नाटक, चित्रकला, शिल्पकला या क्षेत्रातही महाराष्ट्राचा तितकाच रुबाब होता.

अपेक्षा अशी होती की, महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर या प्रत्येक क्षेत्रातील महाराष्ट्राची कामगिरी आणखी आणखी उज्ज्वल होत जाईल. मोकळ्या मनानं श्वास घेणाऱ्या महाराष्ट्राचे पुत्र प्रत्येक क्षेत्रामध्ये अशा उंचीवर पोहोचतील ज्याकडे साऱ्या देशाला मान वर करूनच पाहावं लागेल. दुर्दैवानं, हेच घडलं नाही. आज महाराष्ट्राकडे नेतृत्वच उरलं नाही. ना अर्थकारणात, ना राजकारणात, साहित्य-कला-संस्कृतीच्या विश्वात! आज महाराष्ट्रातला असा कोणता विचारवंत आहे जो साऱ्या देशाला दिशादर्शन करू शकेल? आज असा राजकीय नेता आहे, ज्याचा शब्द कानात साठवून ठेवण्यासाठी देशातली जनता आतूर आहे? असा कोण मराठी लेखक किंवा कवी आहे का, ज्याच्या शब्दांची जादू भारतभर चालेल? प्रत्येक प्रश्नाचं उत्तर नकारार्थीच आहे. संपूर्ण देशाला कवेत घेऊ शकेल असं कोणतंच नेतृत्व आजघडीला मराठी माणसाकडे नाही ही आजच्या महाराष्ट्राची शोकांतिका नाही तर दुसरं काय?

कोणी म्हणेल, सहकाराच्या क्षेत्रात, शेतीच्या क्षेत्रात गेल्या पन्नास वर्षांमध्ये जी जबरदस्त कामगिरी झाली, त्याकडे कसं काय दुर्लक्ष कराल? शिक्षणाचं सार्वत्रिकीकरण झाल्याचा फायदा हजारो गावांत लाखो शाळा निघण्यात झाला आणि त्यानं कोट्यवधी विद्यार्थ्यांचा लाभ झाला. या सगळ्या प्रगतीच्या खुणा राज्यभर, गावागावांत दिसत आहेत. खरं आहे, सहकार आणि शेतीक्षेत्रातल्या नवनव्या प्रयोगांनी ग्रामीण महाराष्ट्रामध्ये समृध्दी आली आहे. मोठमोठ्या ब्रॅन्ड्सच्या वस्तूंना छोट्या छोट्या शहरातही वाढती मागणी आहे. लोकांच्या हातात भरपूर पैसा आला आहे. पण बारकाईनं विचार केला की, या

सगळ्या समृद्धीची फळं कुणाला मिळत आहेत, ग्रामीण भागात प्रचंड प्रमाणात आलेला हा पैसा नेमका कुणाच्या हातात पडला आहे आणि ज्यांच्या हातात तो आला आहे, त्यांनी तो कसा मिळवला आहे, तर अस्वस्थता वाढीला लागते.

कारण गावागावातील वास्तव हे आहे की, तिथले राजकारणी आणि त्यांचे बगलबच्चे यांच्या हातात संपत्तीचं केंद्रीकरण झालं आहे. गावातला, तालुक्यातला किंवा जिल्ह्यातला सर्वात श्रीमंत माणूस हा या ना त्या पक्षाचा नेता आहे आणि त्यांची ही श्रीमंतीही गेल्या पन्नास वर्षांची कमाई आहे. या वास्तवाला एकही जिल्हा किंवा तालुका अपवाद नाही. प्रत्येक गावात, प्रत्येक तालुक्यात आणि प्रत्येक जिल्ह्यामध्ये राजकारणाशी संबंधित माणसांचीच एवढी प्रगती कशी झाली या प्रश्नाचं उत्तर शोधणं हे आपल्याला अवघड आहे काय? भ्रष्ट मार्गानं ही प्रचंड कमाई केली गेली आणि राजकारण्यांनी विधिनिषेध बाजूला ठेवून, लोकांसाठीच्या पैशानं स्वतःची घरं भरून घेतली.

याचा परिणाम असा झाला की, महाराष्ट्राचे सारे प्रश्न होते तिथेच राहिले, ग्रामीण महाराष्ट्रातलं जीणं आणखी खराब होऊन गेलं. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाला गेल्या पन्नास वर्षांत ना चांगले रस्ते मिळाले, ना वीज मिळाली, ना उत्तम आरोग्याची सेवा मिळाली ना पिण्याचं पाणी! ज्या स्वातंत्र्यासाठी एवढं रक्त आटवलं, ते मिळाल्यावर पिण्याचं पाणी आणण्यासाठी घरातल्या बायाबापड्यांना दोन-दोन, चार-चार मैल वणवण करावी लागणार असेल तर बाकीच्या गोष्टींबद्दल बोलायची सोयच नाही. आज आपल्याकडच्या शिक्षणाची स्थिती काय आहे? ग्रामीण भागात शाळा आहे तर शिक्षक नाही, शिक्षक आहे तर इमारत नाही, इमारत आहे तर शाळेपर्यंत पोहोचण्यासाठी रस्ता नाही! सार्वजनिक आरोग्याची परिस्थिती यापेक्षा वेगळी नाही. डॉक्टर आहे तर औषध नाही, औषध आहे तर डॉक्टर नाही आणि दवाखाना आहे तर दोन्ही नाहीत! गोरगरीब माणसं असहाय्य आणि असं उपेक्षेचं जीणं जगत असताना त्यांचं पुढारीपण करणारे या प्रश्नांबद्दल पूर्ण उदासीन... या विषयांशी आपला काहीच संबंध नाही, असं मानून कंत्राटं घेण्यात आणि मिळेल त्या मार्गानं माल उकळण्यात मश्गूल... !!

शहरी भागाची स्थिती यापेक्षा फारशी वेगळी नाही. पक्ष बदलले तरी नेते तसेच आपमतलबी; आणि प्रश्न बदलले तरी सर्वसामान्य माणसाची होणारी उपेक्षा आणि अवहेलना तशीच उबग आणणारी... याच मंडळींच्या कर्तबगारीनं महाराष्ट्र आज स्वतःचा विश्वास गमावून बसलाय, न्यूनगंडानं पछाडलाय... त्याचा भक्कम पाया उखडल्यासारखा झालाय. पन्नास वर्षांपूर्वी देशातील सर्वात प्रबळ राज्य असणारा हा महाराष्ट्र याच्या-त्याच्या पुण्याईच्या जोरावर लटकताना दिसतोय. शेजारचा गुजरात, बाजूचे कर्नाटक, आंध्र प्रदेश, तिकडचे तामिळनाडू, हरयाणा बघताबघता आपल्या बरोबरीला आल्याचं किंवा पुढे गेल्याचं पाहतोय हा महाराष्ट्र...

ही परिस्थिती अस्वस्थ करणारी असली तरी हरवून टाकणारी नाही. कारण गेल्या काही वर्षांपासून जवळजवळ प्रत्येक क्षेत्रातच आशेचे नवे किरण दिसू लागले आहेत. मग ते अण्णा हजारे असोत, आशुतोष गोवारीकर वा मधुर भांडारकर असो की कविता राऊत, तेजस्विनी सावंत... आता गरज आहे ती यशवंतरावांच्या पाऊलवाटेनं चालू पाहणाऱ्या एखाद्या सुजाण, सृजनशील आणि स्वच्छ चारित्र्याच्या राजकीय नेत्याची. नव्या पिढीच्या राजकारण्यांतून एखादा तरी तसा उपजेल तर मग लटकता महाराष्ट्र पुन्हा स्थिर पायावर उभा राहील. ही परिस्थिती येण्यासाठी कदाचित पुढची पन्नास वर्षं प्रतीक्षा करण्याची गरज नाही. त्याआधीच ती निर्माण झालेली असेल.

अर्थात, हा आशावाद म्हणजे फक्त भाबडेपणा नाही. महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त 'स्टार माझा'नं राज्यातल्या प्रमुख शहरात पुढच्या दहा वर्षांच्या महाराष्ट्राचं स्वप्न पाहिलं. २०२० मधला महाराष्ट्र कसा असेल, कसा असावा यासाठीचं एक व्हिजन डॉक्युमेंट या निमित्ताने तयार करण्यासाठी मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद अशा प्रमुख शहरांत दिवसभराची चर्चासत्रं आयोजित करून त्यामध्ये पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यासाठीचे व्हिजन तयार करण्याचा प्रयत्न करून पाहिला गेला. महाराष्ट्राच्या विविध क्षेत्रांत आघाडीवर असलेल्या आणि विचार करू शकणाऱ्या मान्यवरांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. आपापल्या भागासाठीचं आणि संपूर्ण महाराष्ट्रासाठीचं संपूर्ण व्हिजन त्यांनी मांडलं. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू आणि महाराष्ट्रातील एक प्रमुख विचारवंत कुमार केतकर या मान्यवरांचे लेख या अंकात देत आहोत. या अपेक्षेसह, की पन्नास वर्षांत ज्या चुका झाल्या त्या पुढच्या दहा वर्षांत सुधारल्या जातील आणि सगळं काही संपायच्या आधी पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या क्षितिजावर भाग्यरेखा उमटेल.

**- राजीव खांडेकर**
(मुख्य संपादक, स्टार माझा)
rajivk@starnews.co.in




मराठीत प्रथमच

डॉ. नरेंद्र जाधव लिखित, अनुवादित-संपादित
रवींद्रनाथ टागोर समग्र जीवनदर्शन घडवणारी ग्रंथ-त्रयी




भयशून्य चित्त जेथ...
अनुवाद व संपादन
डॉ. नरेंद्र जाधव




रवींद्रनाथ टागोर :
युगनिर्माता विश्वमानव
डॉ. नरेंद्र जाधव




रवींद्रनाथ टागोर :
समग्र साहित्यदर्शन
अनुवाद व संपादन डॉ. नरेंद्र जाधव

हार्ड बाउंड, बॉक्ससह ही ग्रंथ–त्रयी केवळ १२०० रुपयांत! टपालखर्च (भारतात) १०० रु. वेगळा पाठवावा.

बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन, शिकागो

# पुढील दहा वर्षांत महाराष्ट्र अव्वल क्रमांक गाठेल

◆ *पृथ्वीराज चव्हाण*

**राष्ट्रपतींच्या अभिभाषणापासून डॉ. मनमोहन सिंग यांच्या वक्तव्यापर्यंत पाहिलं तर, हे दशक असं आहे की बौद्धिक क्षमतेवर आपली अर्थव्यवस्था उभारायचे प्रयत्न केले पाहिजेत असा तो संदेश आहे. महाराष्ट्रात आपण त्या दृष्टीनं पावलं टाकतोय का? तर दुर्दैवानं त्याचं उत्तर नाही असं द्यावं लागेल. प्रत्येक क्षेत्रात जे राज्याला आणि देशाला दिशा देऊ शकतील असे थॉट लीडर्स निर्माण केले पाहिजेत. आज हे फार मोठ्या प्रमाणावर होताना दिसत नाही.**




**महाराष्ट्राच्या** निर्मितीला पन्नास वर्षं होऊन गेलेली आहेत. महाराष्ट्र पुढे जाईल की मागे सरकेल? महाराष्ट्र हे लोकसंख्येच्या आणि क्षेत्रफळाच्या दृष्टीने देशातलं दुसऱ्या क्रमांकाचं राज्य आहे. सर्वसाधारणपणे ते प्रथम क्रमांकाचं राज्य आहे असं समजलं गेलेलं आहे. ते आज कुठल्या क्रमांकावर आहे आणि पुढच्या दहा वर्षांमध्ये खाली जाईल का आणि ते पुढे कसं आणायचं, याच्याबद्दल आपणा सर्वांना विचार करायचा आहे. महाराष्ट्रामध्ये प्रचंड पोटेन्शियल आहे हे कुणीही नाकारू शकणार नाही. गेल्या पन्नास वर्षांमध्ये निश्चितच महाराष्ट्रानं किमान सुरुवातीच्या काही वर्षांमध्ये तरी देशाला वैचारिक नेतृत्व दिलं. महाराष्ट्रातल्या अनेक विचारवंतांनी नवीन सामाजिक संकल्पना मांडल्या. त्या देशभर स्वीकारल्या गेल्या. उदाहरणं द्यायची असतील, तर आपण सहकारी चळवळीतून ग्रामीण महाराष्ट्र उभा केला. विशेषत: पश्चिम महाराष्ट्रामध्ये तरी निश्चितच झाला. आपण स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदेची संकल्पना मांडली. राजीव गांधींनी पुढे त्याला मूर्त स्वरूप दिलं. ७३ आणि ७४ व्या घटना दुरुस्ती केली. महाराष्ट्रानं रोजगारहमीसारखा क्रांतिकारक, कामाचा हक्क देणारा कायदा केला. त्याचंही देशानं अनुकरण केलं. महिला धोरण पहिल्यांदा महाराष्ट्रानं राबवलं आणि अगदी अलीकडच्या काळातलं उदाहरण घ्यायचं झालं तर माहितीच्या अधिकाराचा कायदादेखील देशाच्या आधी अण्णा हजारेंच्या प्रयत्नांमुळे महाराष्ट्रानं २००२ साली केला.

पण अलीकडच्या काळामध्ये महाराष्ट्रातल्या विचारवंतांची संख्या किती आहे? आज महाराष्ट्र पुन्हा देशाला वैचारिक नेतृत्व देतोय की नाही असा विचार केला तर चिंतेचं वातावरण मला दिसतंय. मग त्यामध्ये समाजशास्त्राचा विषय सोडला तर राजकीय विचार आपण मांडतो की नाही, कला क्षेत्रामध्ये आपण कोठे आहोत, क्रीडा क्षेत्रामध्ये आपण कोठे आहोत? एक सचिनचं नाव सोडलं तर मला वाटतं आपण फार पुढे नाही. आपण आंतरराष्ट्रीय कीर्तीचे सचिनसारखे किती खेळाडू

निर्माण केलेत किंवा कलाक्षेत्रामध्ये आंतरराष्ट्रीय कीर्तीचे किती कलावंत आहेत? बॉलिवूडचं नक्कीच नाव आहे, लोकप्रियता आहे आणि परदेशातही लोकप्रियताही मिळायला लागली आहे, पण बॉलिवूड म्हणजे सर्व कलाक्षेत्र निश्चितच नाही. मग तत्त्वज्ञान असेल, समाजशास्त्र असेल, विज्ञान असेल– बाळ फोंडकेंनी काही नावं घेतली. अनिल काकोडकर, रघुनाथ माशेलकर, आजच्या ४०–४५ वयोगटातली या सर्व क्षेत्रातली मंडळी जर आपण पाहिली तर आज महाराष्ट्र देशाचं वैचारिक नेतृत्व करत नाही ही दु:खद अशी गोष्ट आपल्याला मान्य करावीच लागेल.

गुजरात आणि चीनचा इथं उल्लेख झाला. आजही महाराष्ट्र दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत दुसरा आहे. अर्थात चीनची राजकीय परिस्थिती वेगळी असल्यानं त्यांना झपाट्यानं जलद प्रगती करता आली. त्यांनी आर्थिक सुधारणा आपल्या दहा–बारा वर्षं आधीच करायला सुरुवात केली. अर्थव्यवस्था खुली केली. एका बाजूला खुली अर्थव्यवस्था आणि दुसऱ्या बाजूला कम्युनिस्ट पक्षाची हुकूमशाही अशी एक आगळीवेगळी पद्धत राबवली. त्याचा त्यांना निश्चित फायदा झाला. सरासरी विकासदर हा जवळजवळ ऐंशीपासून दहा टक्क्यांच्या वर असल्यामुळे चीन आपल्या फार पुढे गेलेला आहे ही परिस्थिती नाकारून चालणार नाही. २००४ पासून जेव्हा युपीए सरकार आलं तेव्हा भारताच्या ज्ञात इतिहासात कधीही नव्हता इतका विकासदर ८.५ ते ९ टक्के सलग आपण मिळवलेला आहे. आपण देशात आणि राज्यांमध्येही आर्थिक क्षमता मिळवलेली आहे. त्यामुळे विकास करून परिस्थिती बदलण्याची थोड्याफार प्रमाणात ताकद निर्माण झालेली आहे. महाराष्ट्र राज्याचा विकासदरही देशाच्या विकासदरापेक्षा जास्त आहे. पुढच्या दहा वर्षांमध्ये आपलं दरडोई आर्थिक उत्पन्न किमान चौपट करावं लागेल आणि ते करणं काही अवघड नाही. त्याकरता आपल्या सर्वांना प्रयत्न करावे लागतील.

आज महाराष्ट्र जर दुसऱ्या क्रमांकाचं राज्य असलं, आणि आहेच, तर कुठल्याही मूल्यांकांच्या बाबतीत आपण तिसऱ्या, चौथ्या किंवा आठव्या क्रमांकावर का आहोत? म्हणजे अगदी पहिल्या नसलो तरी दुसऱ्या क्रमांकावर असलोच पाहिजे. म्हणून मानव विकास निर्देशांक असेल किंवा इतर जे विकासाचे निकष असतील; शासनानं असं पाहिलं पाहिजे, समाजातले जे विचारवंत आहेत त्यांनी पाहिलं पाहिजे की कुठल्या कुठल्या बाबतीत या सरासरीपेक्षा पहिल्या–दुसऱ्या क्रमांकाच्या खाली आहोत. काही ठिकाणी खूप लाजिरवाणी अशी परिस्थिती आहे. उदाहरणार्थ, दर हजार पुरुषांच्या मागे मुलींची संख्या घटत आहे. महाराष्ट्राच्या दृष्टीनं हे लाजिरवाणं आहे. एका बाजूला तंत्रज्ञानाचा विकास होतोय तर दुसऱ्या बाजूला दुष्परिणामही आपल्याला जाणवतात. परंतु बऱ्याच बाबतींमध्ये आपण निश्चितपणे आघाडीवर आहोत आणि ही आघाडी टिकवून देशामध्ये पहिल्या–दुसऱ्या क्रमांकावर आपल्याला राहिलं पाहिजे. पहिल्याच क्रमांकावर राहिलं पाहिजे आणि हे शक्य आहे. देशाचा आणि राज्याचा विकास करायचा झाला आणि देशाला आपण महाशक्ती करायचा म्हणतोय, एक आर्थिक शक्ती होणार आहे असं आपण भाकीत करतोय, पण ते नैसर्गिक साधनांच्या आधारावर होणार नाही. आखाती देशांतील तेल इतकं प्रचंड आहे की काही न करता ती जगातील श्रीमंत राष्ट्रं म्हणून पुढे आलेली आहेत. अमेरिका असेल, चीन असेल, रशिया असेल इतका प्रचंड भूभाग आहे आणि इतकी प्रचंड नैसर्गिक संपदा आहे की तिचा त्यांना प्रचंड फायदा मिळालेला आहे. अगदी इंग्लंडसारखं राष्ट्रसुद्धा साम्राज्य मिळाल्यानंतर त्याची परिस्थिती बदलली. नॉर्वेसारखा छोट्याशा लोकसंख्येचा देश आहे. इतकं तेल आहे की दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत पहिल्या–दुसऱ्या क्रमांकामध्ये नॉर्वेचा क्रमांक आहे. आपल्याला ते करता येणार नाही. नैसर्गिक संपदेच्या बाबतीमध्ये अगदी अलीकडच्या काळातलं उदाहरण घेतलं असता कोळसा आणि लोह खनिज सोडलं तर बाकी सगळ्या खनिजांच्या बाबतीत आपण दरिद्री आहोत. तेल तर नाहीच. मोठ्या प्रमाणावर तेल आपल्याला आयात करावं लागतं. ही टक्केवारी दरवर्षी एखाद्या टक्क्यानं वाढतेय आणि त्यामुळे नैसर्गिक संपदेवर आपल्याला महान आर्थिक शक्ती होता येणार नाही. हे शक्यच नाही.

आपल्याला जर महाशक्ती व्हायचं असेल तर ती बौद्धिक कौशल्यावर आपण करू शकलो तर होणार आहे. ते करता येण्याची थोडीशी झलक आपल्याला दिसली ती आयटीमध्ये. आयटी उद्योगामध्ये जगासमोर एक प्रचंड अडचण उभी राहिली, वाय टु केचा प्रॉब्लेम जेव्हा उभा राहिला तेव्हा भारतातल्या इंजिनीयर आणि सॉफ्टवेअर तंत्रज्ञांनी सबंध जगाच्या मदतीला जाऊन वेळेवर सॉफ्टवेअरमध्ये परिवर्तन केलं. त्यामुळे कोठे काही अपघात

झाला नाही, विमानं पडली नाहीत आणि पहिल्यांदा भारताच्या बौद्धिक क्षमतेची ओळख जगाला झाली. किमान आयटी क्षेत्रात तरी खूप मोठ्या प्रमाणात आपण पुढे चाललेलो आहोत. पण जर आपल्या बौद्धिक कौशल्यावर, बौद्धिक क्षमतेवर महासत्ता उभी करायची असेल तर अजून आपण फार मागे आहोत. केंद्र शासनाच्या मार्फत प्रयत्न चालले आहेत. डॉ. मनमोहन सिंग यांनी आपल्याला एक आव्हान दिलेलं आहे. गेल्या वर्षी त्यांनी, हे जे दशक आहे ते डिकेड ऑफ इनोव्हेशन असेल असं घोषित केलं. अगदी राष्ट्रपतींच्या अभिभाषणापासून डॉ. मनमोहन सिंग यांच्या वक्तव्यापर्यंत पाहिलं तर, हे दशक असं आहे की बौद्धिक क्षमतेवर आपली अर्थव्यवस्था उभारायचे प्रयत्न केले पाहिजेत असा तो संदेश आहे. महाराष्ट्रात आपण त्या दृष्टीनं पावलं टाकतोय का? तर दुर्दैवानं त्याचं उत्तर नाही असं द्यावं लागेल. शेवटी निश्चित गोष्ट अशी आहे की आज जमिनीकरता होणाऱ्या मारामाऱ्या असतील, पाण्याकरता होणारे वाद असतील किंवा वाळू काढायची असेल तर काय चाललं आहे ते आपण सर्व पाहतोय. नैसर्गिक संपदेच्या दरडोई वाटपाचं आपण जर पाहिलं तर त्यावर आपली प्रगती किंवा आर्थिक महाशक्ती होण्याची स्वप्नं आधारता येणार नाहीत. पुढच्या दहा वर्षांमध्ये मनुष्य बळाचा विकास करण्याकरता काय केलं पाहिजे? आपण संख्यात्मक शिक्षण पसरवलंय, कॉलेजेस काढलेली आहेत, दर दोन किमी अंतरावर शाळा काढल्या. सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून खूप भौतिक प्रसार केलाय. परंतु जी गुणवत्ता पाहिजे ती अजून निर्माण होऊ शकली नाही आणि त्याकडे आपलं दुर्लक्षच आहे. आज शिक्षणाकडे पाहताना आपण किती शिक्षकांना नोकरी देऊ शकतोय, शिक्षकांना नोकरी देताना कॉमन एन्ट्रन्स परीक्षा घ्यायची की जिल्हावार द्यायची की काय करायचं याचाच विचार करतोय. गुणवत्ता वाढवण्याच्या दृष्टीने आपण खरे प्रयत्न करत नाही आहोत. ते जर नाही केलं तर इतर राज्यं आपल्याला मागे टाकतील अशी परिस्थिती आहे. कारण काही राज्यांनी या दृष्टीनं पावलं टाकलेली आहेत आणि त्यातूनच मग निर्माण होतील देशाला आणि राज्याला नेतृत्व देणारे. फक्त राजकीय नेतृत्वानं हे होणार नाही.

हे काम फक्त मुख्यमंत्री किंवा उपमुख्यमंत्र्यांकडूनच किंवा निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या माध्यमातूनच होईल असं नाही. तर प्रत्येक क्षेत्रात जे राज्याला आणि देशाला दिशा देऊ शकतील असे थॉट लीडर्स निर्माण केले पाहिजेत. आज हे फार मोठ्या प्रमाणावर होताना दिसत नाही. हे जर करायचं असेल तर काही मूलभूत परिवर्तन आपल्याला करावं लागेल.

अर्थव्यवस्थेच्या संदर्भात विचार केला तर सुरेश प्रभूंनी चिंता व्यक्त केलीय की महाराष्ट्रावर खूप मोठं कर्ज आहे. महाराष्ट्राचं कर्ज आणि हमी विचारात घेतली तर दोन लक्ष बत्तीस हजार कोटी रुपयांचं कर्ज आहे, मात्र पण ते काही फार नाही. कर्ज हे नेहमी आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या किती टक्के आहे ते पाहिलं जातं आणि त्या टक्केवारीच्या किमान सीमेच्या कमी असेल तर त्यामध्ये काहीच वावगं नाही. आज आपण घर विकत घ्यायचं असेल तर कर्ज काढतो. गाडी घेतली तर हप्त्यानं घेतो. देशाचं आणि राज्याचंही असंच आहे. देशावर असलेल्या कर्जाचा विचार केल्यास ते देखील याच टक्केवारीच्या प्रमाणात आहे. कर्जाच्या बाबतीत मला काही चिंता नाही. ते परत करण्याची आपली क्षमता आहे आणि कर्ज घेऊन आपल्याला काही प्रकल्प राबवायचे आहेत, ते आपण करतोय.

औद्योगिक क्षेत्राचा विचार केल्यास. या क्षेत्रातल्या जगातल्या मोठ्या मोठ्या कंपन्या महाराष्ट्रात येऊ इच्छितात. आपण त्यासाठी काही प्रोत्साहन योजना राबवल्या आहेत. त्या असोत नसोत, तरीदेखील मोठ्या मोठ्या कंपन्या यायला लागल्या आहेत. जगातल्या सर्वांत मोठ्या व्यापारी ट्रक बनवणाऱ्या कंपनीशी सामंजस्य करार झाला. जगातली सर्वांत मोठी अशी कंपनी अमेरिका किंवा जपानमध्ये नसून चीनमध्ये आहे. चीनमधली ही कंपनी महाराष्ट्रात प्रकल्प उभारत आहे. आपल्याकडे युरोपमधल्या बऱ्याच कंपन्या येत आहेत, काम करताहेत आणि त्या समाधानी आहेत. मी ज्या ज्या कंपन्यांशी बोललोय त्या महाराष्ट्रातल्या औद्योगिक वातावरणाबद्दल समाधानी आहेत. काही कटकटी आहेत. कटकटी काय आहेत तर जमीन मिळत नाही, पाणी मिळत नाही. आणि म्हणून जी नैसर्गिक साधनं आहेत त्यांचं न्याय्य वाटप करण्याकरता आपल्याला गंभीर विचार करावा लागणार आहे. नुकतीच विधानसभेमध्ये पाण्याच्या वाटपाबद्दल खूप चर्चा झाली की पाण्यावर कुणाचा हक्क असला पाहिजे. सुरेश प्रभूंनी पाण्यावर खूप काम केलेलं आहे. पुढच्या लढाया पाण्यासाठी होतील असं भाकीत सर्वांनी केलेलं आहे आणि तसं चित्र आता आपल्याला दिसायला लागलेलं आहे. उद्योग वाढवावे लागतील आणि त्याशिवाय पर्याय नाही.

आज जवळजवळ ६० टक्के लोक शेतीवर, प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष कृषी अर्थव्यवस्थेवर आपल्या उपजीविकेसाठी निर्भर आहेत. परंतु एकूण अर्थव्यवस्थेत शेतीचा वाटा फक्त ११-१२ टक्के इतकाच आहे. परंतु इतक्या मोठ्या प्रमाणावर लोक शेतीवर अवलंबून असल्यामुळे शेतीच्या विकासावर, शेतीच्या उत्पादकतेवर, शेतीच्या शास्त्रोक्त पाण्याच्या व्यवस्थापनावर आपल्याला गंभीर विचार करावा लागणार आहे. दुर्दैवानं शेतीवरचं संशोधन देशातच संपलेलं आहे. शेतीची विस्तार सेवा होती तीही संपुष्टात आली. कृषी महाविद्यालयांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर संशोधन चाललंय असं नाही. नवीन बियाणं शोधणं, नवीन प्रजाती काढणं यामध्ये बरंचसं नैराश्य आलेलं आहे.

उच्च शिक्षणाच्या बाबतीत सर्वच राज्यं उदासीन आहेत. केंद्रानं निधी पाठवला तरच मोठी विश्वविद्यालयं निघतात अन्यथा निघत नाहीत. म्हणून विज्ञानक्षेत्रात थॉट लीडर्स निर्माण व्हावेत यासाठी राष्ट्रीय स्तरावर नवीन तीस-चाळीस महाविद्यालयं काढली. त्यामध्ये आयआयटी-सारख्याच नामवंत संस्था पुढच्या चार-पाच वर्षांत निर्माण झालेल्या आपल्याला दिसतील. हे सगळं केंद्र सरकारनं केलं. आपण राज्य सरकार म्हणून किंवा राजकीय इच्छाशक्ती म्हणून त्यामध्ये काही गुंतवणूक करत नाही. म्हणून एका बाजूला रोजगारनिर्मितीचा विचार करताना शेतीवरचा भार कमी करणं आवश्यक आहे. कारण शेतीची दरडोई उपलब्धता कमी व्हायला लागलेली आहे. प्रत्येक पिढीला रान वाटलं तर दरडोई शेती कमी कमी होत जाते हे आपल्या सर्वांना माहिती आहे. शेतीवरचा बोजा कमी करायचा असेल तर सेवाक्षेत्राला आणि उद्योगक्षेत्राला त्याचा भार उचलावा लागेल. सेवा-क्षेत्रासाठी शिक्षणाचा दर्जा खूपच चांगला पाहिजे. कुणी एमबीए, कुणी आयटी इंजिनीयर झालं पाहिजे. तरच त्या क्षेत्रामध्ये शिरकाव करता येईल. पण ग्रामीण भागातल्या कमी शिकलेल्या युवकांसाठी उद्योगाशिवाय पर्याय नाही. उद्योग निघाले पाहिजेत. मग ते लघु उद्योग, मोठे उद्योग किंवा विशाल प्रकल्प असतील. त्याला जमीन पाहिजे, पाणी पाहिजे आणि वीज पाहिजे. वीज सर्वांना हवी आहे, पण वीज-निर्मितीचे प्रकल्प आमच्या भागात नको अशी लोकांची मानसिकता झालीय. कोळशावर वीज प्रकल्प तर नकोच नको, पण स्वच्छ वीज निर्मिती प्रकल्पालाही किती विरोध होतोय ते आपण पाहतोय. विजेच्या बाबतीत एकंदरीत महाराष्ट्रात चित्र समाधानकारक आहे. पुढच्या वर्षीअखेरपर्यंत भारमुक्त महाराष्ट्राची प्रतिज्ञा प्रत्यक्षात साकारेल. बाळ फोंडकेंनी दरडोई विजेच्या वापराचा प्रश्न उपस्थित केला होता. महाराष्ट्रात विजेचा वापर ९५० युनिट्सइतका आहे. जगाची सरासरी २८००-२९०० युनिट्स इतकी आहे. जगाच्या सरासरीची बरोबरी करायची असेल तर आपल्याला वीज-निर्मितीची क्षमता चौपट करावी लागेल. आज आपल्या देशात सुमारे एक लाख पासष्ट हजार मेगावॉट इतक्या वीजनिर्मितीची क्षमता आहे. चीनमध्ये सात लक्ष मेगावॉटइतकी वीज निर्मितीक्षमता आज आहे आणि चीन दरवर्षी एक लक्ष मेगावॉट वीजनिर्मितीची क्षमता निर्माण करतो आहे. आपण पुढच्या पाच वर्षांत एक लक्ष मेगावॉट वीजनिर्मिती क्षमता उभारायची किंवा नाही यावर वाद चालला आहे. जयराम रमेशांनी इतकी वीजनिर्मिती क्षमता आपल्याला उभारता येणार नाही असा नकारात्मक विचार मांडलेला आहे. एकीकडे दरवर्षी सात लक्ष युनिट वीजनिर्मिती करणारा चीन आणि एक लक्ष पासष्ट हजार मेगावॉट वीजनिर्मिती करणारा आपला देश यांच्यात तुलना करतोय. आपल्याला किती पुढे जायचंय याची कल्पना केली पाहिजे. नैसर्गिक संपदेचं न्याय्य वाटप आपल्याला करावंच लागेल आणि त्याकरता आपण एका बाजूला खाजगीकरण करतोय, बीओटी तत्त्वावर प्रकल्प उभे करतोय.

या सर्व खाजगीकरणाच्या प्रक्रियेमध्ये एक लेव्हल प्लेईंग फिल्ड आपण तयार केलं पाहिजे आणि या सर्व प्रक्रियेमध्ये एक निष्पक्षपाती अंपायर निर्माण केला पाहिजे ज्याला इकॉनॉमिक रेग्युलेटर म्हणतात. तो जर नसेल तर यात क्रोनी कॅपिटॅलिझम व्हायची शक्यता आहे. आता अनेक क्षेत्रांमध्ये आपण पाहतोय की काही प्रकरणं पुढे यायला लागली आहेत. या ठिकाणी हेदेखील नमूद केलं पाहिजे की आरटीआयच्या कायद्यामुळे ही सर्व प्रकरणं उघडकीस येत आहेत. जो कायदा २००५ साली युपीए सरकारनं केला, त्या कायद्याचे परिणाम आपल्याला दिसायला लागलेले आहेत. पाश्चिमात्य देशांमध्ये जिथे भांडवलशाही अर्थव्यवस्था आहे तिथे ही प्रक्रिया होऊन गेलेली आहे. क्रोनी कॅपिटॅलिझमला रोखण्यासाठी देश आणि राज्यपातळीवर आपल्याला आर्थिक नियामक मंडळं स्थापन करावी लागतील. वीजक्षेत्रात नियामक मंडळ निर्माण केलं तिथं चांगला परिणाम दिसून येतोय, तिथं शिस्त आलेली दिसतेय. महाराष्ट्रात पाण्याच्या बाबतीत आपण नियामक मंडळ तयार केलं, पण

अलीकडच्या काळात त्याची क्षमता काढून घेतली, ताकद काढून घेतली आणि उलट्या दिशेनं पाऊल टाकलेलं आहे. अनेक क्षेत्रांत, मग ते वाहतूक असेल, हवाई उड्डाण असेल, कोळसा असेल किंवा पेट्रोल, त्यावर नियंत्रणासाठी कोणतंच नियामक मंडळ नाही. हे प्रश्न देश पातळीवर सोडवावे लागतील. खऱ्या अर्थानं अर्थव्यवस्था पुढे न्यायची असेल तर हे आपल्याला करावंच लागेल. अन्यथा अडचणी निर्माण होतील हे गेल्या काही काळात उघडकीस आलेल्या प्रकरणांवरून दिसतंय.

शेतीच्या बरोबरच वाढत्या नागरीकरणाच्या समस्या देखील गंभीर आहेत. राज्याचं निम्म्यापेक्षा अधिक नागरीकरण झालेलं आहे. देश खेड्यात राहतो हे म्हणणं महाराष्ट्राच्या बाबतीत धाडसाचं ठरेल. शहरीकरण म्हटलं की मुंबईचे प्रश्न इतर महानगरांपेक्षा वेगळे आहेत असं नाही. तिथंही अशाच प्रकारच्या समस्या निर्माण झालेल्या आहेत. उदाहरणार्थ, खूप मोठ्या प्रमाणावर असलेली झोपडपट्टी. परवडणाऱ्या घरांच्या बाबतीत काही चांगले निर्णय घेतले पण ते काही अमलात येऊ शकलेले नाहीत आणि आता नियम बदलून ज्या चुका झालेल्या असतील त्या दुरुस्त करून पुढे जायचं आहे. वाहतुकीचे प्रश्न गंभीर आहेत. त्याकरता मेट्रो रेल तसंच मोनो रेल उभारणीसाठी प्रयत्न केला, तसंच एक्स्प्रेस-वे निर्माण केले. मुंबईची एक विशिष्ट रचना आहे. रुंदी नसल्यामुळे जे पर्याय दिल्लीला किंवा चेन्नईला किंवा कोलकात्याला आहेत ते मुंबईला उपलब्ध नाहीत. म्हणून कदाचित कोस्टल रोडसारखा पर्याय जर दिला, सीआरझेड गाईडलाईन्स मुंबईकरता विशेष आणल्या. त्यात आपले काही प्रश्न सुटले. पण त्यात रोड ऑन स्टिल्ट्स असा शब्द वापरला आहे. समुद्रकिनाऱ्यावर एका खांबावर रस्ता बांधू शकता, पण ते अतिशय अव्यवहार्य आहे असं मी जयराम रमेश यांना सांगितलं. समुद्रात भर टाकून चार-पाच पदरी रस्ता बांधला आणि त्यालगत जर प्रॉमनॉडस बांधले तर मान्सूनमध्ये लाटा आल्या तर त्याचा रस्त्यावर काही परिणाम होणार नाही आणि लोकांना समुद्र पाहण्यातही काही अडचण होणार नाही. आपण जो सी लिंक बांधला तोच एक मार्ग आहे असं मला काही वाटत नाही. पर्यावरण मंत्रालयानं जर परवानगी दिली तर मुंबईच्या भोवती कोस्टल रिंग रोड उभारता येईल आणि जरूर असेल त्या ठिकाणी भुयारी रस्ता बांधता येऊ शकेल. मुंबईच्या रहदारीचे प्रश्न सुटू शकतील. ट्रान्स हार्बर लिंकला पुढे रेटायचा प्रयत्न चालू आहे. दोनदा प्रयत्न झाले पण ते फसले. या ठिकाणी टेंडर काढण्याची प्रक्रिया असेल किंवा आंतरराष्ट्रीय कंपन्या येऊ नयेत अशी रचना असल्यामुळे एक किंवा दोनच कंपन्या येतात. मुंबईच्या मेट्रोला एकच निविदा आली आणि ती मान्य झाली. खुल्या अर्थव्यवस्थेत हे अपेक्षित नाही.

बीओटी तत्त्वावर प्रस्ताव सादर करताना मुळातच दुसरा कोणी येऊ नये म्हणून प्रयत्न केला. त्यामुळेच आपल्याला चांगले परिणाम मिळणार नाहीत असं दिसून आलंय. आज कोलकाता मेट्रो असेल, ती सरकारच्या मालकीची आहे किंवा बंगलोरची मेट्रोदेखील, त्यात केंद्र सरकार ५० टक्के आणि राज्य सरकारची ५० टक्के मालकी आहे. पण मुंबईत मात्र आपण खाजगी उद्योजकाला दिल्यामुळे फार मोठ्या प्रमाणात ते पैसे अनुदानाच्या रूपानं गेले. त्याऐवजी इक्विटी आपल्याकडे ठेवून रचना केली असती तर बंगलोरसारखं मॉडेल उपयुक्त ठरलं असतं, पण आता जे झालं ते झालं. मेट्रोचा पहिला टप्पा पुढच्या वर्षी सुरू होईल, मोनो रेलचा टप्पाही मार्चपर्यंत चालू होईल. उशीर झाला असला तरी देर आये दुरुस्त आये. उशीर झाला असला तरी काम आपल्याला पुढे न्यावं लागणार आहे. मुंबईत जर आपल्याला कोस्टल रोडची परवानगी मिळाली आणि भुयारी रस्त्यांनाही मंजुरी मिळाली तर मला असं वाटतं बऱ्याच मोठ्या प्रमाणात मुंबईच्या रहदारीचे प्रश्न सुटतील. अर्थात प्रश्न फार सोपे आहेत असं मी मानत नाही, कारण मुंबईची भौगोलिक रचनाच तशा प्रकारची आहे.

मुंबईत घरांचा प्रश्न गंभीर स्वरूपाचा आहे. त्यासंदर्भात मी नेहमी एक सूत्र मांडण्याचा प्रयत्न करतो. आपण कुठलाही पुनर्विकासाचा प्रकल्प राबवला तर त्यामध्ये दोन सूत्रं महत्त्वाची आहेत. प्रकल्पाची खरी किंमत काय आहे ती स्पर्धेतून आपल्याला कळली पाहिजे आणि पारदर्शक निविदा पद्धतीनं त्या किमती प्रस्थापित झाल्या पाहिजेत हे ते सूत्र.

मुंबईच्या जमिनींमध्ये प्रचंड किंमत आहे. जी किंमत होईल ती सरकारी खजिन्यात जमा झाली पाहिजे. अलीकडच्या काळात ज्या योजना राबवल्या गेल्या त्याचे सर्व फायदे खाजगी विकासकांकडे गेले हे मुंबईत राहणाऱ्या सर्वांना माहीत आहे. आपल्याला हे मॉडेल बदलावं लागेल. हे जर आपण उपयुक्तपणे राबवलं तर निश्चितपणे परवडणारी घरं देऊन, झोपडपट्टी कमी करून जी जमीन मोकळी होईल त्यातून करता येईल. बांद्रा-कुर्ला संकुलाचं काम ज्याप्रमाणे शासनाच्या मार्फत झालं, त्यातून खूप निधी उपलब्ध झाला

आणि त्यातून विकासाचे मार्ग खुले झाले. त्याच पद्धतीनं हा प्रश्न आपल्याला सोडवता येईल. पण त्यासाठी प्रचंड राजकीय इच्छाशक्ती पाहिजे.

पंतप्रधानांनी मध्यंतरी सरकारबद्दल टिपणणी केली. त्यावरून वाद निर्माण झाला होता. त्यासंदर्भात खूप उलटसुलट चर्चा झाली. दिल्लीत जे चाललंय ते आघाडी सरकारमुळे आहे का, असा प्रश्न उपस्थित केला गेला. महाराष्ट्राच्या बाबतीतही त्याच प्रकारची परिस्थिती आहे. आता आपल्या इथल्या आणि दिल्लीतल्या आघाडी सरकारमध्ये निश्चित फरक आहे. दिल्लीचं आघाडी सरकार मी सहा वर्षं जवळून पाहिलेलं आहे. आघाडी सरकारमध्ये निश्चितपणे निर्णय घेताना अडचणी येतात. पहिल्या युपीए सरकारमध्ये सदस्य असलेला कम्युनिस्ट या मित्र पक्षानं बाहेरून पाठिंबा दिला होता. सरकारमध्ये कम्युनिस्ट सहभागी झाले नव्हते पण त्यांनी एक लक्ष्मणरेखा आखून घेतली होती. कम्युनिस्टांची इतर कोणत्याही बाबतीत अडचण नव्हती, तक्रार नव्हती, बदली करा किंवा फाईलवर सह्या करा अशा मागण्या त्यांच्या नसायच्या. काही गोष्ट करण्यास त्यांचा तीव्र विरोध होता. पेन्शन, बँकिंग किंवा विमा क्षेत्रात सुधारणा करण्यास त्यांचा विरोध होता आणि त्यांनी ते आम्हाला बिलकूल करून दिले नाहीत. अजूनपर्यंत ते आम्ही करू शकलो नाही.

कम्युनिस्ट गेले आणि युपीए-२ हे आघाडी सरकार आलं आणि त्यामध्ये काही अडचणी निर्माण झाल्या. एकट्या ममता बॅनर्जींनी काही बिलं अडवून ठेवली. उदा- पुनर्वसनाचा कायदा करायचा होता तो होऊ शकला नाही. त्यामुळे निश्चितपणे आघाडी सरकारमध्ये निर्णय घेण्यात अडचणी येतात ही गोष्ट दिल्लीत खरी आहे आणि थोड्याफार प्रमाणात राज्यातही खरी आहे. यासारखी परिस्थिती आंध्र प्रदेश आणि गुजरातमध्ये नाही. तिथं निर्णय घेताना वेगळी परिस्थिती आहे. पण मला विश्वास आहे की गुजरातबद्दल कुणी काहीही म्हणत असलं तरी आपल्याकडे जी प्रगती होतेय त्यानुसार आपण गुजरातच्या मागे पडणार नाही, हे आश्वासन मी आपल्याला देऊ शकतो. मात्र गुजरातनं कृषी क्षेत्रात चांगली प्रगती केलीय यामध्ये काहीच शंका नाही. आपला कृषी विकास दर हा गुजरातपेक्षा कमी आहे. आपला औद्योगिक विकास दर चांगला राहील आणि नव्या उद्योग धोरणाच्या निमित्तानं नव्या प्रोत्साहन योजना राबवतोय. त्यामुळे मोठ्या प्रमाणात उद्योग आपल्याकडे येतील. पायाभूत सुविधांचा विचार केल्यास महाराष्ट्रात आंतरराष्ट्रीय दर्जाचे चार विमानतळ आहेत, दोन आणखी होऊ घातलेले आहेत. आपण महामार्गाचं जाळं विणण्याचा प्रयत्न करतोय. मुंबई-दिल्ली इंडस्ट्रियल कॉरिडॉरच्या माध्यमातून त्या पट्ट्याचा खूप मोठा विकास होईल. औद्योगिकीकरणाबरोबरच किनारपट्टीचा वापर पर्यटनक्षेत्राचा विकास करण्यासाठी तसंच किल्ल्यांचे सर्किट, बुद्धिस्ट सर्किट, अंजठा आणि एलोराच्या विकास योजनांना मान्यता मिळवून देण्यासाठी सर्व प्रयत्न चालले आहेत. त्याचबरोबर भौतिक समतोल राखणं हे सर्वांत मोठं आव्हान आपल्या समोर आहे. फक्त वैधानिक महामंडळाच्या माध्यमातून हे काम होईल असं मला वाटत नाही. याकरता मानसिकता बदलावी लागेल. महाराष्ट्रात हिंगोली कुठे आहे ते प्रत्येकाला कळलं पाहिजे किंवा अमरावतीच्या मेळघाटामध्ये कुपोषणानं मृत्यू का होतात, तिथलं वास्तव कोकणातल्या माणसाला कळलं पाहिजे. किंवा चिपळूणमध्ये काय चाललंय ते विदर्भातल्या माणसाला कळलं पाहिजे. नाहीतर मानसिकदृष्ट्या आपण आपल्या तुकड्यातुकड्यांतच विचार करत राहू.

विदर्भाच्या संदर्भात क्रांतिकारक निर्णय घेतले गेले आहेत. आदिवासींना जमिनी देण्यासाठी वनहक्क कायदा २००६ मध्ये केंद्रानं पारित केला होता. त्यामध्ये वैयक्तिक हक्क आणि सामुदायिक हक्क ग्रामसभेला देण्याचे निर्देश आहेत. गडचिरोली जिल्ह्यातल्या लेखामेंडा गावात एक ऐतिहासिक कार्यक्रम झाला. तो देशाच्या दृष्टीनं प्रचंड महत्त्वाचा आहे. बांबूला गौण खनिज उत्पादन म्हणून दर्जा दिला आणि त्याचे सर्व हक्क ग्रामसभेला देण्यात आले. बांबू कापायचे हक्क मिळाले, पण वाहतुकीचे हक्क वनखात्याकडे होते. देशभरात बांबूची ४० ते ५० हजार कोटी रुपयांची उलाढाल होते.

विदर्भात झुडपी जंगलांचा प्रश्न खूप दिवसांपासून प्रलंबित होता. झुडपी म्हणायचं की झुडपी जंगल म्हणायचं यावरून वाद होता. महाराष्ट्रात झुडपी जंगल म्हटल्यामुळे हक्क वनखात्याकडे गेले. मध्य प्रदेशामध्ये त्याला झुडपी म्हणतात. आता तो वाद थोड्याफार प्रमाणात सोडवता आला आहे. वन्य जीव पर्यटनाकरता नागपूरला ऑफिस सुरू केलंय आणि त्याकरता दिल्लीहून आयजी दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आलीय.


विदर्भाचे काही विशेष प्रश्न आहेत, मराठवाड्याचे काही विशेष प्रश्न आहेत, कोकणाचे काही विशेष प्रश्न आहेत.

एखाद्या विभागाची किती क्षमता आहे त्यावर तिथं किती प्रकल्प उभारायचे यावर निर्णय अवलंबून असतो. उदाहरणार्थ, कोकणात कोळसा आयात करणं सोपं आहे म्हणून कोळशावर आधारित सर्व वीज प्रकल्प कोकणातच उभारायचे ठरवले किंवा विदर्भात झारखंड आणि छत्तीसगढमधून कोळसा वाहतूक करण्यासाठी अंतर कमी पडतं म्हणून सर्व प्रकल्प अमरावती किंवा यवतमाळ उभारले तर तिथं मोठ्या प्रमाणावर प्रदूषण सहन करावं लागेल आणि वीज मात्र मुंबई-पुण्याच्या उद्योग क्षेत्रानं वापरायची यामध्ये न्यायभावना कुठे दिसत नाही. त्यामुळे अशा प्रकल्पांबाबत प्रचंड प्रक्षोभ निर्माण झालेला आपल्याला दिसतो.

विभागीय असमतोल दूर करताना फक्त सिंचनाचा असमतोल एवढाच विचार करून चालणार नाही. शिक्षणाचा असमतोल आहे. गडचिरोली किंवा चंद्रपूर यांसारखे जिल्हे मानवी विकास निर्देशांक निकषांवर क्रमवारीत सर्वांत खाली आहेत. त्यांना वर काढणं शक्य आहे. पण त्या त्या विभागाकरता निर्णय घेतले तरच ते शक्य आहे.

मला विश्वास आहे की पुढच्या दहा वर्षांमध्ये महाराष्ट्राला आपण प्रथम क्रमांकाचं राज्य करू शकू. आपलं दरडोई उत्पन्न चौपट करण्याची क्षमता महाराष्ट्रात निश्चितच आहे. आपण जर आपली राजकीय इच्छाशक्ती एकवटली आणि प्रत्येक माणसानं हे आपलं काम नाही, मुख्यमंत्र्यांचं उपमुख्यमंत्र्यांचं काम आहे असं न समजता जबाबदार नागरिक म्हणून आपली भूमिका निभावली तर हे सहज शक्य आहे. नागरी समाजाच्या माध्यमातून आपण हे निश्चितच करू शकू. जर काही चुकलं तर मीडियाच्या माध्यमातून निदर्शनास आणून देता येईल. प्रत्येक क्षेत्रात जे नेतृत्व करत आहेत त्या सर्वांचे सहकार्य घेऊन आपण हे साध्य करू शकू. आज 'स्टार माझा'ने हा एक आगळावेगळा कार्यक्रम सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या समारोपाच्या निमित्तानं आयोजित केला त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. ●


बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या शिकागो अधिवेशनाला हार्दिक शुभेच्छा!



**श्री. दामोदर पी. पाटील**

भ्रमणध्वनी : ९२२५ १३७ ४०० । फोन : (०२५०) २५२८०२०

**● कोकण एज्युकेशन अॅण्ड मेडिकल ट्रस्ट, संचालिक औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, सफाळे ● होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज चंदनसार रोड, विरार, ता. वसई, जि. ठाणे ● माध्यमिक शाळा - केळवारोड, ता. पालघर, जि. ठाणे ● चेअरमन, श्री. डी.पी. पाटील, मेघराज शिक्षण संस्था संचालित माध्यमिक हायस्कूल ● सदस्य - जिल्हा परिषद ठाणे ● अध्यक्ष - पालघर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ● सदस्य - जिल्हा नियोजन समिती ठाणे**

*With Best Compliments From*

# MEHTA GROUP

## Bhavesh C. Mehta



1, 'Gokul', Opp. Petrol Pump, Agashi Road,
Virar (W), Dist. Thane - 401303.
**Tel.: 0250 - 2502471 / 2502931**
E-mail : c_mulji@bsnl.in

---

B-11, Madhav Kunj, Opp. Chamunda Circle, S.V.P. Road,
Borivali (W), Mumbai - 400092
**Tel.: 022 - 28928413**
E-mail : mehatagroup99@hotmail.com

बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन, शिकागो

# कमी वेळेत जास्त काम करण्याची आवश्यकता

◆ *सुरेश प्रभू*

**प्रत्येक जिल्ह्याचा अशा तऱ्हेनं सर्व्हे करा, की शेतकऱ्याला खरोखरच शेती का करायची नाही याची कारणं जाणून घ्या. ज्या शेतकऱ्यांना शेती करायची नसेल त्या शेतकऱ्यांशी चर्चा करून ते काय करू शकतात, काय करू इच्छितात ते पाहा आणि त्या वेळेला त्या जिल्ह्यात कोणती कौशल्यं विकसित होऊ शकतात याचाही अभ्यास करा. त्याप्रमाणे त्या जिल्ह्यात असणारं मनुष्यबळ आणि कौशल्य यांचा मेळ घालून अशा ठिकाणी कोणता उद्योग उभा करता येईल याचा विचार केला तर शेतकऱ्याला आत्महत्या करण्याऐवजी दुसरा पर्याय उपलब्ध होईल. त्याला जीवन जगण्याचा पर्याय आपण देऊ शकू.**




**महाराष्ट्र** हे देशातलं दुसरं मोठं राज्य. लोकसंख्येच्या दृष्टीने पाहिलं तर आतादेखील भारतातली जवळजवळ १० टक्के लोकसंख्या आपल्या राज्यामध्ये आहे. जरा मागे वळून पाहिलं तर महाराष्ट्र एकेकाळी देशातलं आघाडीवरचं राज्य म्हणून ओळखला जायचा. अनेक बाबतींत– सामाजिक चळवळी म्हणा, राजकीय विचार म्हणा, चांगल्या तऱ्हतऱ्हेच्या गोष्टी म्हणा, या प्रत्येक बाबतीत महाराष्ट्र पुढारलेला होता. ७३ वी आणि ७४ वी घटनादुरुस्ती होण्यापूर्वीच आपल्या राज्यामध्ये स्थानिक स्वराज्यसंस्था निर्माण झाल्या, कायद्यानं सांगितलं म्हणून नाही. याच राज्यामध्ये सर्वांत जास्त प्रमाणात ग्रामीण भागांतून निरनिराळे उद्योजक निर्माण झाले. आपली शेतीची परिस्थिती चांगली नसतानादेखील आपल्याकडे बियाण्यांच्या निरनिराळ्या जाती निर्माण झाल्या. खऱ्या अर्थानं देशामध्ये आपलं राज्य पुढारलेलं राज्य म्हणून ओळखलं जात होतं. आज ज्यामधून आपल्याला ६० बिलियन डॉलर्स मिळतात, त्याचं कारण शोधलं तर ते महाराष्ट्रामध्ये देखील आहे. त्यावेळेला महाराष्ट्रात खाजगी इंजिनीयरिंग कॉलेजे निर्माण झाली नसती तर भारताला हे ६० बिलियन डॉलर्स मिळाले असते का, ते मला माहीत नाही. कारण आज उद्योगासाठी जी प्रचंड प्रमाणावर माणसं लागतात ती केवळ सरकारी कॉलेजेसमधून निर्माण होऊ शकली नसती. म्हणून मागे वळून पाहिलं तर महाराष्ट्र हे खरोखरच पुढारलेलं राज्य म्हणून ओळखलं जात होतं. परंतु तुम्ही जे २०–२० सांगितलं ते खरं आहे १० ओव्हर झालेल्या आहेत आणि त्यावेळेला चांगला स्कोअर दिसतोय. नक्की जिंकणार असं वाटत होतं. परंतु आता १६ व्या–१७ व्या ओव्हर आल्यानंतर, मॅच संपण्याची परिस्थिती असताना पाहिलं पाहिजे की महाराष्ट्र कसा दिसतोय. आज क्रमवारीत महाराष्ट्राचा क्रमांक अनेक बाबतीत वरचा तर सोडाच, मधेदेखील नाही, खालचा पाहायला मिळतोय आणि त्याचं दु:ख होतं.

कुठल्याही राज्यात माणसाची कितपत प्रगती झालीय हा दाखवणारा आलेख आहे. त्याबाबतीत गुजरात, हरियाणा, तामिळनाडू, केरळ आणि पंजाब ही राज्यं महाराष्ट्राच्या पुढे आहेत आणि याबाबतीत महाराष्ट्राची परिस्थिती मनाला दु:ख देणारी

आहे. आरोग्याच्या विचार केल्यास निरनिराळ्या जिल्ह्यांत ३० ते ४५ टक्के लोक कुपोषणानं ग्रस्त आहेत. ग्रामीण भागातल्या ५८ टक्के महिला ॲनिमियानं ग्रस्त आहेत. आजदेखील राज्यात ४७ टक्के लोकांना शौचालयापासून वंचित राहावं लागतं आणि लाखो लोक कुठच्याही तऱ्हेच्या आरोग्यसेवेचा वापर करू शकत नाहीत. ग्रामीण हॉस्पिटलमध्ये फार थोडे बेड उपलब्ध आहेत. तेंडुलकर समितीच्या अहवालानुसार ग्रामीण भागात आणि शहरात मोठ्या संख्येनं लोक दारिद्र्यरेषेखालचं जीवन जगत आहेत.

आर्थिक दृष्ट्या पाहिलं तर आज महाराष्ट्रावर प्रचंड कर्जाचा बोजा आहे. दोन लाख नऊ हजार सहाशे अठ्ठेचाळीस कोटी रुपये एवढं महाराष्ट्राच्या डोक्यावर कर्ज आहे. इकॉनॉमिक सर्व्हेनुसार दरवर्षी कर्जापोटी १६ हजार ४६९ कोटी रुपये आपण व्याज देतो. या कर्जामध्ये २१ हजार ३०१ कोटी २००८–२००९ ची फिगर आहे. सर्व्हेमध्ये २००९–१०ची फिगर दिलेली नाही. २१ हजार ३०१ कोटी रुपयांची गॅरंटी सरकारनं विविध संस्थांना दिलीय आणि आतापर्यंतचा अनुभव पाहिला तर गॅरंटीचं रूपांतर लवकरच कर्जामध्ये व्हायला वेळ लागणार नाही. त्याचा विचार केल्यास कर्जाचा बोजा आणखी जास्त दिसतो.

शेतीक्षेत्रात एकेकाळी आपण अग्रगण्य होतो. ऊस, कापूस, कांदा यासारखी कॅश क्रॉप आपल्या राज्यात होतात, पण देशात सर्वाधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या आपल्याच राज्यात केल्या आहेत. त्याबाबतीत आपला देशात पहिला क्रमांक लागतो. देशात सगळ्यात जास्त सिंचनप्रकल्प राज्यात असून देखील आपल्याकडे सिंचनाखालील जमिनीचे प्रमाण फक्त ११ टक्के आहे. मग प्रश्न पडतो की एकेकाळी पुढारलेलं राज्य एवढ्या पिछाडीवर कसं गेलं? आज आपण आघाडीवर का नाही? राजीव खांडेकरांनी सांगितल्याप्रमाणे खरोखरच नीट विचार केला तर अजूनही सात–आठ ओव्हर्स शिल्लक आहेत. ढोणीनं काही पराक्रम केला तर अजूनही मॅच जिंकता येऊ शकते! म्हणूनच पुढच्या दहा वर्षांत काय केलं पाहिजे याचा विचार करणं गरजेचं आहे. तो करण्यापूर्वी अत्यंत साक्षेपी दृष्टीनं आपण नेमके कुठे आहोत याचाही विचार केला पाहिजे.

माझ्या दृष्टीनं तीन गोष्टींशी मी तुलना करतो. एक म्हणजे आपल्या भारतातलं दुसरं राज्य, गुजरात. ज्याचा जन्म आपल्याबरोबर झाला, म्हणजे जुळं भावंड म्हटलं तरी चालेल. परंतु त्या जुळ्या भावंडाला पाहिल्यानंतर असं वाटतं की जत्रेत दोन भावंडांची ताटातूट झाली आणि एक भाऊ पुढे निघून गेला. गुजरातमध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणावर प्रगती झाली. आधी गुजरात महाराष्ट्राच्या खूप मागे होता. परंतु आज गुजरात अनेक बाबतींत महाराष्ट्राच्या पुढे आहे. शेतीचा विचार केला तर देशात शेतीच्या विकासाचा दर तीन–चार टक्क्यांवर वाढत नाही. अशा वेळेस गुजरातनं सातत्यानं शेतीचा विकासदर दहा टक्के गाठला. दुसरं उदाहरण आहे चीनमधल्या गँगडाँग राज्याचं. गँगडाँगची लोकसंख्या आहे आठ कोटी आणि तीन कोटी स्थलांतरित म्हणजे अकरा कोटी इतकी आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या ११ कोटी २३ लाख इतकी आहे. गँगडाँगची लोकसंख्या महाराष्ट्राच्या जवळपास आहे. आपल्या राज्याचं क्षेत्रफळ आहे तीन लाख आठ हजार चौरस किमी आणि गँगडाँगचं क्षेत्रफळ आहे एक लाख ७८ हजार चौरस इतकं आहे. म्हणजेच गँगडाँग आपल्यापेक्षा क्षेत्रफळानं छोटं राज्य आहे. आपलं क्षेत्रफळ जास्त असल्यानं विकासाला जास्त संधी आहेत, तरीही आपल्यापेक्षा जास्त विकास गँगडाँगनं साध्य केलाय. पुढच्या दहा वर्षांचं व्हिजन काय असावं याबाबत तुलना करता आपल्यापेक्षा पिछाडीवर असलेल्यांशी न करता आपल्या पुढे असलेल्यांचा विचार केला पाहिजे. कोरियासारख्या देशानं आपलं दरडोई उत्पन्न, २०,००० डॉलर्सपर्यंत वाढवलं.

मला असं वाटतं की आपलं राष्ट्र पुढे जात असताना महाराष्ट्र हे त्याहीपेक्षा पुढे गेलं पाहिजे. आपल्या देशाचा विकासाचा दर दहा टक्क्यांपेक्षा पुढे जावा यासाठी प्रयत्न केले जात असतील तर महाराष्ट्रानं आपला विकासाचा दर १५–१६ टक्क्यांपर्यंत कसा जाईल याचा विचार केला पाहिजे. हे इतर ठिकाणी झालेलं आहे आणि आपल्या इथे होणं शक्य आहे. म्हणून ते करण्याच्या दृष्टीनं विचार केला पाहिजे. आता आपल्या हातात थोडा कालावधी उरला असल्यामुळे आपल्याला असणाऱ्या मर्यादांची जाणीव ठेवण्याची गरज आहे. पहिलं म्हणजे विकास करायचा असेल आणखी नवीन गुंतवणूक करायला पाहिजे. सरकार गुंतवणूक करणार असेल तर असलेल्या कर्जाचा बोजा, द्रारिद्र्यरेषेखाली असलेली मोठी लोकसंख्या, त्यामुळे सोशल सेक्टरमध्ये करावी लागणारी गुंतवणूक आणि हे सर्व करत असताना राज्यामध्ये असणारा प्रादेशिक असमतोल कसा दूर करता येईल हे देखील पाहणं गरजेचं आहे. व्यक्तीचा आणि त्या त्या भागाचा विकास झाला नाही तर अनेक प्रश्न निर्माण होतात. तो आज आपण नक्षलवादाच्या रूपाने पाहत आहोत. मानवाचा विकास करताना

पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही याची दक्षता बाळगली पाहिजे. जगात आणि देशात जिथे जिथे विकास झाला त्यांच्याकडे दोनच गोष्टीचं भांडवल होतं. एक म्हणजे मानव (ह्युमन कॅपिटल) आणि दुसरं म्हणजे नैसर्गिक स्रोत (नॅचरल कॅपिटल). खनिज, जमीन, पाणी याचा जास्तीत जास्त योग्य प्रमाणात वापर म्हणजे खऱ्या अर्थानं विकास. विकास करायचा म्हणजे कसा करायचा? तर मुंबईचं सिंगापूर करू, या मुंबईचं आपण शांघाई करू असं म्हटलं जातं. यापेक्षा आपण पूर्वीची जरी मुंबई केली तरी आपला विकास खूप चांगला झाला असं मानता येईल. कॅलिफोर्निया वगैरे लांब जाण्याची गरज नाही कोकणचा विकास कोकणपण टिकवणारा केला पाहिजे.

ज्या महत्त्वाच्या गोष्टी करणं अत्यावश्यक आहे त्यापैकी पहिलं म्हणजे शेती. महाराष्ट्राच्या एकूण उत्पन्नापैकी ६५ टक्के उत्पन्न सेवाक्षेत्रातून येतं. शेतीचा उत्पन्नात वाटा कमी असला तरी दोनतृतीयांश लोक शेतीवर उपजीविकेसाठी अवलंबून आहेत. म्हणून जोपर्यंत आपण शेतीचा विकास करत नाही, जोपर्यंत लोकांना आपण गरिबीतून बाहेर काढत नाही, तोपर्यंत महाराष्ट्राचा खरा विकास झाला असं मानता येणार नाही. देशात जो सर्व्हे केला त्यावरून असं दिसतं की अनेक शेतकऱ्यांना शेतीच करायची नाही. त्यास अनेक कारणं आहेत. शेतकऱ्यांच्या मुलींची लग्नं होत नाहीत. शेतकऱ्याला देखील लग्न करताना शेतकऱ्याची मुलगी नको असते. म्हणजे सामाजिकदृष्ट्या देखील शेतकऱ्याची परिस्थिती गंभीर आहे. शेतकऱ्याची परिस्थिती बदलताना आपण काही गोष्टी केल्या पाहिजेत. मला मुख्यमंत्र्यांना विनंती करायची आहे की प्रत्येक जिल्ह्याचा अशा तऱ्हेनं सर्व्हे करा, की शेतकऱ्याला खरोखरच शेती का करायची नाही याची कारणं जाणून घ्या. ती जाणून घेतल्यानंतर ज्या शेतकऱ्यांना शेती करायची नसेल त्या शेतकऱ्यांशी चर्चा करून ते काय करू शकतात, काय करू इच्छितात ते पाहा आणि त्या वेळेला त्या जिल्ह्यात कोणती कौशल्यं विकसित होऊ शकतात याचाही अभ्यास करा. त्याप्रमाणे त्या जिल्ह्यात असणारं मनुष्यबळ आणि कौशल्य यांचा मेळ घालून अशा ठिकाणी कोणता उद्योग उभा करता येईल याचा विचार करा. हे जर केलं तर शेतकऱ्याला आत्महत्या करण्याऐवजी दुसरा पर्याय उपलब्ध होईल. त्याला जीवन जगण्याचा पर्याय आपण देऊ शकू.

चीनमध्ये जगातल्या मोठमोठ्या कंपन्या उभ्या राहिल्यानं ती जगात दुसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनलीय. आपल्याकडे पण खादी व्हिलेज इंडस्ट्री कमिशन होतं. ग्रामीण भागात उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीवर उद्योग कसे उभे करू शकू हे देखील पाहणं गरजेचं आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे शेतीला पूरक आहे सर्वसामान्य माणसाला अत्यंत आवश्यक आहे आणि पुढच्या दहा वर्षांत हा प्रश्न आणखी गंभीर होणार आहे. तो म्हणजे पाण्याचा प्रश्न. देशातलं ८३ टक्के पाणी शेतीसाठी वापरलं जातं. पाण्याशिवाय वीजनिर्मितीही होऊ शकत नाही. वाढत्या नागरीकरणालाही पाण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे पाण्याचा प्रश्न कसा सोडवता येईल? पर्यावरणातले बदल ही वस्तुस्थिती आहे की ते मानवनिर्मित आहेत की नाही हा वादाचा प्रश्न आहे. पर्यावरणातला बदल पाण्यावर, शेतीवर होणार आहे. तापमानवाढीमुळे अनेक पिकं त्याला तोंड देऊ शकणार नाहीत आणि पाण्याच्या उपलब्धतेवर त्याचा परिणाम होणार आहे.

तिसरा महत्त्वाचा प्रश्न आहे रोजगारनिर्मितीचा. सेवाक्षेत्रात अनेक संधी असल्या तरी त्याला मर्यादा आहेत. त्यामुळे उत्पादक औद्योगिक क्षेत्राचा विकास कसा होईल याचा विचार केला पाहिजे. त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे, त्याही पलीकडे जाऊन उद्योगक्षेत्र कसं वाढेल आणि त्यामध्ये नोकऱ्या कशा निर्माण केल्या जातील हे पाहिलं पाहिजे. हे सगळं करण्यासाठी पायाभूत सेवांचा, सुविधांचा विकास ही अत्यंत आवश्यक गोष्ट आहे. ७२० किमीचा किनारा असूनदेखील आपल्याकडे बंदरांचा योग्य विकास झाला नाही. पायाभूत सेवांचा विकास करताना एकात्मिक विचार करून विकास झाला पाहिजे. त्यामध्ये ऊर्जा या घटकाला अत्यंत महत्त्वाचं स्थान आहे. खरं तर जसा प्लान्ड हॉलिडे घेतात तसा आपण ऊर्जानिर्मितीपासून हॉलिडे घेतला होता. असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी या उक्तीप्रमाणे ऊर्जानिर्मिती न झाल्यानं आपल्यासमोर ऊर्जेचा प्रश्न खरोखरच गंभीर आहे. ऊर्जानिर्मितीसंदर्भात केवळ तो निर्मितीइतपतच मर्यादित नाही तर वहन आणि वितरणातली गळती आणि त्यातून होणारं नुकसान यांचं प्रमाण महाराष्ट्रात खरोखरच जास्त आहे. त्या दृष्टीनं विकास केला जाईल हे पाहिलं पाहिजे. हे असताना आणि प्रत्येक भागाचा विकास करताना अनेक प्रश्न आपल्यासमोर येत आहेत. विकास करायला जायचं तर लोकांचा विरोध होतो. लोकांचा विरोध झाला किंवा नाही झाला तरी देखील इतर प्रश्न, जसे पर्यावरणासारखे प्रश्न निर्माण होतात. म्हणून मला मुख्यमंत्र्यांना विनंती करायची आहे की प्रत्येक जिल्ह्याची वहनक्षमता काय आहे ते पाहा. कॅरिंग कॅपेसिटीचा अभ्यास

करा आणि कॅरिंग कॅपेसिटीच्या आधारावरच विकास करा. हे सगळं करताना नैसर्गिक संपत्ती नष्ट न होता विकास होईल हे देखील पाहा. सिंधुदुर्गसारख्या सुंदर जिल्ह्याला एकीकडे पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर करायचं आणि दुसऱ्या बाजूला मायनिंगदेखील सुरू करायचं. उद्या कदाचित मायनिंग केल्यानंतर खाली जमीन कशी असते हे पाहण्यासाठी जर पर्यटक येणार असतील तर गोष्ट निराळी! नाही तर असणारी गोष्ट नष्ट करून नवीन विकासाच्या मागे जाणं हे आपल्याला न परवडणारं आहे याचा देखील विचार करणं गरजेचं आहे.

मुंबई जी देशाची आर्थिक राजधानी आहे, ती आपल्या राज्यात आहे याचा आपल्याला अभिमान नक्कीच वाटला पाहिजे. तो अभिमान वाटावा या दृष्टीनं आपण मुंबईकडे पाहिलं पाहिजे. मुंबई शहराचा सर्व दृष्टीनं विकास कसा केला जाईल हे पाहिलं पाहिजे. मुंबई शहरातील ६३ % लोक झोपडपट्टीत राहतात आणि बाकीची शहरं जर पाहिली तर त्यांची परिस्थितीदेखील त्यापेक्षा वेगळी नाही. म्हणून शहरातील लोकांचं क्वालिटी ऑफ लाईफ म्हणजे जीवनमान कसं सुधारलं जाईल याचा विचार करण्याची गरज आहे. म्हणूनच ग्रामीण आणि शहरी विकास एक समजण्याची गल्लत करू नका. शहरातील लोक हे देखील कधीतरी ग्रामीण भागातून आले होते. मी देखील तसा ग्रामीण भागातील आहे मुख्यमंत्रीदेखील ग्रामीण भागातीलच आहेत. शहर आणि ग्रामीण भागाचा एकात्मिक विकास केला जाईल हे पाहणं गरजेचं आहे. शहरांकडे दुर्लक्ष होणार नाही, त्याचवेळी ग्रामीण भागाची निश्चितच काळजी घेतली जाईल या दृष्टीनं विचार करण्याची गरज आहे. मला वाटतं, हे सगळं केलं तर जेव्हा विसावी ओव्हर टाकली जाईल त्यावेळी महाराष्ट्र जिंकला अशी जी आपण सगळे अपेक्षा करतो ती पूर्ण होईल. त्यासाठी पुढच्या पाच ओव्हरमध्ये आपल्याला जास्तीत जास्त काम करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी आपण सगळ्यांनी एकत्रित काम करावं अशी मी इच्छा व्यक्त करतो. 'स्टार माझा'नं हा कार्यक्रम आयोजित करून या विकासाच्या प्रक्रियेला कोणती दिशा दिली जावी यावर बोलण्याची ही अत्यंत चांगली संधी दिली म्हणून त्यांचे आभार मानतो. ●


*With Best Compliments From*

# JHUNTRON

SWITCH ON THE EFFICIENCY

# FIVESTAR INDUSTRIES

(Manufacturer of Electronic & Copper Ballasts For CFL/FTL & HID Lamps)

**Office :** A/216, Virwani Industrial Estate, Off Western Express Highway, Goregaon (East), Mumbai - 400 063.
**Tel.: (022) 40036075 / 32403243**

**Factory :** Plot No. 339/A, Opp. Patel Cricket Ground, Char Rasta, Kachigam, Daman - 396 210
**Tel.: (0260) 2240058 / 3204460**

www.jhuntron.net & www.jhuntron.com / E-mail : mumbai@fivestarindustries.co.in

# पन्नास वर्षांत गमावलेलं पुढील दहा वर्षांत कमावू या

◆ *कुमार केतकर*

**आपल्याला खूप करण्यासारखं आहे. पुढच्या दहा वर्षांतसुद्धा. पण त्यासाठी निदान व्यक्तिगत पातळीवर आत्मपरीक्षण करून कशाबद्दल अभिमान ठेवायचा आणि कशाबद्दल दुरभिमान ठेवायचा नाही एवढं जरी आपल्या मनाशी पक्कं झालं तरी बरंच साध्य होईल. दहा कोटी माणसं त्या संघर्षात जाणीवपूर्वक व्यक्तिगत पातळीवर आणि संघटित पातळीवर उतरतील तेव्हा मला असं वाटतं, जे पन्नास वर्षांत आपण गमावलं ते पुढल्या दहा वर्षात कमावू शकू.**




**आपण** जेव्हा अमेरिका म्हणतो त्यावेळेला आपल्याला काय आठवतं? आपल्याला हॉलिवूड आठवतं, नासा आठवतं, नॅशनल जिऑग्राफिक आठवतं, आपल्याला स्मिथसोनियन म्युझियम आठवतं. अमेरिकेची जी काही कीर्ती आहे ती त्यांच्या अध्यक्षांच्या नावावर नाही किंवा त्यांच्या रस्त्यांवरती नाहीये जरी ते मूलभूत प्रश्न होते. उदाहरणार्थ, त्यांचे अध्यक्ष आयझेनहॉवर यांनी जर संपूर्ण महामार्गांचा प्रकल्प हाती घेतला नसता तर अमेरिकेचे ते वैशिष्ट्यं मागे राहिलं असतं. पण लोक केवळ तेवढ्यासाठी अमेरिकेला ओळखत नाहीत. आपण जेव्हा इंग्लंडच्या समाजाबद्दल बोलतो, त्यावेळी आपण शेक्सपीयर, शेलेबद्दल बोलत असतो. त्यांचं आपण सगळ्यांनी वाचलेलंदेखील नसतं. सगळी नाटकं वाचलेली नसतात. सगळ्या कविता वाचलेल्या नसतात. पण आपल्या डोळ्यांसमोर त्या देशाचं, त्या समाजाचं, त्या संस्कृतीचं जे चित्र निर्माण होतं ते राजकारण्यांमधनं निर्माण होतं नाही. ते केवळ त्यांच्या आर्थिक प्रगतीतनं निर्माण होत नाही. त्यामुळे कोणताही समाज, कोणताही देश आपण जेव्हा डोळ्यांसमोर ठेवतो त्यावेळी आपण त्यांचे राजकारणी आणि त्यांच्या आर्थिक प्रगतीच्या पलीकडे काहीतरी शोधत असतो. आता महाराष्ट्र म्हटलं तर बऱ्याच अंशी आर्टिफिशियली क्रिएट केलेलं राज्य आहे. आर्टिफिशियली म्हणजे निरनिराळ्या भागांतली मराठी माणसं कुठे कुठे आहेत त्यांचा भौगोलिक पद्धतीनं विचार करून हे राज्य निर्माण झालं. नाही तर एक भाग होता हैदराबादमध्ये म्हणजे निजामाच्या राज्यात. त्या निजामाच्या राज्यातनं आलेली जी गावं आहेत लातूर, नांदेड, जालना त्यांचा सावंतवाडी, चिपळूण यांच्या संस्कृतीशी काहीही संबंध नाही. त्यांची जीवनशैली समान नाही. त्यांचे प्रश्न समान नाहीत. त्यांचे शेतीचे प्रश्न समान नाहीत. त्यांचं काहीच समान नाही. पण ते दोघंही महाराष्ट्रात आहेत. कोकणपण महाराष्ट्रात आहे आणि मराठवाडापण महाराष्ट्रात आहे. जो विदर्भ पूर्वी सीपी अँड बेरार म्हणजे सेंट्रल प्रॉव्हिन्स आणि बेरारचा भाग होता त्या विदर्भाचे प्रश्न आणि पुण्यात सदाशिव पेठी संस्कृतीत

वाढलेल्या किंवा सदाशिवपेठी संस्कृतीच्या बाहेर वाढलेल्या पुण्याचे प्रश्न याचाही विदर्भाशी काही संबंध नाही. पश्चिम महाराष्ट्राचा तुम्ही विचार केलात तर पश्चिम महाराष्ट्राचा आणि खानदेशचा सांस्कृतिक संबंध जवळजवळ नसल्यासारखा आहे. खानदेशही महाराष्ट्रात आहे आणि पश्चिम महाराष्ट्रही महाराष्ट्रात आहे आणि कोकणही महाराष्ट्रात आहे आणि या सगळ्यांमध्ये मुंबईपण आहे. मात्र मुंबई पूर्णपणे वेगळी आहे.

पण मुंबई पूर्णपणे वेगळी आहे असं कुणी विधान जरी केलं तर बहुतेक मुंबई वेगळी करण्याच्या कटाचे समर्थक दिसताहेत असं त्यांच्याबद्दल बोलण्याची राजकीय प्रथा; विशेषत: संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीनंतर पडलेली आहे. प्रत्यक्षात मुंबई ही महाराष्ट्रापेक्षा एक वेगळीच संस्कृती निर्माण झाली आणि अलीकडच्या काळात तर विकृतीच तयार झालेली आहे. त्यामुळे स्वाभाविकच आपण असा प्रश्न विचारला पाहिजे, की मला जर मराठी माणूस महाराष्ट्रीय म्हणून जगात अमेरिकेत, बंगालमध्ये कुठेही जर माझी ओळख हवी असेल तर कोण देणार आहेत? इथले राजकारणी देणार आहेत, इथली वीज देणार आहे, इथले रस्ते देणार आहेत? माझी ओळख कशातनं निर्माण होते? अगदी सहज जर तुम्हाला इतिहासाचा संदर्भ द्यायचा झाला तर आपल्याकडे खूप आहे. पण इतिहासात जायची गरज नाही. आपल्याला २०२० बद्दल बोलायचं आहे. पण तो संदर्भ आवश्यक आहे कारण आपण इतिहासाच्या खांद्यावर उभे आहोत.

शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकानंतर राजमुद्रा दिली गेली त्या राजमुद्रेमध्ये राजमुद्रा भद्राय राज्यते असं म्हटलेलं आहे. ज्यांनी कोणी ते लिहिलं त्यांना बऱ्यापैकी संस्कृत आणि मराठी येत असलं पाहिजे. त्यांना राज धर्माय राज्यते असं लिहिता आलं असतं, जर ते खरोखरच हिंदू धर्माचा विचार करत असते. तरी पण त्यांनी असं लिहिलेलं नाही. त्यांनी भद्राय राज्यते असं म्हटलं कारण त्यांना लोककल्याणकारी राज्याची संकल्पना मांडायची होती. भद्राय म्हणजे लोककल्याण. त्यावेळी, जगामध्ये कुठेही ज्याला हल्लीच्या भाषेत म्हणतात ती वेलफेअर स्टेट ही संकल्पनासुद्धा नव्हती. त्यावेळी या महाराष्ट्रामध्ये, आताच्या भाषेत अडीच किंवा तीन जिल्हे एवढंच शिवाजी महाराजांचं राज्य होतं. त्यांच्याकडे विदर्भ, मराठवाडा नव्हता. तेवढ्या ठिकाणी एक राज्य स्थापन करून त्यावेळच्या मोगल सल्तनतला आव्हान देऊन, या पङ्क्यांमध्ये राज भद्राय राज्यते- लोककल्याणकारी राज्याची स्थापना करणारे शिवाजी महाराज अशी विभूती आपल्याकडे होऊन गेल्याची चर्चा आपण खूप करतो. गर्वानं तर खूपच बोलतो.

त्याच्यानंतर म्हणजे १६७४ नंतर १०२ वर्षांनी अमेरिकेत क्रांती झाली आणि तिथे त्यावेळेला स्वातंत्र्य आणि कल्याणकारी राज्याचा विचार आला. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध १७७६ साली झालं आणि त्याच्यानंतर साधारणपणे शंभर वर्षांनी त्यांच्याकडे स्टॅच्यू ऑफ लिबर्टी आला. आता जगभर चर्चा करताना आपल्याबद्दल, महाराष्ट्राबद्दल आपण ज्या वेळी विचार करतो त्या वेळी आपल्याबद्दल अमेरिका आणि इंग्लंडमध्ये सोडून देऊ, या भारतातल्या इतर राज्यांमध्ये आपल्याबद्दल चर्चा काय होते, आपल्या बद्दल काय बोलतात, त्यांनी आपल्याबद्दल काय बोलावं या दृष्टिकोनातनं आपण आपली जीवनशैली आणि विचार नाही करायचा? आपण कसे आहोत त्याच्यामुळे आपल्याबद्दल आपसूक काय बोलणार आहेत याच्याबद्दल आपल्याला विचार करता आला पाहिजे आणि निदान पन्नास वर्षापूर्वी जेव्हा महाराष्ट्राची स्थापना झाली त्यावेळी तसा विचार असावा असं आपल्याला पाठीमागे वळून वाटतं. पण प्रत्यक्षात तसं झालेलं नाही.

आता पन्नास वर्षं होत आली. या पन्नास वर्षांमध्ये स्वतंत्रपणे महाराष्ट्रानं काय दिलं, काय दिलं नाही याची चर्चा बरीच झाली आहे. अगदी साध्या साध्या गोष्टी आहेत. त्या लोणारला लाखो वर्षांपूर्वी उल्कापात झाला आणि तिथं एक प्रचंड सरोवर आहे. त्याच्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष झालंय. त्याच्याकडे सगळ्यात जास्त लक्ष कोणाचं आहे तर अमेरिकेतल्या नासाचं लक्ष आहे. त्यावर जर संशोधन केलं तर एकूण ग्रहांच्या, पृथ्वीच्या, त्यावेळच्या सूर्यमालिकेच्या उत्पत्तीविषयी जे गूढ आहे ते लोणारवरच्या संशोधनामुळे उकलण्यास मदत होऊ शकेल अशी चर्चा नासामध्ये आहे. महाराष्ट्रात कुठे आहे चर्चा? या संबंधी काहीच चर्चा नाही. त्यामुळे प्रश्न फक्त आपण काय काय निर्माण केलं म्हणजे वीज आणि पाण्याच्या संबंधात नाहीये. जे आहे त्याचा प्रगतीच्या दृष्टिकोनातनं नवीन सिम्बॉल्स, नवीन आयकॉन्स तयार करण्याच्या दृष्टिकोनातनं आपण काय विचार केला? फक्त अमेरिकेतल्याच हॉलिवूड आणि नॅशनल जिऑग्राफिक, आणि अगदी मॅकडोनाल्ड आणि कोकोकोलापर्यंत जी ड्रीम्स,

जी सिम्बॉल्स आणि आयकॉन्स जशी अमेरिकेत तयार झाली, तशी फक्त अमेरिकेतच झाली असं नाही. काही प्रमाणात तशी रशियात तयार झाली. रशियामधल्या सिम्बॉल्सचा प्रभाव अमेरिकेवर एवढा पडला की त्यांनी पहिली गोष्ट कोणती केली असेल तर रशियातील सगळ्या स्पेस सेंटर्सची कॉपी त्यांनी धडाधड करायला सुरुवात केली. अमेरिकेतला स्पेस प्रोग्रॅम हा रशियानं इन्सपायर केलेला प्रोग्रॅम आहे. ते केवळ आपल्या दैनंदिन भौतिक जीवनाची शैली वाढवण्यात गुंतलेले नव्हते.

इंग्लंड फार गरीब होता. शेक्सपीयरचा, न्यूटनचा इंग्लंड अतिशय गरीब. शेक्सपीयर आणि न्यूटनचा काळ एकच होता. देश इतका गरीब की इंग्लंडमधले २५ टक्के लोक प्लेगनं मेले. आणि तरीसुद्धा न्यूटन तिथं झाला. या मोठ्या मोठ्या लोकांच्या तुलना झाल्या असं आपण म्हणू शकतो. आपल्याकडे रवींद्रनाथ टागोर, सत्यजीत रे अथवा अमर्त्य सेन आहेत. आज भारताची जी ओळख पाश्चिमात्य देशांना किंवा जगात अगदी जपान-इंडोनेशियामध्ये होते त्यावेळी त्या सगळ्यांना सत्यजीत रे माहीत असतो. कुरोसावाला पण सत्यजीत रे माहिती असतो. जगातल्या सगळ्या अर्थतज्ज्ञांना आणि समाजशास्त्रज्ञांना अमर्त्य सेन माहिती असतो. त्या काळात- १९११ ते १९२०च्या काळात टागोरांचं नाव भारतातसुद्धा पूर्ण; अगदी बंगालमध्येसुद्धा माहिती नव्हतं. त्यावेळी त्यांना साहित्याचं नोबेल मिळतं. हे आयकॉन्स आहेत, हे सिम्बॉल्स आहेत. अतिशय गरीब होता बंगाल त्या वेळेससुद्धा. तिथं त्या वेळेस वीज, पाणी, रस्ते काही नव्हतं. तरीसुद्धा तिथं टागोर निर्माण झाले. तिथल्या दारिद्र्यातनंच सत्यजीत रे निर्माण झाला. आपण असा प्रश्न विचारला पाहिजे की गेल्या पन्नास वर्षांमध्ये आपण एकही सिम्बॉल, असा एकही आयकॉन का निर्माण करू शकलो नाही? बरं, आता आपल्याकडे जर पाहिलं तर आजपासून शंभर वर्षांपूर्वी १९०९ साली तुम्ही कोणतंही क्षेत्र घ्या त्यात महाराष्ट्र पुढे असे. सावरकरांना १९१० साली अटक झाली, टिळकांना १९०८ साली अटक झाली. पण टिळकांची लाट एवढी मोठी की अरविंद घोष आणि लालालजपतराय यांना विचारलं की तुम्ही व्हाल का काँग्रेसचे अध्यक्ष? तर ते म्हणाले, 'अहो, ज्या मुंबईत काँग्रेसची स्थापना झाली त्या मुंबई-पुण्यात टिळक असताना तर तुम्ही विचारताच कसे? टिळकांसारखं उत्तुंग व्यक्तिमत्त्व आहे तिथे आम्ही कसे होणार? तेच व्हायला पाहिजेत.' असं टिळकांबद्दल बोललं गेलं. शंभर वर्षांपूर्वी कोणत्याही विचारसरणीचा माणूस घ्या तो महाराष्ट्रातच होता. त्याच्यानंतर १९२७ साली चवदार तळ्याचा लढा उभा राहिला तो उभारणारे डॉ. आंबेडकरसुद्धा इथलेच होते. नामदार गोखले ज्यांना महात्मा गांधी गुरू मानत ते देखील इथलेच होते. म्हणजे टिळक, सावरकर, गोखले, आंबेडकर ही सर्व माणसं महाराष्ट्रीय म्हणजे मराठी भाषिक होती. बरं या सर्व मराठी भाषिकांमध्ये सर्व प्रकारचा अभिमान वाटावा अशा प्रकारची विचारसरणी त्यांच्याकडे होती. ते परस्परांशी एकमतात नव्हते. आगरकर आणि टिळक यांनी एकमेकांबद्दल जे अग्रलेख लिहिलेले आहेत त्यातले काही काही तर सामनाच्या काही अग्रलेखांना लाजवतील असे आहेत. परंतु त्यांनी ते लिहिलेत. तरीही दोघंही आपले आयकॉन्स आहेत. त्यावेळेलाही ते आयकॉन्स होते.

त्यावेळेला महाराष्ट्रातल्या सर्व लोकांचे आयकॉन, सिम्बॉल, स्टेटस काय होतं ते म्हणजे विलायतेला जाणं. विलायत म्हणजे फक्त इंग्लंड एवढंच होतं. विलायत म्हणजे जर्मनी, फ्रान्सला कोणी विलायत म्हणत नव्हतं. अमेरिकेला त्यावेळी जाण्याची पद्धतच नव्हती. त्यावेळी अमेरिकेचंसुद्धा आयकॉन इंग्लंडच होतं. अमेरिकेतल्या लोकांनासुद्धा इंग्लंडकडे बघून न्यूनगंड वाटायचा. आता ही विलायत कुठे आहे प्रत्यक्षात? सगळे लोक विलायतेला गेले. अगदी बॅरिस्टर गाडगीळ विलायतेला गेले. सावरकरसुद्धा विलायतेला गेले. सगळी लोकं विलायतेला गेली. ही विलायत कुठे आहे? आपण शाळेत असताना पुस्तकात वाचलेलं आहे अमुक अमुक विलायतेला गेले.

विलायत आहे कुठे? जेव्हा मी पहिल्यांदा इंग्लंडला गेलो तेव्हा मी तिथल्या लोकांना विचारलं की ही विलायत कुठे आहे ते पाहायचं आहे. Vilayat we don't know vilayat मी म्हटलं आमच्याकडचे सगळे लोक विलायतेला आहेत. सुभाषचंद्र बोससुध्दा विलायतेला आहेत. ती विलायत आहे कुठे? There is nothing like vilayat. मग मी चौकशी करायला सुरुवात केली. इतिहासाची पुस्तकं पाहिली त्यावेळी माझ्या लक्षात आलं की विलायत तुर्कस्तानात आहे. तुर्कस्तानच्या सीमेवरच विलायत नावाचा एक लहानसा प्रांत आहे. मग ते विलायत का म्हणायचे? कारण आपल्या दृष्टिकोनातनं परदेशात जाणं म्हणजे विलायत. कारण पूर्वी खुश्कीचा मार्ग होता. समुद्री मार्ग नव्हता. त्यावेळी जे व्यापारी जायचे ते खुश्कीच्या मार्गानं. तुर्कस्तानातून युरोपात

जायचे आणि ते विलायतेला जायचे आणि त्यांना विलायतेला थांबायला लागायचं कारण तिथे आशिया संपायचा आणि युरोप सुरू व्हायचा. मग ते विलायतेला जायचे, तिथं त्यांच्या हुंड्या किंवा करारमदार करायचे आणि युरोपला जाऊन व्यापार करायचा. विलायतेला जाण्याचा इंग्लंडला जाण्याशी काही संबंध नव्हता. पण तो एक सिम्बॉल तयार झाला. असा सिम्बॉल महाराष्ट्राबद्दल कोणताच का नाही? एक आहे.

सांस्कृतिक पातळीवरती त्यांची जी आयडॉल्स आहेत तशा प्रकारची आयडॉल होण्याची क्षमता जर भारतामध्ये कोणात असेल किंवा कोणाला होती, अगदी गेल्या शंभर वर्षांपूर्वी किंवा ६१ वर्षांपूर्वी स्वातंत्र्य मिळालं तेव्हा किंवा ५० वर्षांपूर्वी जेव्हा महाराष्ट्र निर्माण झाला तेव्हा, ती महाराष्ट्राला होती. आणि ती कुठे गेलीय? जर तुम्ही साठ सालचा महाराष्ट्र मनातल्या मनात आठवून पाहिलात तर शिवसेनेचा जन्म १९६६ साली आहे.१९६० साली जेव्हा महाराष्ट्र स्थापन झाला त्यावेळेला कोणत्या प्रकारचे लेखक होते? महाराष्ट्रामध्ये कोणत्या प्रकारचं साहित्य होतं? मुंबईमध्ये मराठीची चळवळ नसताना मुंबईची भाषा मराठीच होती. त्याच्यासाठी चळवळसुद्धा करायला लागत नव्हती. वस्तुत: साठ साली जेव्हा महाराष्ट्र निर्माण झाला त्यावेळेलाही मुंबईमध्ये मराठी माणसांची संख्या किती होती त्याच्याबद्दल मतभेद आहेत. काही जणांचं म्हणणं आहे ४८ टक्के होती, काही जणांचं म्हणणं आहे ५१ टक्के होती. आपण त्या वादात जायला नको. बहुसंख्य लोकांची भाषा साठ सालीसुद्धा मराठी नव्हती. पण इथला गिरणगाव असेल, त्या गिरणगावामध्ये नाट्यसंमेलनं व्हायची. इकडे सगळा प्रदेश मुंबईचा-महाराष्ट्राचा नाटकांनी व्यापला होता. मराठीच परिसर असायचा. त्यावेळेस सर्व टॅक्सी ड्रायव्हर शीख होते. आता उत्तरप्रदेश किंवा बिहारचे आहेत असं म्हटलं जातं. त्यावेळेस सर्व शीख मराठी बोलायचे. ऑपेरा हाउसचा ऑटो ट्रेड हा सर्व शिखांकडे होता. भुलेश्वरचा सर्व व्यापार गुजरात्यांकडे होता. पण मराठी हीच ज्याला सार्वजनिक जीवनशैलीची भाषा म्हणतात ती होती. मराठी संस्कृती होती. असं असतानाही कुठेतरी असंतोष होता कुठेतरी अस्वस्थता होती. आणि शिवसेनेची १९६६ साली स्थापना झाली. आता त्या घटनेलाही ४५ वर्षे झाली. या ४५ वर्षांचा इतिहास किंवा ५० वर्षांचा इतिहास किंवा ६१ वर्षांचा इतिहास किंवा १०० वर्षांचा इतिहास जर तुम्ही काढलात तर in terms of cultural icons किंवा in terms of cultural leadership तुम्हाला जर ग्राफ काढायचा झाला तर खाली खाली जाताना दिसेल. कुठेही आता बघितल्यानंतर महाराष्ट्रामध्ये असं आपल्याला एकदम उचंबळून यावं किंवा महाराष्ट्रात याच्याबद्दल आम्हाला प्रचंड अभिमान आहे असं अमेरिकेत जाऊन, बंगालमध्ये जाऊन किंवा तामिळनाडूत जाऊन सांगावं असं वाटत नाही. त्यांच्याकडे तरी काय आहे? त्यांच्याकडे काही नसेल कदाचित. दुसऱ्या कोणत्याही राज्याकडे कोणत्याही समाजाकडे, कोणत्याही संस्कृतीकडे किंवा मराठी व्यतिरिक्त इतर कोणत्याही भाषिक गटाकडे दाखवण्यासारखं काहीही नसेल. पण आपल्याकडे नाही हा अभिमानाचा मुद्दा होऊ शकत नाही. त्या सगळ्यांना आपल्याबद्दल हेवा वाटायला हवा असं जर महाराष्ट्र निर्माण झाल्यानंतर आपण केलं असतं तर आपल्याला खूपच बरं वाटलं असतं. खूप अभिमान वाटायची गरज नाही पण खूप बरं वाटलं असतं. आता आपण देशात कुठेही जातो, जगात कुठेही जातो, त्यावेळेला गेल्या साठ वर्षांत दाखवण्यासारखं काहीही नाही त्यामुळे स्वाभाविकपणे आपल्याला कोणते दाखले द्यायला लागतात? त्यामुळे एकदम १६३० ते १६८०! पण १६८० ते आतापर्यंत काय दाखवणार मी? टिळकांचं नाव घेऊ शकत नाही कारण ते ब्राह्मण आहेत. अजून कुणाची नावं घेऊ शकणार नाही कारण ते मराठा आहेत. काही लोक डॉ. आंबेडकरांचं नाव घेणार नाहीत. काही जणं फुल्यांचं नाव घेणार नाहीत. काही लोक शाहूमहाराजांचं नाव घेणार नाहीत. म्हणजे आताचे जे आहेत ते आहेत. .

एकेकाळी म्हणजे साधारणतः १९४९ ते १९५७ पर्यंत संयुक्त महाराष्ट्राची चळवळ फोफावेपर्यंत शेतकरी कामगार पक्ष एक आघाडीचा क्रांतिकारक पक्ष म्हणून ओळखला जात असे. आज जवळजवळ रायगड जिल्ह्याच्या पलीकडे शेकापचं नाव नाही, अस्तित्व नाही. शरद जोशींची शेतकरी चळवळ १९८० साली इतकी जोरात होती की पहिला शेतकरी पंतप्रधान झाला तर ते शरद जोशीच होतील इतकी ती चळवळ लासलगाव-चाकण परिसरात जोरात होती. जोशी आता राजकीय अर्थानं लयालाच गेलेले आहेत. संपूर्ण इतिहास पाहिला तर लयाला गेलेला इतिहास तुम्हाला जास्त आढळेल. अनिल काकोडकरांनी ज्याचा उल्लेख केला तो न्यूनगंड नाहीसा व्हावा अशी आपल्याला दुर्दम्य इच्छा झाली की आपण थेट शिवाजी महाराजांचं नाव घेतो. कारण १६८०

ते २०११ यातले मधले काही टप्पे वजा करता, मुख्यतः गेल्या पन्नास किंवा एकसष्ट वर्षात, आपण आपल्या कर्तबगारीनं या महाराष्ट्रात काहीही निर्माण केलेलं नाही. हा न्यूनगंड वाटण्याचा प्रश्न नाही, हा निराशावाद वाटण्याचा प्रश्न नाही, नाउमेद वाटण्याचा प्रश्न नाही. हा आत्मपरीक्षणाचा मुद्दा आहे. भारत १९४७ साली जेव्हा स्वतंत्र झाला त्यावेळी आपल्या देशामध्ये दारिद्र्यरेषेखाली असलेली लोकसंख्या ७८ टक्के इतकी होती. मध्यमवर्ग नावाची गोष्ट नव्हती. पोष्टातला कारकून, शिक्षक, एकाद्या बँकेतला कारकून हा मध्यमवर्ग होता. ज्यांच्याकडे एक महिना जर पगार मिळाला नाही कोणत्याही कारणानं तर जेवायची भ्रांत होती असा तो मध्यमवर्ग होता. आज त्या मध्यमवर्गाची भारतातली संख्या ३५ कोटी आहे. अमेरिकेतल्या एकूण लोकसंख्येपेक्षा पाच कोटी जास्त इतके मध्यमवर्गीय लोक आपल्या देशात आहेत. आणि मध्यमवर्गामध्ये सर्वांत आघाडीवर असलेलं राज्य महाराष्ट्र आहे. महाराष्ट्राएवढी शहरं इतर कोणत्याही राज्यात नाहीत. तुम्हाला जर विचारलं की बंगालमधल्या शहरांची नावं सांगा तर तुम्हाला कोलकात्यापलीकडे नावं नाही सांगता येणार, कारण त्यांच्याकडे जास्त शहरं नाहीच आहेत. उत्तरप्रदेश इतकं मोठं राज्य आहे तरी त्यांच्याकडची फक्त पाचच शहरांची नावं सांगता येतील. महाराष्ट्रात मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली, औरंगाबाद यासारख्या शहरांची संख्याच प्रचंड आहे. मध्यमवर्गाची संख्या प्रचंड, शिकलेल्या लोकांची संख्या प्रचंड आहे. असं असूनसुद्धा हा मध्यमवर्ग, स्वतःला सुशिक्षित म्हणवणारा आणि सुशिक्षिततेबरोबर सुसंस्कृतता येते असं दुर्दैवानं गृहीत धरणारा. असा मध्यमवर्ग देशात सर्वांत जास्त आपल्या राज्यात असूनसुद्धा जर महाराष्ट्राची ही अवस्था असेल तर आपण बिचाऱ्या ओरिसाकडनं काय अपेक्षा करणार?

आपल्याला खूप करण्यासारखं आहे. पुढच्या दहा वर्षांतसुद्धा पण त्यासाठी निदान व्यक्तिगत पातळीवर आत्मपरीक्षण करून कशाबद्दल अभिमान ठेवायचा आणि कशाबद्दल दुरभिमान ठेवायचा नाही एवढं जरी आपल्या मनाशी पक्कं झालं तरी बरंच साध्य होईल. दहा कोटी माणसं त्या संघर्षात जाणीवपूर्वक व्यक्तिगत पातळीवर आणि संघटित पातळीवर उतरतील तेव्हा मला असं वाटतं, जे पन्नास वर्षांत आपण गमावलं ते पुढल्या दहा वर्षात कमावू शकू. ●

*With Best Compliments From*

**SANTIGO TEXTILE MILLS PVT. LTD.**

J/192 MIDC Tarapur, Dist Thane, Boisar 401506

**Phone (Res.) : 272790**

*With Best Compliments From*

# NAMA SHIVAASTHU
## CONSTRUCTIONS PVT. LTD.

**Santosh M. Raut**

Director

-: Admin. Office :-

6, Mahavir Villa Bldg., Mahim Road, Palghar,
Dist. Thane, Maharashtra, INDIA
E-mail : nscpvt@gmail.com I santoshmraut@rediffmail.com

**Tel.: 02525 - 240124 / 240224 I M.: +91 9822009551**

बृहन्महाराष्ट्र
मंडळ
अधिवेशन,
शिकागो

# लोकपाल की लोकइच्छा!

◆ *प्रफुल्ल पाठक*

**गत** मार्च महिन्याचा शेवटचा आठवडा असावा. कुठेतरी कामानिमित्त निघालेल्या माझ्यासमोर असलेल्या गाडीची नंबर प्लेट आणि त्याच्यावरचा कापडाचा फलक, दोन्हीकडे माझे एकाच वेळेस लक्ष गेले. दिल्लीत राहायला आल्यापासून असे होतेय. सतत दिल्ली अथवा हरियाना येथल्या गाड्यांमध्ये एखादी महाराष्ट्र, आंध्र अथवा तामिळनाडू येथील गाडी नंबर प्लेटवरून लगेच वेगळी लक्षात येते. त्यात महाराष्ट्रामधून आलेली गाडी कुठल्या जिल्ह्यातील आहे हेपण बऱ्यापैकी कळते. पण आता इथे फक्त मराठीपणा जवळ आणतो. इतर वेळा आपल्या राज्यात एकमेकांना विविध कारणांनी विलग करणारे, इथे मात्र मराठी बोलणारा तो महाराष्ट्रीय अशा 'मोठ्या मनाचे' बनतात. जात, पोटजात, पंथ, तालुका, जिल्हा अशा सीमा संपतात.

ती गाडी महाराष्ट्रातील होती आणि त्यावरील फलक– '४ एप्रिल'पासून दिल्ली येथे उपोषणाद्वारे सुरू होणाऱ्या आंदोलनाबाबत सांगत, त्यात सहभागी होण्यास आवाहन करत होता. उपोषणाचा इशारा, माहितीचा अधिकार सामान्य जनतेला मिळवून देणाऱ्या समाजसेवक अण्णा हजारे यांनी दिला होता. या वेळचे आंदोलन दिल्लीच्या गाडीने सामान्य माणसाला लोकपाल बिलाच्या माध्यमातून सहभागी करावे, तसेच भ्रष्टाचाराच्या खटल्यात पंतप्रधानांसकट सर्व मंत्र्यांना आणून या कायद्याच्या अंतर्गत चौकशी, शिक्षा याचे अधिकार मिळावेत या मुद्यावर होते. त्यासाठी एक सर्वमान्य समिती असावी, त्यात कोण समाविष्ट असावे, कोण नसावे, कोण असेल तर कोण नसेल... इत्यादी.

दिल्लीच्या विमानतळावर जेव्हा अण्णा हजारे उतरले आणि जंतरमंतर या त्यांच्या ईप्सित स्थळी जाण्यासाठी निघाले तेव्हा त्यांच्यासोबत अवघे मोजण्याइतके लोक होते, पण जंतरमंतरवर काय मंत्र उच्चारले गेले कुणास ठाऊक! यच्चयावत मीडिया/माध्यमांनी त्यांना कव्हर करायला सुरुवात केली. आजच्या काळातील जनमत अजमावण्याचे आणि त्यातल्या त्यात विश्वासार्ह माध्यम म्हणजे 'इंटरनेट' आणि सोशल नेटवर्किंग वेबसाईट. सर्व त्याग करून, मंदिरात वास्तव्य असलेले, आपल्या राहत्या गावाला आदर्श गाव स्थापित करणारे, साधे अन् शुभ्र वस्त्र नेसलेले अण्णा म्हणजे सडलेल्या, किडलेल्या, भ्रष्ट झालेल्या समाजकारणाविरोधात लढत असलेली व्यक्ती. विश्वासार्ह वाटली सगळ्यांना. इंटरनेटच्या माध्यमातून त्याला मिळालेला प्रतिसाद सर्वांना आश्चर्याने थक्क करून गेला. लाखोंच्या संख्येने लोकसहभाग व प्रतिसाद मिळतोय असे दिसले. तसे बघायला गेले, तर संख्या बघू जाता 'प्रचंड' प्रतिसाद मिळाला, पण दुसरी बाजू याला आहे.

एका मराठी लेखकाने सोशल नेटवर्किंग साइटवर स्वतःला नोंदीकृत केले. (रजिस्टर केले.) अवघ्या तीन महिन्यांत त्याच्यासोबत नोंद झालेल्या/जोडल्या गेलेल्या व्यक्तींची संख्या ५०००पर्यंत पोहोचली आणि त्या व्यक्तीला आपले दुसरे अकाउटंट सुरू करावे लागले. जी व्यक्ती आपल्या गल्लीत उभी राहिली तर तिच्यासोबत ५० लोक सहभागी होणे कठीण व अशक्य होते त्याच्याशी ५००० पेक्षा जास्त जण सोबत येतात. त्याला एका प्रतिक्रियेवर २०० व

३०० प्रतिक्रिया येतात. हे सांगण्याचे कारण एवढेच की नेटच्या जगात संलग्न होणे सहज शक्य आहे. बसल्या जागी एका क्लिकद्वारे तुम्ही तुम्हाला पटणाऱ्या वा न पटणाऱ्या गोष्टीशी संलग्नता दाखवू शकता. त्यामुळे 'अण्णांच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाला' लाखो क्लिक मिळाल्या. त्या जगभरातून होत्या. त्याची पद्धत सोपी होती. त्याची नोंद ठेवणेपण सोपे होते. या गोष्टीचा प्रचार करून जंतरमंतरवर तरुणांची संख्या वाढली, अथवा कोणीतरी मुद्दाम वाढवली. या आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी, त्याला पाठिंबा देणाऱ्या राजमान्य व्यक्ती आणि गट बघितल्यावर हसावे की रडावे असा प्रश्न सामान्यांना नक्कीच पडला असेल. ज्यांच्याविरुद्ध, काही जणांच्याबद्दल व्यक्तिगत नसेल तरी, त्यांनी धारण केलेल्या पदाविरुद्ध हे आंदोलन असताना, त्या व्यक्तींनीपण व्यक्तिगत पाठिंबा खुलेआम जाहीर केला. भ्रष्टाचारविरोधी आंदोलनात ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप असतील किंवा ज्यांना समाज भ्रष्टाचारी म्हणून ओळखतो, ज्यांची जीवनशैली, कार्य हे भ्रष्ट मार्गाशी संलग्न आहे असेसुद्धा! म्हणजेच समाजाचा एक मोठा वर्ग. मग असा प्रश्न निर्माण झाला की हे भ्रष्टाचारविरोधी आंदोलन सुरू कोणाविरुद्ध आहे? सगळा समाज अण्णांच्या भ्रष्टाचारविरोधी अभियानाला पाठिंबा देता झाला. निदान असे चित्र जाणवत होते.

भ्रष्टाचार म्हणजे भ्रष्ट आचार. समाजातील व्यक्तींची, माणसांची जी कृती सन्मार्गाला, चांगल्या, नैतिक मार्गाला अनुसरून नाही ती भ्रष्ट. आजच्या काळात भ्रष्टाचार हा शब्द सरधोपटपणे पैशांचा गैरव्यवहार या अर्थाने वापरला जातो. भ्रष्ट वागण्याची प्रवृत्ती आजच्या समाजात जन्मापासून मरणापर्यंत इतकी सहज चिकटली आहे की बऱ्याच अंशी भ्रष्टाचारात फायदा मिळवणारा अन् फायदा करून देणारा किंवा काही अंशी नाडला जाणारा... कुणालाही यात काही गैर वाटत नाही. फायदा करून घेणारा किंवा नादावणारा याला बहुधा पैशांच्या रूपात फायदा होतो. तो व्हावा म्हणून तो समोरच्याच्या मार्गात अडथळा आणतो. नियमावर बोट ठेवतो. नाडला जाणारा कचाट्यात सापडलेला असतो. एक तर त्याचे नुकसान होणार असते किंवा त्यालाही काही फायदा होणार असतो. कदाचित ती गोष्ट होणे किंवा घडणे त्याच्यासाठी आवश्यक असते. कधी कधी त्यात होणारे नुकसान हे त्याशिवाय होणाऱ्या नुकसानापेक्षा कमी असते. पर्यायाने, तो आपले नुकसान कमी होणार, म्हणजे आपला फायदा आहे असा समज करून भ्रष्ट मार्गात सहज सामाविष्ट होतो. भ्रष्टाचारातला फायदा होणारा जितका दोषी तितकाच त्या मार्गासाठी उद्युक्त करणारा, पैशांच्या रूपात लाच देणारासुद्धा गुन्हेगार असावा की नसावा यावर कधी कधी चर्चा सुरू होते.

काही उदाहरणांवरून आपण भ्रष्टाचार कसा समाजमान्य झाला आहे ते बघू.

मूल जन्माला आल्यावर तत्संबंधी कागदपत्रे शासन–दरबारी योग्य वेळी नोंद करण्याचे बऱ्याच जणांच्या गावीही नसते. मुलगा किंवा मुलगी जेव्हा शाळेत दाखल करायची वेळ येते तेव्हा मग धावपळ उडते. साधारण एकाच वेळेस असे अनेक पालक मग जन्माचा दाखला घेण्यासाठी शासन–दरबारी धाव घेतात. कमीत कामी वेळात जास्त लोकांचे एकाच काम संबंधित कर्मचाऱ्याकडे असते. तो अनुभवातून जाणून असतो. तो मुद्दाम काम हळू करतो, दिरंगाई करतो. समोरच्याला अतिशय नड असते. मग तो साहजिकच आपले नुकसान होऊ नये म्हणून किंवा आपण योग्य वेळी हे काम केले नाही आणि दाखला तर मिळाला पाहिजे म्हणून समोरच्या कर्मचाऱ्याला आपले काम लवकर करून द्यावे म्हणून 'बोलणी' करतो. याला प्रचलित शब्द 'ऑफर' आहे. प्रचलित अन् सर्वांना माहीत असलेला मार्ग हा पैसे देऊन दाखला पदरात पाडून घेणे आहे. मग त्यांच्यात 'योग्य' व्यवहार घडतो.

परगावी राहायला गेल्यामुळे किंवा ऑफिसमधून सारखीसारखी सुट्टी मिळू शकत नसल्यामुळे आणि आपला वेळ वाया कोण घालवेल म्हणून आपण हे केले नाही आणि पैसे देऊन काम करून घेतले म्हणजे परगावाहून पुन्हा येण्याचे श्रम अन् पैसा वाचवला, सुट्टी वाचवली किंवा वेळ अन् गाडीभाडे किंवा पेट्रोल वाचवले असा फायद्याचा विचार करून आनंदाने भ्रष्टाचाराला खतपाणी घालतो. आपण खतपाणी घालतोय हे त्याच्या गावीपण नसते. शिवाय, काही दिवसांनी आपण कसे हुशारीने काम केले आणि असेच काम करून घ्यावे लागते अशा चारचौघांत फुशारक्या मारायला ही व्यक्ती मोकळी होते. या अशा फुशारक्यांमुळे त्या व्यक्तीची हुशारी ऐकणाऱ्याचा असा समाज होतो की आजकाल आपल्याला हवे ते काम असेच करावे लागते. ती मानसिकता बनते. कामे अशीच करावी लागतात अशी समाजमान्यता मिळते.

जर एखाद्या सच्च्या व्यक्तीने सांगितले की मी अमुक

काम कुठलेही वरखर्च ना करता केले तर त्यावर विश्वास ठेवायला कोणी तयार होत नाही. त्याच्याबद्दल विविध गैरसमज पसरवले जातात. त्याने पद वापरले असेल, ओळख काढली असेल, पण आपल्याला सांगत नाही अशी मते त्याच्या माघारी व्यक्त केली जातात. हे अशक्य आहे असे अनेक लोक एकसुरात म्हणायला लागतात. लोकशाहीमध्ये निर्णय अनेकांच्या पाठिंब्यावर होतात. बहुमत लागते लोकशाहीत. म्हणजे खरी व्यक्ती एकटी पडते. वाममार्गाला राजमान्यता देणाऱ्यांची संख्या जास्त झाल्यामुळे साहजिक भ्रष्ट मार्गाने जाण्याचा प्रचार होतो.

असाच प्रकार शाळेत प्रवेशाचा. प्रत्येकाला सगळ्यात चांगल्या शाळेत, जिचे समाजामध्ये नाव आहे, त्या शाळेत आपली मुले जातात म्हणजे आपल्याला खास, विशिष्ट म्हणून मिरवता येऊ शकते, अशी शाळा मुलांसाठी हवी असते. महापालिका, जिल्हापरिषद अशा शासकीय शाळा नको असतात. मग चांगल्या किंवा समाजमान्य शाळेत प्रवेशासाठी लढाई सुरू होते. त्या शाळेत फक्त पहिल्या १०० जणांना प्रवेश मिळणार आणि आपला नंबर त्यात लागावा म्हणून आदल्या रात्रीपासून प्रवेश खिडकीसमोर स्वत: किंवा आळीपाळीने किंवा नोकर माणसाद्वारे उभे राहणारे आहेत. त्याचबरोबर, संचालक मंडळाच्या कोट्यातून अथवा ओळखीने अथवा भरघोस देणगी देऊन शाळाप्रवेश घेणारे असतात. या सगळ्या भ्रष्टमार्गाचा वापर आपण कसा खुबीने केला किंवा आपण कसे सधन आहोत याचे किस्से अभिमानाने सांगितले जातात. थोडक्यात काय, जी गोष्ट ज्याला हवी आहे ती मिळण्यात अडचण येणार असे वाटल्यावर त्या संबंधित व्यक्तीला भ्रष्ट मार्गाने आपल्या गोटात ओढून ती मिळवणे ही एक नियमित घडणारी गोष्ट झाली आहे. यात आपण गैरमार्ग अथवा भ्रष्ट मार्गाचा अवलंब केला याची जाणीव समाज ठेवत नाही. मला मिळाले, मी मिळवले म्हणजे झाले. बाकीच्यांचे काय! हे बेफिकीर व मतलबी वृत्ती प्रचंड वाढली आहे.

मागणी आणि पुरवठा यांच्यातला ताळमेळ बिघडला आणि मागणी वाढली व पुरवठा पुरेसा नसल्यामुळे भ्रष्ट मार्गाचे अवलंबन वाढले आहे. यासाठी उदाहरण घ्यायचे झाल्यास आपण रेल्वेचे घेऊ शकतो. रेल्वेमध्ये ठरावीक जागा उपलब्ध असतात. काही मंडळी दोन-तीन महिने आधीपासून आरक्षण करतात. काहींचे प्रवास आयत्या वेळी ठरतात. तेव्हा जागा जवळपास संपलेल्या असतात. काही जागा प्रवास करणाऱ्यांचे कार्यक्रम बदलामुळे उपलब्ध होत असतात. अशा उपलब्ध जागांसाठी संबंधित पर्यवेक्षक (टी टी इ) गाठून, त्याला पैसे देण्याचे आश्वासन देऊन आयत्या वेळी येणारी मंडळी जागा मिळवतात अन् प्रतीक्षा यादीमधील ज्या प्रवाशाला जागा मिळायला हवी त्याला न मिळता भ्रष्ट मार्गाचा अवलंब करणाऱ्याला मिळते. त्याचा हिशोब असा असतो, की मी जर रात्र शहरातल्या हॉटेलमध्ये काढली असती तर मला जेवढे पैसे द्यावे लागले असते त्याच्या एकतृतीयांश रकमेमध्ये मला रेल्वेमध्ये झोपायला मिळाले. माझा प्रवास सुखाचा झाला. पण याच्यामुळे ज्याला जागा मिळायला हवी होती त्याला मात्र त्रास झाला ह्याची त्याला जाणीव असली तरी त्याची काळजी नसते. यावर उपाय म्हणून, रेल्वेला जास्त पैसे देऊन वेळेवर येणाऱ्या प्रवाशांना जागा उपलब्ध करण्यात आली. त्यावर नवी शक्कल लगावून, त्या जागा आधीच आरक्षित करून प्रवाशांना आपल्याकडे येण्यास एजंट बाध्य करतात. एजंटकडे आरक्षित जागा मिळते कळल्यावर गरजू व्यक्ती तो मार्ग पत्करते. इथे मागणी व पुरवठा या तत्त्वावर 'वरची' रक्कम कमीजास्त होते. अशा भ्रष्ट पण समाजमान्य झालेल्या मार्गावर जाणे नाइलाजाने का होईना क्रमप्राप्त होते. यावर उपाय म्हणून रेल्वेने इ तिकीट सुरू केले. यासाठी ओळखपत्र सोबत असणे आवश्यक केले. या नियमाचा आधार घेऊन संबंधित पर्यवेक्षक प्रवाशाला नाडायला लागले. नियमावर बोट ठेवून, तुम्ही नियम तोडला म्हणून तुम्हाला दंड भरावा लागतो. तो दंड भरायचा नसेल तर संबंधितासोबत बोलणी करून, ठरलेली रक्कम देऊन सुटका होते. कालानुरूप सोयीसवलती वाढत असल्या तरी अशा भ्रष्ट मार्गाची समाजात वावरणाऱ्यांना इतकी सवय झालीय की हे मार्ग भ्रष्ट आहेत हे समाज विसरला की काय असे वाटावे.

नियम बरहुकूम वागायचे नाही आणि नियम तोडूनही पकडले गेलो नाही तर फावले आणि पुन्हा नियम तोडायला मोकळे झालो या मतप्रवाहाच्या लोकांची संख्या खूप आहे. त्यातल्या त्यात रोज त्या मार्गाने व चक्रात मार्गक्रमण करणाऱ्यांना तर याची सवय आहे. अनेक वेळा नियम तोडला आणि त्यात एखाद्या वेळी पकडलो गेलो तर दंड भरून अथवा बोलणी करून थोडेफार पैसे देऊन सुटका करू ही मानसिकता वाढली आहे. पावलोपावली नियम तोडणे, चुका करणे ही सहजप्रवृत्ती झाली आहे. ते निस्तरण्यासाठी आणि

कायद्याच्या कचाट्यातून सुटका करून घेण्यासाठी जे मार्ग अवलंबले जातात ते भ्रष्ट आहेत, चुकीचे आहेत याची कदर न करणाऱ्यांची संख्या प्रचंड वाढली आहे.

आर्थिक घोटाळ्यांना आपण 'भ्रष्टाचार' म्हणतो, पण आपापल्या रोजच्या वावरण्यात आपण अनेक गैर गोष्टी करतो, ज्या नैतिक नाहीत. एके काळी आपल्या देशात अशा गोष्टींना 'पाप' या सदराखाली ओळखले जायचे. ते वाईट आहे हे आपल्या मनावर ठसवले होते. पण आर्थिक स्वातंत्र्याचे वारे, जागतिक खेड्याची संकल्पना, तांत्रिक दृष्ट्या आदानप्रदानात झालेली वेगवान वाढ- टीव्हीमुळे घरात जगभरातल्या चांगल्यावाईट गोष्टी, इंटरनेटमुळे होणारे आदानप्रदान, विमानांमुळे जगभर फिरण्याची सोय-यामुळे आपण इतर संस्कृती-चालीरीती यांच्या जवळ आलो. स्वतःला पुढारलेले, म्हणजे मागासलेले/मागे न राहिलेले, दाखवण्याच्या स्पर्धेत आपण मदर्स डे , फादर्स डे यांसारखे डे साजरे करतो, पण वृद्ध आईवडिलांना वृद्धाश्रमात सोडतो. परदेशात कमाला बाई मिळत नाही, मिळाली तरी परवडत नाही त्यावेळी आपल्या भारतात राहणाऱ्या आईबाबांना अमेरिका दाखवायला आणायचे अन् त्यांच्याकडून आपल्या तान्ह्या बाळाचे संगोपन करायचे. ते स्वस्तात पडते. हा स्वार्थ अन् परमार्थ आहे. आईबाबांवर अमेरिकावारीचा खर्च करून परमार्थ अन् त्यांना अमेरिका दाखवली म्हणून त्यांची 'बाल संगोपनासाठी' मदत घेतली हा स्वार्थ. बरोबर याच वेळेस का अमेरिकावारी होते? तत्पूर्वी वर्ष-दोन वर्षे मुलगा अमेरिकेत असतो. तेव्हा नाही वाटत पालकांना अमेरिका फिरवावी म्हणून! हे सगळे भ्रष्ट आचार नाहीत का?

प्रशासनाने जशा सवलती, अधिकार द्यायला हवेत तसेच आपल्याही काही जबाबदाऱ्या आहेत आणि त्या योग्य रीतीने पार पडल्या जातात की नाही हे पाहणे सामान्याची जबाबदारी आहे हे समाजाला ह्या नेतृत्वाने सांगायला हवे. सुदृढ अन् जबाबदारीने वागणारा समाज निर्माण झाला तर अशा आंदोलनांची वेळच येणार नाही. इंग्लंडमध्ये क्रिकेट मॅचच्या वेळेस मैदानावर खेळाडू अन् प्रेक्षक यांत कुंपण नसते. आपल्या येथे ते घालावे लागते. आपण जबाबदारीने वागत नाही म्हणून अशा निर्बंधांना सामोरे जावे लागते. तिथले प्रशासन आपल्याला कुठलीही वस्तू अथवा पदार्थ घेऊन आत जाऊ देत नाही. मग आत मिळणाऱ्या वस्तू महाग मिळतात. अडवणूक करणे शक्य आहे अन् समोरच्याला दुसरा पर्याय उरत नाही तेव्हा वस्तू महाग विकणे हापण एक भ्रष्ट मार्ग. याला जबाबदार आपणच.

राजकीय क्षेत्र आणि त्यातल्या भ्रष्ट बाबींबद्दल चवीने बोलले जाते. चर्चा होतात. पण एकूणच काळ बदलला आहे. असे म्हणतात, की पूर्वीच्या काळी राजकीय कार्यकर्ता आपल्या घरची मीठभाकरी खाऊन राबायचा. कार्यकर्ता अन् नेता यांच्यात खूप फरक नसायचा. आजकाल दोघांमधील दरी वाढली असे त्यातले जाणकार म्हणताना ऐकले जाते. साहजिकच स्वतःच्या घरची मीठभाकरी खाण्याच्या ऐवजी त्यांना ज्याच्यासाठी कार्य करायचे त्याच्याकडून अपेक्षा वाढल्या. निष्ठावंतांऐवजी व्यावसायिक कार्यकर्ते जन्माला आले. पैसा व तत्सम बोलणी करून ठरावीक वेळेत ठरावीक काम करणारे वाढले. साहजिकच नेत्यांचे खर्चाचे बजेट फुगले. या वाढलेल्या खर्चाची पूर्ती करण्याचे मार्ग त्यांना शोधावे लागले. ते मार्ग भ्रष्ट अवलंबावे लागले तर त्यात नवल काय.

प्रसारमाध्यमेसुद्धा निष्ठावंत न राहता व्यावसायिक झाली. त्यांनासुद्धा सुगीचा काळ कळायला लागला. नेत्याला कुठे खिंडीत गाठायचे ते कळायला लागले. खिंडीत गाठल्यावर कुणीही आपली सुटका करण्यासाठी बोली लावणारच. त्याच्या आर्थिक, सामाजिक परिस्थितीप्रमाणे बोली ठरते. अधिकाऱ्याच्या दारावरच्या दरवानाला लागणारी बोली दोन आकडी असेल, तर नेत्यामध्ये व प्रसारमाध्यमामध्ये लागलेली बोली ही कल्पनेच्या पलीकडली असते असे त्या क्षेत्रातले जाणकार सांगतात.

हे सगळे होणारे अन् वाढलेले खर्च भरून काढायचे तर जी व्यक्ती बोली देते ती स्वतः ते वसूल करण्याचे मार्ग शोधणारच. देणारा अडल्यावर जेवढे देतो त्या प्रमाणात तो दुसऱ्याला अडवून वसूल करणार. काही महाभाग पुढची बेगमी करून ठेवावी लागते म्हणून अधिक वसुली करतात असे ऐकिवात आहे. ह्यातले काही खरे आहे असे मानले तरी एकंदरीत 'खर्च' हा भाग वाढल्यामुळे त्या प्रमाणात 'उत्पन्न' वाढवायला हवे हे आजचे तत्त्व. कोणे एकेकाळी आपल्याकडे अंथरूण पाहून पाय पसरावे ह्या विचारांना प्राधान्य होते. आजच्या जगात पाय शक्य तितके पसरावे, म्हणजे अंथरूण वाढवता येते असे युवकांना मार्गदर्शन करताना म्हटले जाते. थोडक्यात काय, 'खर्च' वाढवा अन् मग ते भागवायला उत्पन्नाचे रास्त भ्रष्टमार्ग अवलंबा ही मार्गदर्शिका झाली आहे.

पूर्वीच्या काळी प्रसारमाध्यमांची संख्या मर्यादित

असायची. कालांतराने त्यात वाढ होत गेली. यात उतरलेले बहुतांश व्यावसायिक अजून तग धरून आहेत याचा अर्थ असा काढता येईल, की त्यांना यातले अर्थकारण जमले आहे. यातही पुन्हा गट तट पडले आणि त्यांच्या माध्यमातून जनतेला घडणाऱ्या गोष्टी त्यांच्या चष्म्यातून पाहायला मिळायला लागल्या. एकमेकांच्या उखाळ्या-पाखाळ्या काढताना आणि काळा अथवा भ्रष्ट भाग जगासमोर आणताना अनेक नवे भ्रष्ट मार्ग प्रत्येकाच्या दिवाणखान्यात, झोपडीझोपडीत पोचले. हे सर्व चोवीस तास उपलब्ध असल्यामुळे भ्रष्टाचाराचे नवीन नवीन मार्ग, पद्धती दर्शकांपुढे पोचल्या. प्रशासनातले आणि कायदा राबवणाऱ्यांचे रास्त वागणे लोकांपर्यंत पोचण्याऐवजी भ्रष्ट वागणे पोचले अन् तेच लोकांना लक्षात राहायला लागले. अनाहूतपणे, अनावधनाने किंवा व्यावसायिकतेचा भाग म्हणून माध्यमे, जगात झालेली वाढ, भ्रष्ट गोष्टी जास्त वेगाने लोकमानसात पोचवती झालीत.

आपल्या अवतीभवती सर्वत्र असे भ्रष्ट वातावरण आहे. आपण वेगळे वागून फायदा नाही असा भ्रष्ट विचार रास्त ठरायला लागला. आपण जी भ्रष्ट गोष्ट करतो ती इतर सुद्धा करतात आणि मी त्यातला एक म्हणून राहायला काय हरकत आहे असे समाजातील सामान्यालासुद्धा वाटायला लागले. दुसऱ्याच्या अज्ञानाचा फायदा घेऊन, त्याची अडवणूक करून पैसे उकळण्याचे वाईट वाटेनासे झाले. मी माझ्या मुलासाठी जे म्हणून मेहनतीचे पैसे, मजबुरी म्हणून दिले, ते मी भ्रष्टमार्गाने मिळवून फिट्टमफाट केली तर काय हरकत आहे असा विचारसुद्धा बळ धरायला लागला. माझ्यावर अत्याचार झाला म्हणून मी माझ्यापेक्षा दुसऱ्या एखाद्या कमजोर व्यक्तीला अडवून 'कमाई' केली तर काय चूक केली, असा विचार करून या भ्रष्ट वागणूक असणाऱ्यां-मध्ये नवी भरती होत गेली.

अशा अत्याचाराला बळी पडत गेलेली माणसे अन् त्या अत्याचार करणाऱ्यांपैकी एक झालेल्यांची समाजातील संख्या वाढली. वर उल्लेख केलेल्या व तत्सम प्रकारांत समाविष्ट असलेली, पण जागेअभावी न घेतलेली अनेक उदाहरणे यात सामील होतात. काही आपल्यावर अन्याय झाला म्हणून त्या प्रकाराला आपलेसे करतात. जे या सर्व प्रकारापासून दूर आहेत अन् सामान्य म्हणून जगत आहेत त्यांना या सर्व आंदोलनाचे काही देणेघेणे असेल याबाबत शंकाच आहे.

अण्णा हजारे यांनी माहितीच्या अधिकारासाठी लढा दिला. तो यशस्वी झाला. या अधिकाराचा उपयोग सामान्य माणसाने फारच क्वचित केला असेल. याचा उपयोग हा सत्कार्यापेक्षा वाममार्गासाठीच झाला असे बोलले जाते. एकमेकांची उणीदुणी काढणे, जुने हिशोब चुकवणे, याद्वारे माहिती मिळवून समोरच्याला त्रास देणे, अडचणीत आणणे आणि शक्य झाल्यास समोरच्याची अडवणूक करून त्याद्वारे पैसे कमावणे, यामुळेच माहितीचा अधिकार जास्त गाजला आहे.

कुठलेही शस्त्र दुधारी असते असे म्हणतात. त्याचा वापर तुम्ही कसा करता यावर ते अवलंबून असते. माध्यमांनी जर विशिष्ट प्रकारे त्याचा वापर केला तर त्यांची शक्ती असामान्य आहे, पण हीच माध्यमे याचा गैरमार्गाने वापर करतात तेव्हा नको त्या गोष्टी जनमानसात पोचतात आणि त्यांचा नको तो परिणाम जनमानसावर होतो. समाजातील फार थोड्या व्यक्तींना चांगलेवाईट यांतला फरक करता येतो आणि एक मोठा वर्ग वाईट गोष्टींना आपलेसे करतो. स्पर्धेच्या या युगात आपण जे करतो, दाखवतो ते वाईट गोष्टी प्रोजेक्ट करेल हा विचार दुर्दैवाने येत नाही आणि आला तरी व्यावसायिक बंधनामुळे पर्याय उरत नाही.

अशा समाजाला घेऊन त्याचे नेतृत्व अण्णा करत आहेत. अण्णा आणि त्यांच्या हेतूबद्दल शंका नसावी, पण त्यांच्या भोवती जो समाज आहे त्यातले किती सज्जन आहेत हा प्रश्नच आहे. कारण सज्जन माणूस असल्या कसल्याही फंदात बहुधा पडत नाही. आपण बरे अन् आपले काम आणि जगणे बरे, कोणीही आपल्या आयुष्यात खूप फरक पाडू शकणार नाही असा त्याचा विचार असतो. आपला काहीतरी फायदा होईल या अनुषंगाने जमणारे लोक यात जास्त सापडतील.

आजच्या या स्पर्धेच्या जगात नीतिमत्ता पाळून यशस्वीततेचे शिखर गाठणे हे एक दिव्यच आहे. सामान्य माणसाला चार जणांना जेवू घालणे आजकाल कठीण झाले असताना हजारो लोकांचा आंदोलन काळातला खर्च कसा चालतो, आंदोलनस्थळी असलेली व्यवस्था करण्यासाठी येणारा लाखोंच्या घरातला खर्च कोण, कुठून, कसे करतात असे सध्या दबक्या आवाजातले प्रश्न पुढे मोठ्याने येतील. सगळा समाज जरी भ्रष्ट नसला तरी बहुतांश समाज या मार्गाला सरावत चालला आहे. अशा समाजव्यवस्थेत हे आंदोलन योग्य दिशेने पुढे जाईल का, हाच खरा प्रश्न.

**प्रफुल्ल पाठक**
४८०, एशियन गेम्स व्हिलेज कॉम्प्लेक्स,
न्यू दिल्ली-४९
prafullapathak@gmail.com

# रवींद्रनाथांची विश्वात्मक रूपे

◆ *कुमार नवाथे*

**महात्मा** गांधींनंतर जगन्मान्यता मिळवलेले तेवढेच प्रभावी दुसरे भारतीय व्यक्तिमत्त्व म्हणजे रवींद्रनाथ टागोर.

गांधींच्या अभिनव सत्य-अहिंसेच्या कृतिशील आचरणामुळे भारतीय संस्कृतीची ओळख जगाला नव्याने झाली. महात्मा गांधी ही व्यक्ती न राहता तो एक विचारप्रवाह झाला. ती करोडोंची शक्ती बनली. जगातील अर्धभुकेल्या, कंगाल देशांपासून जपान-अमेरिकेसारख्या संपन्न देशांतील धनवानांपर्यंत गांधीविचार स्फूर्तिस्थान झाले. महात्मा गांधी समाजकारणी, राजकारणी, प्रचंड समूहात मिसळणारे, बोलणारे, सत्याग्रह करणारे व्यक्तिमत्त्व होते. वाऱ्याप्रमाणे त्यांचा सर्वत्र मुक्तसंचार होता.

रवींद्रनाथ टागोर 'शांतिनिकेतन'मधील ऋषितुल्य, मंद, संथ वाहणाऱ्या नदीचे दुसरे रूप. रवींद्रनाथांच्या ज्ञानभांडाराचा आवाका मोजता न येणारा होता. त्याची खोली कल्पनेबाहेरची होती. त्यांना कितीतरी कलागुणांचा वरदहस्त मिळाला होता. त्यांची साहित्य, संगीत आणि इतर अनेक कलांतील गती गहरी होती. त्याच्या दूरवरच्या पडसादाचे उत्तम प्रत्यंतर म्हणजे आज दीडशे वर्षांनंतरही त्यांच्या जन्मवर्षाचे, जगभरातील त्यांच्या विद्वत्तेची जाण असणाऱ्यांकडून होणारे त्यांचे उत्स्फूर्त स्मरण.

रवींद्रनाथ टागोर तरल संवेदनशील मनाचे महाकवी होते. बंगाली या त्यांच्या मातृभाषेत त्यांनी प्रसवलेली 'गीतांजली' एक अजरामर काव्यकृती ठरली आणि रवींद्रनाथांना या काव्यामुळे मिळालेला नोबेल पुरस्कार साऱ्या आशिया खंडाचा सन्मान ठरला. १९१३ सालापर्यंत एकही आशियाई या सन्मानाच्या जवळपासही पोचला नव्हता. रवींद्रनाथ पहिले 'आशियाई साहित्यरत्न'; ज्यांनी भारताची साहित्यसंपदा पाश्चिमात्यांच्या नजरेसमोर आणली. अनेक परदेशी भाषांमधून गीतांजलीचे अनुवाद झाले आणि पाश्चात्त्य समाजधुरीणांची, पूर्वेच्या ज्ञानाची उत्सुकता जास्त चाळवली गेली. गीतांजली मोठ्या आवडीने अभ्यासली जाऊ लागली. रवींद्रनाथ जसजसे वेगवेगळ्या भाषामाध्यमांतून जगभरात माहिती होऊ लागले तसतसा त्यांच्या साहित्यआस्वादकांचा चाहतावर्गही जगभर विस्तारला. रवींद्रनाथांच्या साऱ्या ग्रंथसंपदेपैकी कोणत्या एकालाही स्पर्श केला तरी त्याचे सखोल अध्ययन हे आयुष्यभर पुरणारे आहे. साहित्याचा कोणताच प्रकार रवींद्रनाथांच्या बहुश्रुततेतून, लिखाणातून राहून गेलेला नाही. जे अनेक कलाकार, लेखक, कवींकडून निर्माण होते त्या साऱ्याचा एकसमन्वय रवींद्रनाथांच्या सिद्धहस्तातून झाला आहे. रवींद्रमहती म्हणूनच ठायीठायी, देशोदेशी विभिन्न भाषा, धर्मसंस्कृतीत सहजपणे मुरली गेली.

रवींद्रनाथ कवी होतेच, त्याशिवायही खूप काही होते. पारतंत्र्यात राहणाऱ्या रवींद्रनाथांची देशभक्ती प्रखर होती. अनेक लघुकथा त्यांनी लिहिल्या. उत्तम नाटके लिहिली कारण नाटककाराचे बीज त्यांच्यात मुळापासून होते. कादंबरीसारखा चिकाटीने लिहिण्याचा त्यांचा पिंड उत्तम कादंबरींना जन्म देऊन गेला. रवींद्रनाथ शिक्षणतज्ज्ञ असल्यामुळेच शांतिनिकेतनसारखे जागतिक कीर्तीचे ज्ञानपीठ नुसते उभे राहिले नाही तर वेगवेगळ्या देशांतील विद्यार्थ्यांना आकर्षित करत राहिले. हिंदूधर्माच्या पारंपरिक वेद संस्कृतीच्या त्यांच्या

अभ्यासाने भक्तिभावाचे पडसाद त्यांच्या साऱ्या देहबोलीतून जाणवत राहायचे. कवितांइतकीच त्यांची गीते भारतवर्षात व शेजारील देशांत भरतवाक्यासारखी अजरामर झाली. भारताचे किंवा बांगलादेशाचे राष्ट्रगीत व शांतिनिकेतनमधील सिंहली विद्यार्थी आनंदा समरकनच्या आग्रही प्रेमापोटी लिहिलेले गीत (जे बंगालीमधून सिंहलीमध्ये आनंदाने भाषांतरित केले) आज श्रीलंकेचे राष्ट्रगीत आहे. रवींद्रनाथ उत्तम संगीतकार, वाद्यांची-संगीताची जाण असलेले व गायकही होते. चित्रकला, त्यांच्या कुंचल्यातून व्यक्तिरेखा (portrait) बेमालूमपणे कधी निसर्ग तर कधी एखादी व्यक्ती हुबेहूब उभी करायची.

ही सारी रवींद्रनाथांच्या साहित्य-कला-संगीताची ओळख देणारी अगदी जुजबी जंत्री, एकूणच त्यांची प्रतिभा जीवनाच्या साऱ्या अंगांना स्पर्शून गेली आणि जगातील साऱ्या सुबुद्धांना भारावून गेली.

गुरुदेव रवींद्रनाथ टागोर त्यांच्या या अनेकविध उपजत कलागुणांमुळे, अजरामर साहित्यनिर्मितीमुळे करोडोंच्या अंत:करणात देवासारखे विराजमान झाले.

महात्मा गांधींना जगभराने वंदिले, आपापल्या देशांत त्यांचे पुतळे उभारले आणि कायमचे स्मरणात ठेवले, तेच साधर्म्य दिसते ते रवींद्रनाथ टागोरांमध्ये.

भारतातील बहुतेक राज्यांमधून, मोठ्या शहरांमधून, सांस्कृतिक संस्थांमधून रवींद्रनाथांचे अर्ध वा पूर्णाकृती पुतळे अनेक वर्षांपासून आहेत. शिलाँग, मेघालय, कोलकाता, दिल्लीपासून दक्षिणेतील कर्नाटक, केरळपर्यंत रवींद्रमोहिनी पसरली आहे. एक नोबेल पुरस्कारप्राप्त भारतीय विद्वान म्हणून भारतभर त्यांचे पुतळे असणे हे उत्स्फूर्त आहे पण जगभरात त्यांचा चाहतावर्ग तेवढ्याच मोठ्या संख्येने असणे आपली मान उंचावणारे आहे. त्यातूनही हा नुसताच वाचकवर्ग न राहता त्यांच्या पुतळ्याला वंदणारा, ऋणात राहणारा चाहतागण आहे.

इंग्लंडमध्ये स्ट्रॅटफोर्डला शेक्सपीयर स्मारक बघण्याचा योग काही वर्षांपूर्वी मला आला तेव्हा शेक्सपीयरपेक्षा माझ्या जास्त लक्षात राहिले ते रवींद्रनाथ. स्ट्रॅटफोर्डच्या प्रांगणात प्रवेश करताच असलेल्या हिरवळी बगिच्यामध्ये आपल्याला प्रथमदर्शन होते ते रवींद्रनाथांच्या शुभ्र दाढीधारी, प्रसन्नचित्त पुतळ्याचे. शेक्सपीयरची ग्रंथसंपदा अजरामर नाटके, सुनीते आज साडेचारशे वर्षांनंतरही वाचली जातात, अभ्यासली



**स्ट्रॅटफोर्ड येथे शेक्सपीयर स्मारक प्रांगणात रवींद्रनाथांचा शुभ्र दाढीधारी, प्रसन्नचित्त पुतळा**

जातात आणि नाट्य/चित्रपटरूपाने रंगभूमीवर, पडद्यावर येतात. जगभर उदंड कीर्ती पावलेल्या या साहित्यसम्राटाच्या दरबारामध्ये अस्सल भारतीय कवीचा पुतळा कसा, हा तेव्हा पडलेला प्रश्न सोडवता सोडवता मला जगभरच्या रवींद्रनाथांच्या पुतळ्यांचे दर्शन घडवून गेला. एक भारतीय म्हणून रवींद्रनाथांबद्दल चारचौघांना असणाऱ्या माहितीइतपतच माहिती मला होती. जगाने मानलेल्या, स्वीकारलेल्या रवींद्रनाथांच्या मोठेपणाची महती मला प्रथमच या पुतळ्यांच्या शोधमोहिमेमुळे कळली. ती झाली म्हणून आनंद मानायचा का घरातील हिऱ्याचीच आपल्याला पारख नव्हती म्हणून सखेद खजील व्हायचे? जे असेल ते असो, पण या पुतळा-अभ्यासामुळे आपल्या भारतीय मनाचे पुन्हा एकदा मला प्रकर्षाने दर्शन झाले.

काही नेते, गायक, वादक, खेळाडू वा विभूती या जन्माला येतात तेव्हा त्यांना स्वत:ची जात, पंथ, धर्म, राज्य,

भाषा असते, पण जेव्हा त्यांचे विभूतीपण काळाच्या कसोटीवर घासून काळ्या दगडावरची रेघ बनते तेव्हा ते विश्वात्मकच होतात. त्यांच्याबाबतीत या साऱ्या ओळखी मग फजूल ठरतात. (तरीही अमुक देशाचे म्हणून एक बिरुद त्यांना मिरवावेच लागते.) प्रत्यक्षात मात्र सारा समाजच त्यांना आपापल्या कुंपणात बंदिस्त करून ते केवळ आपल्या जातीची, राज्याची, धर्माची जहागिरी असल्याचा आव आणत, स्वत:ची कुवत नसतानाही जन्मभर त्यांच्या नावाने दांडपट्टा फिरवत राहतात.

याला कुणीही अपवाद नाही. 'आमचे रवींद्रनाथ' म्हणणारे बंगाली भाषकही. शिवाजी महाराजांना आम्ही आंतरराष्ट्रीय म्हणण्याऐवजी महाराष्ट्राचे म्हणतो त्यातलाच हा प्रकार.

अर्थात, त्यामुळे मोठ्यांचं मोठेपण लपत नाही. रवींद्रनाथांचा जगभरचा संचार थांबत नाही.

इंग्लंडमध्ये आपले उच्चायुक्त असलेले एम.एल. सिंघवी हे रवींद्रसाहित्याचे, संगीताचे भोक्ते. इंग्लंडच्या साहित्यवर्तुळाची व सांस्कृतिक समाजाची त्यांस चांगली ओळख. जेवढे आपण शेक्सपीयरला मानतो तेवढेच ब्रिटिश समाजाला रवींद्रनाथ भावतात. पूर्वेकडचा शेक्सपीयर ही रवींद्रनाथांची युरोपातली अजून एक ओळख. दोन देशांतील या सांस्कृतिक संबंधांना दृढ करणारा दुवा संघवींनी अजून पक्का केला तो पूर्वेकडील शेक्सपीयरला स्ट्रॅटफोर्डच्या प्रांगणात आणून. रवींद्र-शेक्सपीयरचे हे दर्शन मनाला उल्हासित करते.

इंग्लंडमध्येच असलेल्या टागोर सेंटरने, लंडन युनिव्हर्सिटीच्या मदतीने, Gorden Square मध्ये रवींद्रनाथांचा



पुतळा उभारण्याकरता पैसे जमा करण्याची मोहीम हाती घेऊन आवश्यक तेवढी रक्कम जमाही केली आहे.

हंगेरीमधील रवींद्रनाथांचे स्मारक अगदी वेगळे आहे. १९२६ साली रवींद्रनाथांनी जेव्हा समुद्रकिनारी एका लिंबाच्या झाडाचे रोपटे लावले तेव्हा ते म्हणाले होते, की जो कुणी असं वृक्षारोपण करील तो आपोआप त्या ठिकाणी पुन्हा येईल. चौदा वर्षांनंतर रवींद्रनाथ पुन्हा हंगेरीला गेले तेव्हा चांगल्या बहरलेल्या आपल्या त्या वृक्षमित्राला भेटायला गेले. त्यावेळी त्यांना स्फुरल्या कवितेच्या चार ओळी-

If I am no longer of this world, of my tree,
Let your leaves reborn with the spring
whisper to those who wander here...
A poet loved me while he lived.

आज हंगेरीतील तो रस्ता 'टागोरपथ' म्हणून ओळखला जातो, अनेक झाडांनी गजबजलेला. देशोदेशीचे राष्ट्रप्रमुख हंगेरीत येतात तेव्हा या टागोरपथावर एक रोपटे लावून जातात.

फ्रान्सच्या कलाविश्वात रवींद्रनाथ प्रिय होते ते त्यांच्या साहित्याइतकेच त्यांच्या चित्रकला आणि चित्रांमुळे. १९९२मध्ये राजधानी पॅरिसमध्ये रवींद्रनाथांच्या ब्रॉंझ पुतळ्याचे या कलाप्रेमींनी अनावरण केले.

नेदरलँड-डच म्युनिसिपल कॉर्पोरेशनने भारत सरकारच्या सहकार्याने हेगमध्ये (Hague) श्रीमती भासवती मुखर्जी, भारतीय उच्चायुक्त व शहराच्या महापौरांच्या हस्ते सार्वजनिक ग्रंथालयाच्या परिसरात रवींद्रनाथांचा पुतळा उभारला, तर तीनच दिवसांनी नेदरलँडमधीलच लेर्देन (Leiden) शहरातील विद्यापीठाच्या Courtyard Huizinga इमारतीत शहराचे प्रथम नागरिक, महापौर हेन्री लेन् फेरिक यांनी रवींद्रनाथांचा पुतळा वसवला.

University of British Columbia कॅनडामध्ये रवींद्र-साहित्य अभ्यासकांना गुरुदेवांचे दर्शन नेहमीच प्रेरणादायी वाटले आहे. आपल्या विद्यापीठात या 'परदेशी गुरुदेवांचे' अस्सल दर्शन ब्रॉंझ पुतळ्याच्या रूपाने विद्यार्थ्यांना नेहमीच होत असते. त्या पुतळ्याखाली गुरुदेवांचे शब्द कोरले आहेत,

I do not put my faith in institutions
but in indivisuals all over the world
who think clearly feel nobly & act rightly.
They are the channels of moral truth.

बंगाल ही रवींद्रनाथांची जन्मभूमी-कर्मभूमी. बांगला

देश या नव्या मुस्लिमबहुल देशाची जरी निर्मिती झाली तरी बांगलादेशी मुस्लिमांनी रवींद्रनाथांकडे कधीच 'हिंदू' म्हणून पाहिले नाही. त्यांनीच लिहिलेले गीत हे बांगलादेशचे राष्ट्रगीत म्हणून स्वीकारून बांगलादेशी थांबले नाहीत, तर रवींद्रनाथांच्या दीडशेव्या जन्मवर्ष सोहळ्याची सुरुवात भारताबरोबरच त्यांनीही धुमधडाक्यात केली. दोन वर्षे आधीच रवींद्रनाथांच्या पुतळ्याचे अनावरण त्यांनी केले होते.

जगाच्या नकाशावरून एक नजर फिरवली वा प्रत्यक्ष त्या त्या देशात जाण्याचा प्रसंग आला वा घडवून आणला तर 'रवींद्रनाथ फॅन क्लब' देशांची सफर रोमांचकारी होईलच, शिवाय भारतीय साहित्याचे प्रेमी किती दूर-दूरवर पसरले आहेत हे पाहून आपल्याला सुखद धक्के बसतील.

अतिपश्चिमेकडील अमेरिकेपासून आपली भ्रमंती चालू झाली तर न्यू यॉर्कमध्ये रवींद्रनाथ आपल्याला भेटतात आणि नंतर अतिपूर्वेकडील देशापर्यंत त्यांचे दर्शन होतच राहते. आधी म्हटल्याप्रमाणे ते कॅनडात आहेत. अमेरिकेच्या खाली लहानशा बेटाप्रमाणे वसलेल्या फिडेल कॅस्ट्रोच्या 'क्युबा'मध्ये गीतांजली वाचली जाते आणि राजधानी हवानामधील पुतळ्याला पुजले जाते. थोडे वर मेक्सिकोमध्ये स्पॅनिशमधून रवींद्रनाथ त्या देशाला माहिती झाले. त्यांच्या साहित्याने मेक्सिकन वेडे झाले. एवढ्या दूरवरच्या देशात रवींद्रनाथांचा पुतळा... सलाम!

इंग्लंडप्रमाणेच अनेक युरोपीय देशांचा रवींद्रनाथांनी प्रवास केला होता. स्थानिक रवींद्रप्रेमींनी त्यांच्या अनेक व्याख्यानांचे आयोजन केले होते. आज त्या प्रत्येक ठिकाणी रवींद्रनाथ टागोरांचे पुतळे कुठे लायब्ररीत तर कुठे सुंदर हिरवळीवर, झाडांच्या सावलीत उभे आहेत. ते जर्मनीत बर्लिनमध्ये आहेत, तुर्कस्थानची राजधानी अंकारामध्ये, हंगेरीच्या बुडापेस्टमध्ये, स्पेनच्या वालाडोलिड व बार्सिलोनामध्ये, रूमानीयाच्या बुखारेस्टमध्ये, चेकोस्लावाकियाच्या प्रागमध्ये, आयर्लंडच्या डब्लिनमध्ये, स्वीडनच्या नोबल हाउसमध्ये... या साऱ्या साऱ्या देशांमध्ये आहेत. मध्यपूर्वेतील अबुधाबी, इजिप्त या इस्लामी भिन्न भाषी, धर्मी, संस्कृती असलेल्या देशही रवींद्रप्रेमी आहेत.

चीनला रवींद्रनाथांचे विशेष प्रेम त्यांच्या हयाती-पासूनच होते. भारतीय संस्कृती व चिनी बुद्धसंस्कृती यांचे नाते प्राचीन काळापासूनच आहे. आपल्या देशातील विद्वानांना रवींद्रनाथांचे विचार ऐकावयास मिळावे, दोन्ही बाजूंनी विचारांचा संवाद घडावा या सततच्या इच्छेमुळे रवींद्रनाथांनी आपल्या देशात यावे ही सामान्य चिनी बुद्धिजीवींपासून राज्यकर्त्यांपर्यंत साऱ्यांची इच्छा रवींद्रनाथांच्या चीन भेटीमुळे सफल झाली. त्याचेच फलित आज दीडशेवा जन्मसमारोह राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांच्या हस्ते शांघायमध्ये रवींद्रनाथांच्या पुतळ्याचे अनावरण होऊन



शांघाय येथील रवींद्रनाथांच्या पुतळ्याचे अनावरण करताना भारताच्या राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील





रवींद्रनाथांचे स्पेन आणि श्रीलंकेमधील पुतळे

संपन्न झाला. बीजिंग विद्यापीठामध्ये यापूर्वीच रवींद्रनाथ विराजमान झाले होते.

जपानमध्ये Nandan Hyogo या ठिकाणी रवींद्रनाथांच्या पुतळ्याला जपान सरकारने जागा बहाल केली. दक्षिण-पूर्व आशियातील लहानातील लहान साउथ कोरियाची राजधानी 'सेओल'मध्ये रवींद्रविचारमंचांनी रवींद्रनाथांचा पुतळा उभारून सांस्कृतिकतेतही आम्ही श्रीमंत आहोत हे दाखवून दिले. अतिपूर्वेला असलेल्या अशाच फिजी बेटांनी रवींद्रनाथांच्या पुतळाउभारणीने आपले भारताबरोबरचे जुने दृढसंबंध अजून समृद्ध केले.

जगाच्या नकाशातील अजून मोठा देश म्हणजे रशिया. 'ताश्कंद' या पूर्वीच्या रशियामधील शहराची ओळख भारतीयांना जुनी आहे. त्या शहराने ही मैत्री, हा सन्मान रवींद्रनाथांच्या पुतळ्याच्या स्थापनेने अधोरेखित केला.

माझा हा 'पुतळा'शोध अजूनही चालूच आहे. अजून जेवढे खोलात जाऊन शोधावे तेवढे काही ना काही सापडतेच आहे. कुठे पुतळे तर कुठे भव्य तैलचित्रे. जगभरात वसवलेल्या या पुतळ्यांच्या सुनियोजित, सुयोग्य जागांमुळे, आजुबाजूच्या हिरवाई स्वच्छतेमुळे, पार्श्वभागी असलेल्या विद्यापीठांच्या आखीवरेखीव इमारतीमुळे सारे पुतळे जिवंत आणि रसरशीत वाटतात. पुन्हा पुन्हा पाहावेसे वाटतात. संवाद साधावा एवढे जिवंत वाटतात.


आपल्याकडे पुतळ्यांबद्दल बोलताना दुर्दैवाने सारेच जण कटू पण सत्य बोलतात. चिमण्या-कावळ्यांनी अहोरात्र पुतळ्याच्या शरीरावर केलेली घाण, सर्वांनाच त्या पुतळ्याची वर्षातून एकदा येणारी जाग, मग त्याची सफाई, जाती द्वेषापायी वा राजकीय हेतूने व्यक्तिमाहात्म्य बाजूला ठेवून केलेली पुतळ्यांची फरफट; हे सारे उद्वेगजनक आहे. आपल्याच देशात, आपल्याच आदरस्थानांना मिळणारी सापत्न भावना आणि त्यामुळे घडणाऱ्या वा घडवल्या जाणाऱ्या दंगली पाहिल्या की ते पुतळे उभारायचे तरी कशाला असा साधा प्रश्न मनात उभा राहतो.

रवींद्रनाथांच्या जगभरच्या पुतळादर्शनाने जरी असे विचारांचे दुसरे काहूर मनात उठले तरी भारतीय विचार-साहित्य इतक्या दूर-दूरवर पोचवणाऱ्या गुरुदेवांबद्दल आज दीडशे वर्षानंतरही असलेला श्रद्धाभाव पाहून एक भारतीय म्हणून मन अभिमानाने उचंबळून येते.

सत्ताधारी हुकूमशहा, धनाढ्य व्यावसायिक जरी साऱ्या समाजाच्या डोळ्यांसमोर या ना त्या कारणाने सतत तरळत असले तरी चिरकाल लक्षात राहतात ती गुरुदेवांसारखी व्यक्तिमत्त्वे, आपल्याला भूतकाळाची आठवण करून देणारी, उज्ज्वल भविष्याची दिशा दाखवणारी.

**कुमार नवाथे**
साईप्रसाद, ६ वा मजला,
दयाळदास रोड, विलेपार्ले (पूर्व),
मुंबई-४०००५७
दूरध्वनी : (०२२) २६११८३०९
भ्रमणध्वनी : ९८६९०१४४८६
kumar.nawathe@hotmail.com

# निर्माण ग्रुप




**ना**शिक पुण्यनगरी... पौराणिक, ऐतिहासिक घटनांनी सजलेली, समृद्ध परंपरांनी नटलेली भूमी ! गोदाईच्या काठावर डौलाने उभारलेली, निसर्गानं बहरलेली पवित्र दक्षिण काशी! प्रभू रामचंद्रांचे वास्तव्य, हनुमंतांची जन्मभूमी, पांडवांचा रहिवास, त्र्यंबकेश्वर, सप्तश्रृंगगडा–सारखी शक्तिपीठं, निवृत्तीनाथांची तपोभूमी... अशा असंख्य पौराणिक संदर्भांनी या नगरीला समृद्ध परंपरा दिली आहे.

या परंपरेत अनेक नामवंत साहित्यिक, कलावंत, शाहीर, चित्रमहर्षी, शिल्पकार, चित्रकार, शिक्षणतज्ज्ञ, खेळाडू, पत्रकार, उद्योगमहर्षी, राजकारणी, समाजसेवक यांनी आपल्या गुणवत्तेने भर टाकली आहे. ब्रिटिश राजवटीविरुद्ध लढा देणारा इथला माणूस स्वातंत्र्याच्या यज्ञात आपल्या प्राणांची आहुती हसत हसत देताना वंदेमातरम्‌चा जयघोष करत अजरामर झाला. स्वातंत्र्यवीर सावरकर, हुतात्मा अनंत कान्हेरे आणि त्यांचे देशभक्त सहकारी इतिहासाला कायम नाशिकचे स्मरण करायला लावतात असे सामर्थ्य आहे इथल्या पाण्यात...

धार्मिक, पौराणिक, सांस्कृतिक पीठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नाशिकने आता कात टाकली आहे. द्राक्ष, कांदा, भाजीपाला, वायनरीज्‌ सोबत औद्योगिक वसाहती, इंडिया बुल्स्‌सारखे सेझ प्रकल्प यांनी आकार घेतलाय. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती वाढली आहे. शहराचा विस्तार झालाय. आता इथल्या माणसाला नव्या क्षितीजाचे वेध लागले आहेत. नवे साहस, नवे थरार, नवे विश्व, नवा आकार...

मुंबई–नाशिक फोर लेन हायवे मुळे मोठ्या प्रमाणावर आयटी इंडस्ट्रीज येथे येऊ घातल्या आहेत. नॉलेज सिटी, सेझ प्रकल्प, यामुळे विलक्षण क्रांती झाली आहे. एअर कनेक्टिव्हिटीमुळे जगातल्या प्रमुख देशातील मोठ्या शहरांच्या संपर्कात नाशिक शहर आलेय. एकूणच मुंबईनंतरचे शहर म्हणून नाशिककडे आता पाहिले जाऊ लागले आहे.

अनेक नामवंतांच्या योगदानामुळे नाशिकची ही आजची विकासगाथा साकारली आहे. नेमीचंद पोद्दार हे त्यापैकीच एक प्रमुख नाव. जगातील विविध क्षेत्रांतील नामवंतांनी नाशिकला यावे, आर्थिक, बौद्धिक गुंतवणूक करावी यासाठी तीन तपांहून अधिक काळ नेमीचंदभाई प्रयत्न करत आहेत. निर्माण ग्रुप या सुप्रसिद्ध रियल इस्टेट उद्योगसमूहाचे ते संस्थापक अध्यक्ष आहेत. तीस वर्षांहून अधिक काळापासून नाशिकच्या सौंदर्यात भर टाकणारे

असंख्य गृहप्रकल्प निर्माण ग्रुपने उभारले आहेत. नाशिकमध्ये मोक्याच्या जागेवर रेसिडेन्शियल, कमर्शियल स्पेस अत्यंत किफायतशीर दरात घेण्यासाठी निर्माण ग्रुप हा विश्वासाचा शब्द मानला जातो. नाशिक परिसरातल्या विविध प्राईम लोकेशन्स्वर उपलब्ध असणाऱ्या निर्माणच्या प्लॉटस् आणि शेतजमिनीला देश-परदेशातून मोठी मागणी असते. स्वच्छ आणि जलद व्यवहाराची सरळ पद्धत, गुंतवणूकदारांच्या गरजेनुसार मुबलक पर्यायांची उपलब्धता असल्यामुळे परदेशी गुंतवणूकदार मोठ्या प्रमाणावर निर्माण ग्रुपबरोबर व्यवहार करण्यास उत्सुक असतात.

मायदेशी नाशिकला आपले एक घर असावे असे परदेशी राहणाऱ्या प्रत्येकालाच वाटत असते. आपल्या मातीची, आपल्या नात्यांची ओढ असणाऱ्यांसाठी निर्माण ग्रुपने 'निर्माण आशियाना' आणि 'निर्माण वृंदावन' हे दोन महत्वाकांक्षी गृहप्रकल्प सादर केले आहेत. या प्रकल्पाची माहिती देताना नेमीचंदजी पोद्दार यांचे सुपुत्र व निर्माण ग्रुपचे डायरेक्टर श्री. विपुलभाई पोद्दार म्हणाले, मुंबई-आग्रा रोडवर द्वारका सर्कलजवळ १/२ बीएचके स्टुडिओ अपार्टमेंट्स व शॉप्स असलेला, इथल्या मातीमध्ये परदेशी सुखसोयी देणारा निर्माण आशियाना हा गृहप्रकल्प उच्च अभिरुची असलेल्या एन.आर.आय. मंडळींमध्ये अत्यंत लोकप्रिय झाला आहे. अत्याधुनिक सुखसुविधांनी परिपूर्ण असलेला हा प्रकल्प मुंबई-आग्रा रोडवर असल्याने नाशिक मुंबईला कामानिमित्त ये-जा करणाऱ्यांच्या सोयीचा असा आहे. अनेक नामवंत शाळा, कॉलेजेस, मार्केटप्लेस अत्यंत जवळ असल्याने गृहिणींना चटकन मनात भरतो.

निर्माणज् वृंदावन गार्डन हा निर्माणचा येऊ घातलेला नवा प्रकल्प म्हणजे एक आधुनिक सुखसोयींनी युक्त असे एक छोटेसे शहरच आहे. सातपूर-अंबड औद्योगिक वसाहतीच्या कुशीत उमलणारी पाचशेहून अधिक १/२ बीएचके फ्लॅट्सची ही देदीप्यमान टाऊनशीप. जणू नव्या पिढीचे नवे नाशिक शहर! टाऊनशीपमध्येच शॉपींग कॉम्प्लेक्स, प्ले-एरिया, सोशल एरियाची सोय. याशिवाय निसर्गाचा सहवास आणि नाशिक शहराशी सहज कनेक्टिव्हीटी! नाशिकमध्ये निर्माणाधीन असलेल्या




गृहप्रकल्पांमधला आजवरचा सर्वात मोठा गृहप्रकल्प. या प्रकल्पाबद्दल भरभरून बोलताना श्री. विपुल पोद्दार यांचा आत्मविश्वास जाणवत होता. आंतरराष्ट्रीय दर्जाचे वास्तुविशारद श्री. संजय पाटील यांच्या प्रतिभेतून साकारणाऱ्या या प्रकल्पाची माहिती www.nirman.co.in या वेबसाइटवर उपलब्ध असल्याचेही त्यांनी नमूद केले.

भारतात गुंतवणूक करणाऱ्या एन.आर.आय. मंडळींच्या अपेक्षांना पुरेपूर उतरण्यासाठी निर्माण ग्रुपमध्ये एक स्वतंत्र विभाग कार्यरत असल्याची माहिती या वेळी निर्माण ग्रुपचे डायरेक्टर श्री. हितेश पोद्दार यांनी दिली. जलद गतीने सर्व कागदपत्रे आणि व्यवहारांची पूर्तता करण्याची हातोटी या विभागाकडे असल्याने परदेशस्थ भारतीयांना उत्तम सर्व्हिस मिळते. कमी वेळात अत्यंत विश्वासाने, निर्धास्तपणे झटपट वाढणारी गुंतवणूक करण्याचे अनेक पर्याय देण्याची ताकद निर्माण ग्रुप बाळगतो. आधुनिक काळाला सामोरे जाणाऱ्या या शहरात तेवढ्याच ताकदीचे विविध प्रोजेक्टस् देण्याची निर्माण ग्रुपची योजना असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

नेमीचंदजी पोद्दार, विपुल पोद्दार आणि हितेश पोद्दार यांच्याशी झालेल्या गुजगोष्टीतून एक गोष्ट विशेषत्वाने जाणवली... ती म्हणजे भारतामध्ये फायदेशीर गुंतवणूक करायची असेल तर आता नाशिकला पर्याय नाही आणि जेव्हा नाशिकला गुंतवणूक करायची असेल तेव्हा तेव्हा निर्माण ग्रुपला पर्याय नाही...

# एका राष्ट्राइतकी पर्यटन-संधी महाराष्ट्रात उपलब्ध

◆ डॉ. अविनाश ढाकणे

आपल्या राज्याच्या नावातच म्हणजे महाराष्ट्र या शब्दातच 'राष्ट्र' आहे. त्यामुळेच एखाद्या राष्ट्राकडे जशी भूसंपत्ती, निसर्गाचे वरदान असते तसे ते आपल्यालाही लाभलेले आहे. समुद्र, डोंगर-दऱ्या, पठार आहे, लाल-काळी माती आहे, गरम पाण्याचे झरेही आहेत. फक्त बर्फ-बर्फाच्छादित गिरीशिखरे नाहीत आणि वाळवंट म्हणजे इंग्रजीत डेझर्ट म्हणतात ते पण नाही. मात्र जे आहे ते मुबलक आहे, सुंदर-संपन्न आहे. ज्याचा अभिमान वाटावा असा सह्यकडा आहे, कोकणची किनारपट्टी आहे. सिंधुदुर्ग-रत्नागिरी जिल्ह्यांतील समुद्र हे स्वच्छ सुंदर आहे. संपूर्ण कोकणालाच सागराचे सौंदर्य लाभलेले आहे. पाणी किती पारदर्शी असू शकते ह्याचाच येथे साक्षात्कार होतो.

किल्ले म्हणजे आपले ऐतिहासिक वैभव आहे. आपल्या महाराष्ट्रात साडेतीनशे पेक्षा अधिक किल्ले आहेत. संपूर्ण भारतात असलेल्या किल्ल्यांपैकी निम्मे किल्ले आपल्याकडे आहेत. अगदी सातवाहन व यादवकाळापासूनचे किल्ले इथे उभे आहेत. हे किल्ले म्हणजे वेगवेगळ्या आक्रमणांविरुद्ध दिलेल्या लढ्याचे साक्षीदार आहेत, सांस्कृतिक संपत्ती आहेत. आर्किटेक्चरचा उत्कृष्ट नमुना म्हणून त्यांच्याकडे बघितले जाते. त्यातील रचनांचा, स्थापत्यशास्त्राचा अभ्यास केला जातो. किल्ले हे मराठी मनाचे सांस्कृतिक गुडविल आहे असे म्हटले तरी चालेल. चारशे वर्षांपूर्वी ज्या किल्ल्यांत दहा हजारांची वस्ती राहत होती असे किल्ले हे आपण ऐतिहासिक वारशाचे प्रतीक म्हणून जतन केलेले आहेत.

असा हा महाराष्ट्र- नव्या पिढीला, देशातल्या नागरिकांना, परदेशी पर्यटकांना कळावा म्हणून महाराष्ट्र राज्य पर्यटन विभाग- एमटीडीसी सदैव प्रयत्नशील आहे. काही नव्या संकल्पना घेऊन आपली ही औद्योगिक-ऐतिहासिक-सांस्कृतिक संपत्ती आम्ही जपतो आहोत आणि त्यासाठी आम्ही काही योजना हाती घेतलेल्या आहेत-

## किल्ल्यांचे - गड/दुर्गांचे संवर्धन

महाराष्ट्रातील किल्ल्यांच्या संवर्धनासाठी आम्ही एक योजना तयार केली आहे. ह्या योजनेच्या पहिल्या टप्प्यात शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांचे संवर्धन व जतन केले जाणार आहे. ते किल्ले, त्यांचे सौंदर्य टिकवण्याचा आणि त्यांची महती पर्यटकांपुढे ठेवण्याचा आमचा प्रयत्न आहे. पुढील टप्प्यांमध्ये सर्वच किल्ल्यांचा या पद्धतीने विचार होईल. हे किल्ले आपल्याला स्फूर्ती देण्यास कारणीभूत ठरतील आणि देशा-विदेशातील पर्यटकांना हे आपल्या महाराष्ट्राचे ऐतिहासिक वैभव चांगल्या पद्धतीने पाहायला मिळेल.

किल्ल्यांच्या मालिकेचा प्रवास केलात, तर तुम्हाला एका टप्प्यात पुराणकालीन इतिहासाचा अभ्यास करता येईल. देदीप्यमान इतिहासातील क्षणांना, आजवर इतिहासातून वाचलेल्या प्रसंगांना नव्याने उजाळा दिल्यासारखे होईल.

## लेण्यांची वैभवशाली परंपरा

महाराष्ट्रातील 'लेणी' हे एक ऐतिहासिक 'वैभव' आपल्याला लाभलेले आहे. अजिंठा-वेरूळ हे तर साऱ्या जगाला ठाऊक आहेत. पण त्या व्यतिरिक्त अन्य ठिकाणीही महत्त्वाची लेणी आहेत. मुंबईसारख्या

महानगरातही मंडपेश्वर, जोगेश्वरी, कान्हेरी गुंफा अशी काही लेणी आहेत. 'एलिफंटा' हे तर आधीपासूनच 'पर्यटन स्थळ' म्हणून लोकप्रिय आहे. तिथे महाराष्ट्र शासनातर्फे 'एलिफंटा महोत्सव' यशस्वीपणे भरवला जातो. जपान व केंद्र सरकार ह्यांच्या सहकार्याने १५० रुपये कोटींचा विकास प्रकल्प आकार घेत आहे. मुंबईतल्या व महाराष्ट्रातील सर्वच लेण्यांच्या जतनाचा आराखडा तयार केला असून 'लेणी'देखील 'पर्यटन स्थळ' म्हणून पाहिल्या जावीत अशी अपेक्षा आहे.

## कृषी पर्यटनाची दिशा

सर्व प्रकारच्या पर्यटनांबरोबर 'कृषी पर्यटन' हे वेगळे आकर्षण म्हणून विकसित केले जात आहे. एक तर आपला देश कृषीप्रधान आहे. आधुनिक पद्धतीने शेती, फळबागा-फुलबागा केल्या जात आहेत. मळे आहेत. वाईनरीज आहेत. फार्म हाऊसेसमध्ये लोकांना राहायला आवडते. शहरी व्यापात, प्रदूषणाने कंटाळलेल्या नागरिकांना मोकळ्या हवेत निसर्गरम्य वातावरणात राहण्याचा मनमुराद आनंद घेता येईल आणि आपल्या प्रगतिशील शेतीची फळेही चाखता येतील. शिवाय बालपणीच मुलांना, तरुण पिढीला खेड्यांचा, खेड्यातील जन-जीवनाचा अनुभव घेता येईल!

आज अनेकांना आजोळ नाही, मामाचा गाव असा उरलेला नाही. ही उणीव भरून काढण्यासाठी 'ॲग्रो टूरिझम'मुळे सर्वांना रिफ्रेश होण्याचा आनंद मिळू शकेल. संपूर्ण भारत देशातील, विविध राज्या-राज्यांतील तसेच जगभरातील पर्यटकांना हे वेगळे पर्यटन आनंददायी ठरेल आणि त्याद्वारे आपल्याला परकीय चलनाचे घसघशीत उत्पन्नही मिळू शकेल.

## जागतिक दर्जाचे जल पर्यटन आणि ॲडव्हेंचर्स स्पोर्ट्स

तारकर्ली-आरोंदा इथे ॲडव्हेंचर स्पोर्ट्स विकसित करण्याच्या दृष्टीने 'स्नॉरकेल' सुरू करण्यात आला आहे. नजिकच्या काळात 'अंडरवॉटर स्कुबा डायव्हिंग' व ट्रेनिंग सुरू केले जाईल. आपले पर्यटक ज्याकरता विदेशात जातात, त्यांना ही सुविधा इथे कोकणात अनुभवता येईल आणि ती देखील आंतरराष्ट्रीय दर्जाची असेल. आपल्याकडेही 'हाऊसबोट' आहेत आणि आणखी दहा हाऊसबोटी घेतल्या जाणार आहेत. केरळ-काश्मिरातील बॅकवॉटर हाऊसबोटीचा आनंद आपल्या महाराष्ट्रातही घेता येईल. गणपतीपुळे, वेळणेश्वर अशा प्रसिद्ध पर्यटन स्थळांच्या जागी अधिक सुविधा देण्यासाठी 'विस्तारीकरण' कार्यक्रम राबवला जाणार आहे. महाराष्ट्रातील मुख्य खाड्यांबाबतची महत्त्वाकांक्षी योजना विचाराधीन आहे.

राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराजजी चव्हाण ह्यांचा पर्यटन विकासाला मन:पूर्वक पाठिंबा आहे. त्यांना आपल्या ऐतिहासिक वास्तूंच्या आणि महाराष्ट्रातील निसर्गदत्त संपत्तीच्या वैभवाची जाणीव आहे. त्यांची खूप इच्छा आहे की 'पर्यटन'क्षेत्रातही आपला महाराष्ट्र अग्रेसर राहावा. माननीय मुख्यमंत्री हे धडाडीचे नेते आहेत. योग्य निर्णय घेणे आणि अंमलबजावणी करण्याबाबत ते प्रसिद्ध आहेत. त्यांच्याच बरोबरीने पर्यटनमंत्री मा. छगनराव भुजबळ ह्यांना महाराष्ट्राच्या सांस्कृतिक-सामाजिक व ऐतिहासिक वारशाच्या जतन करण्याला व संवर्धन करण्याला सक्रिय पाठिंबा आहे. ह्या मान्यवरांच्या पाठबळावरच आम्ही विविध पर्यटन योजना कार्यान्वित करू शकलो आहोत. भविष्य-काळात आणखी काही योजना करण्याचा मनोदयही आहे.

आमचे हे उपक्रम देशाच्या कानाकोपऱ्यातील पर्यटक आणि जगभरातील पर्यटकांपर्यंत प्रभावीपणे पोचावे म्हणून आम्ही योग्य असे 'प्रसिद्धी-तंत्र' अवलंबत आहोत. त्या दिशेने आमचे 'ग्राऊंडवर्क' चालू आहे. इफेक्टिव्ह पब्लिसिटीमुळे आपला महाराष्ट्र पर्यटनासाठी कसा 'बेस्ट डेस्टिनेशन' आहे हे आम्ही जगाला सांगणार आहोत. महाराष्ट्र राज्याला देशाच्या व जगाच्या पर्यटन नकाशावर ठळक स्थान व मान मिळवून देण्यासाठी एमटीडीसी कटिबद्ध आहे.

# चला महाराष्ट्र पाहू या, पर्यटनाचा आनंद घेऊ या!

महाराष्ट्र राज्यातील अनेक पर्यटन स्थळे प्रसिद्ध आहेत. नवनवीन स्थळे विकसीत केली जात आहेत. आधुनिक पर्यटकांना जे हवे ते देण्याचा आम्ही प्रयत्न करतो आहोत.
● महामार्ग सुविधा - जलद/सुलभ व सुरक्षित दळण-वळणासाठी. ● पोर्ट सर्किट ● सह्याद्री ट्रॅक्स म्हणजेच जंगलवाटा. ● नाणेघाट प्रकल्प. ● सागर किनारा सुविधा व सुरक्षितता (ह्यात गार्डना प्रशिक्षण, योग्य साधने आणि टॉयलेट-सारख्या आवश्यक सुविधा पुरवणे.) ● वॉटर-स्पोर्ट्स विकसित करणे. ● राज्यातील विविध टूरिझमबाबत सेवा देणाऱ्या कंपन्या/संस्था/व्यक्तींना योग्य प्रशिक्षण व मार्गदर्शन देणे.

## एमटीडीसीचे संकल्प व योजना

सध्या महाराष्ट्रात एकूण ७७ पर्यटन स्पॉट्स/स्थळे आहेत. त्यांची संख्या वाढवणे व ही सर्व स्थळे अधिक कार्यक्षम व आकर्षक करणे.

## ठळक योजना

**बॉलिवूड टूरिझम** - मुंबई व कोल्हापूर इथे ज्या चित्रनगरी आहेत तिथे म्युझियम उभारून ही स्थळे पर्यटकांसाठी विकसित करणे.

**वाईल्ड लाईफ** - पवनी, ताडोबा, पेंच-शिलारूअशी काही नामांकित तर काही नवीन स्थळे विकसित करणे. आंबोली, पन्हाळा व चिखलदरूइथेही नवीन सुविधा पुरवल्या जाणार आहेत. ताडोबामधील वाघ हे प्रमुख आकर्षण आहे. ही संख्या देश व जागतिक पातळीवर मोठी आहे. तिथे केंद्र सरकारच्या साहाय्याने प्रकल्प राबवणे.

**सामाजिक टूरिझम** - सामाजिक बांधिलकी म्हणून शिल्पसृष्टी, शिल्पग्राम तयार केली जात आहेत. वाटेगाव हे लोकशाहीर कै. अण्णाभाऊ साठे यांचे गाव तसेच होळकरांचे चोंडी, सावित्रीबाई फुले यांचे नायगाव ही नव्याने पर्यटनस्थळे म्हणून आम्ही 'विकसित' करत आहोत. अकलूजला एक जुनी पडीक गढी घेऊन तिथे आम्ही 'शिवसृष्टी' उभी केली आहे. शिवाजी महाराजांच्या जन्मापासून ते राज्याभिषेकापर्यंतचा कालखंड इथे साकारलेला आहे. शिल्पकलेचे जतन व त्याकडे लक्ष जावे म्हणून 'शिळाग्राम'सारखे उपक्रम हाती घेतलेले आहेत.

## ग्रामीण-शेती पर्यटन

महाराष्ट्रातील प्रगतिशील शेतीबाबत वाईन, ॲग्रो, मेडिकल असे विविध प्रकार विकसित केले आहेत. नागपूरला 'ट्रायबल टूरिझम'ची संकल्पना साकारली जात आहे.

**डॉ. अविनाश ढाकणे**
Director of Tourism, Govt. of Maharashtra
& Joint Managing Director

## विविध फेस्टिवल्स

प्रत्येक सणाचे- उदाहरणार्थ, गणपतीनिमित्ताने आम्ही फेस्टिवल्स करणार आहोत. वर्षभरातील सणांचे त्यांच्या अनुरूप फेस्टीवल्सचे कॅलेंडर तयार केले आहे.

डिसेंबरमध्ये वेरूळ तसेच कालिदास महोत्सव, हुरडा महोत्सव, पतंग जत्रा, बीच फेस्टिव्हल, गोविंदा महोत्सव, रंगपंचमी.

मुंबईमध्ये 'कन्व्हेन्शन सेंटर्स' उभी करणे. त्यासाठी व अन्य उपक्रमांसाठी पब्लिक-प्रायव्हेट इन्व्हेस्टमेंटच्या सहयोगाने एकत्रित योजना आखल्या जात आहेत. सुदैवाने आज आमच्याकडे मोठ्या प्रमाणावर जमीन उपलब्ध आहे. चांगले भांडवल मिळाले तर अनेक स्थळे पर्यटनयोग्य अशी विकसित होऊ शकतील असा विश्वास आहे.


आजवर माहित असलेल्या पर्यटन स्थळांव्यतिरिक्त नवनवीन जागांना-ठिकाणांना भेट देऊन, संपूर्ण महाराष्ट्रातील वैशिष्ट्यपूर्ण स्थळांना पर्यटन नकाशावर आणून पर्यटकांना आनंद देण्याचा आमचा संकल्प आहे.



MAHARASHTRA TOURISM


# एमटीडीसी प्रेझेंट्स महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध पर्यटनस्थळे आणि नवनवीन टूरिस्ट स्पॉट्स

प्रतापगड



**फोर्ट टूरिझम –**
शिवाजीराजांच्या किल्ल्यांचा ऐतिहासिक वारसा

**बीच टूरिझम –**
कोकणातील सुंदर व स्वच्छ समुद्रकिनारी सुरक्षित आनंद लुटा



**तारकर्ली –**
आंतरराष्ट्रीय दर्जाचही जलक्रीडा – स्नॉरकेल आणि स्कुबा डायव्हिंग

**अजंठा–वेरुळ –**
जागतिक दर्जाची व्यवस्था व खास आकर्षण

ओडिसी रेल्वे

मुंबईत कन्व्हेन्शन सेंटर

मुंबईसह महाराष्ट्रातील लेणी, गुंफा विकसित करून पर्यटन स्थळ

माथेरान–महाबळेश्वरसारखी आणखी नवनवीन स्थळे

स्कुबा डायव्हिंग



website : www.maharashtratourism.gov.in






# Building homes that elevate lifestyles



**nirman's**

## Vrindavan Gardens

**Kedarnagar, Near Satpur MIDC**

A TOWNSHIP OF **1 & 2 BHK** APARTMENTS

**Pre-launch Bookings Open**

**nirman's**

## Ashiyana

**Near Dwarka Circle**

**1 & 2 BHK** APARTMENTS & SHOPS

**With all modern amenities**

**Pre-launch Bookings Open**





**nirman**

## Samruddhi

**Uttara Nagar, Nashik-Pune Rd.**

**3 BHK** LUXURIOUS APARTMENTS

**Ready Possession**

**nirman**

## Sugandh

**Anandvali, Gangapur Road**

**2 BHK** APARTMENTS

**Possession September - 2011**



*Conditions Apply.

nirman GROUP ®
(Since1980)

**NIRMAN GROUP**

Nirman house, L.P. Podar Marg, College Road, Nashik- 422 005 (MH), India.
Ph. Nos: +91 0253 2578921/2579321/2580121
Fax No: +91 0253 2580573
Mob: 88888 81821/2/3/4
Email: nirman@bom4.vsnl.net.in, hiteshnpoddar@gmail.com
www.nirman.co.in

® - Registered Trademark "NIRMAN" used under license from N.L.Poddar

MAKindia.com


www.vivacityvirar.com
VIVA HOMES
विरारला आमच्या इतकं कुणीच जाणत नाही...
विवा एज्युकेशनल ट्रस्ट
महाराष्ट्रातील सर्वात मोठे ज्युनिअर कॉलेज
प्राथमिक आणि माध्यमिक शाळा / महाविद्यालय / मॅनेजमेंट कॉलेज
हॉटेल मॅनेजमेंट कॉलेज
विवा गृह निर्माण
वसई-विरार परिसरातील एक सर्वात मोठे विकासक
विवा प्रकल्पामध्ये १०,००० हून अधिक कुटुंबे सध्या रहात आहेत.
विवा हॉटेल्स
वसई-विरार परिसरातील एक सर्वात मोठी उपाहारगृहांची शृंखला
विवा सुपरमार्केटस्
वसई-विरार परिसरातील एक सर्वात मोठी सुपरमार्केट शृंखला
विवा चॅरिटेबल ट्रस्ट
प्राथमिक आरोग्य गरजांची पूर्तता करणारे
११ फिरते दवाखाने
नि:शुल्क मोतीबिंदू शस्त्रक्रिया
एक नवीन डायलेसिस केंद्र
अनुदानित रुग्णालय
1, 1.5 आणि 2 बी.एच्.के. सुखसंपन्न अपार्टमेंटस्
Viva City
VIRAR (W)
• निसर्गाने वेढलेला १० लक्ष चौरस फूटाचा प्रकल्प
• नामवंत शाळा प्रकल्पाच्या जवळच प्रस्तावित
• खरेदीसाठी उत्तम सोयी
• क्लब हाऊस सुविधा
• उच्च राहणीमानाला अनुरूप सुविधा
• अद्ययावत सुरक्षा व्यवस्था
...आणि त्यामुळे आम्ही एक परिपूर्ण जग घडवू शकलो...फक्त तुमच्यासाठी!
३००० हून अधिक घरे | शाळा | सुपरमार्केटस् | उपाहारगृहे | बगीचा | क्लब हाऊस | खाजगी बस सेवा
स्पेशल ऑफर ₹३१९९/- प्रति चौ. फूट पहिल्या १०० फ्लॅटस् साठी
गेल्या तीन दशकांपासून विरारच्या एकुण विकासामध्ये 'द विवा ग्रुप' सातत्याने आघाडीवर राहिला आहे. शिक्षणापासून रिटेल उद्योगापर्यंत आणि उपाहारगृहांपासून घरबांधणीपर्यंत विविध कामे करून या ग्रुपने सतत वसई-विरार भागाचा चेहरामोहरा अधिक चांगला केला आहे. याच अथक प्रयत्नांमधून साकारली आहे विरारचा शिरपेच ठरणारी वसाहत - विवा सिटी... विवा सिटी म्हणजे एक संपूर्णपणे स्वयंपूर्ण अशी एक स्वर्गीय नगरी... येथे आयुष्याच्या सगळ्या गरजा पूर्णपणे भागविल्या जात आहेत... कधीही न अनुभवायला मिळालेलं एक सुंदर आयुष्य... विवा सिटीमधल्या आपल्या देखण्या घरात आपले स्वागत आहे.
अधिक सुविधा: रेनवॉटर हार्वेस्टिंग • सुप्रसिध्द आगाशी मंदिरापासून अगदी जवळ • वरिष्ठ नागरिकांसाठी आराम करण्यासाठी जागा • अतिसुंदर लॅंडस्केप केलेला प्रकल्प • जलदगती एलिव्हेटर्स • स्टॅबिलाईज्ड विद्युत वितरण
A Project by
VIVA WINNER VENTURE
संपर्क करा: (मोबाईल) +91 87968 08888 / 28888 / 38888 / 48888 • (दूरध्वनी) +91 250 329 4556 / 4557
मुख्य कार्यालय: ठाकूर आर्केड, राजा शिवाजी मार्ग, विरार (प), ठाणे-४०१३०२ • ई मेल: info@vivacityvirar.com

# आगे, परदेपर देखिए

◆ *अरुण पुराणिक*

**कलात्मकरीत्या,** थोडक्यात, परंतु परिणामकारक पद्धतीने आपल्या सिनेमांची जाहिरात व प्रसिद्धी करून, सिनेप्रेक्षकांना आकृष्ट करण्याचा सिनेमाची प्रचारपुस्तिका (Song Synopsis Booklet) हा प्रकार जगात फक्त भारतीय सिनेउद्योगात पाहायला मिळतो. बोलपटांच्या आगमनानंतर, साधारण १९३१-३२ पासून. बाबुराव पेंटर यांची महाराष्ट्र फिल्म कंपनी आणि कोल्हापूरच्या प्रभातने सर्वप्रथम या प्रचारपुस्तिकेची निर्मिती करण्यास सुरुवात केली.

'प्रचारपुस्तिका' हा सिनेमाचा महत्त्वाचा ऐतिहासिक दस्तावेज आहे. या प्रत्येक आठ पानी छोट्याशा प्रचार पुस्तिकेत त्या सिनेमाची अतिशय महत्त्वाची परंतु थोडक्यात माहिती, संपूर्ण श्रेयनामावली (credits), इंग्रजी व हिंदीमध्ये सिनेमाचे कथासार (story synopsis) दिलेले असे. हे कथासार रोचक व उत्कंठावर्धक असे पण ते अपुरे असे. त्याचा शेवट नेहमीच सिनेमा पहाण्यास उद्युक्त करणाऱ्या 'आगे, परदेपर देखिए' या वाक्यानेच होत असे. आतल्या पानांवर हिंदी आणि उर्दूमध्ये त्यातील प्रत्येक गाण्याचे शब्द (Lyrics) दिले जात. काही पुस्तिकांत संवादही (Dialogue) असत.

पुस्तिकेच्या मुखपृष्ठावर त्या सिनेमाच्या पोस्टरची प्रतिकृती असे अथवा त्या सिनेमातील मुख्य व्यक्तिरेखेचे अथवा त्यातील महत्त्वाच्या प्रसंगाचे छायाचित्र असे. शेवटच्या पानावर कधी कधी त्या निर्मात्याच्या आगामी चित्रपटाची जाहिरात असे. नामवंत चित्रकारांच्या परिसस्पर्शाने पुनीत झालेल्या या प्रचार-पुस्तिकेमुळे त्या सिनेमाची सर्वत्र जाहिरत होत असे.

अशा या प्रचारपुस्तिकांचे अनेक संग्राहक मुंबई-पुण्यात पाहायला मिळतात. ग्रँटरोडच्या पाववाला स्ट्रीटवरील, बुऱ्हानपूरवाला याने या बुकलेटस्‌ना पर्याय म्हणून, स्थानिक भाषेत पाठपोट चार पानांच्या गाण्यांच्या पुस्तिका, सिनेमाच्या चोपड्या प्रकाशित करण्यास सुरुवात केली. या चोपड्यांसाठी हलक्या प्रतीचा खराब पेपर, एकाच रंगाची काळी अथवा निळी शाई वापरली जात असली तरी दहा-वीस वर्षे यांचे मूल्य फक्त एक आणाच होते.

### सौंदर्यतारकांचा साबण- 'लक्स'


'Ask any film star, they'll say Lux.'

फिल्म स्टार्सची लोकप्रियता आपल्या जाहिरातीच्या रूपाने कॅश करण्याचे लक्ससारखे उदाहरण तर अवघ्या विश्वात नाही. १९२९ मध्ये लक्स टॉयलेट सोप हिंदुस्थानच्या बाजारपेठेत दाखल झाला. सुरुवातीच्या काळात हॉलिवूड स्टार्स जिंजर रॉजर्स, लॉरेटा यंग यांची छायाचित्रे लक्सच्या कागदी वेष्टनांवर झळकत असत.

१९४१ पासून लक्सच्या वेष्टनावर प्रथमच भारतीय अभिनेत्रीचा गोंडस चेहरा झळकू लागला. ती अभिनेत्री होती, बॉम्बे टॉकिजची नायिका लीला चिटणीस. १९५०च्या दशकातील लक्सच्या नायिका होत्या- मधुबाला, कामिनी कौशल, नर्गिस, मीनाकुमारी व जयललिता. रंगीत सिनेमांचा जमाना सुरू झाल्यावर, लक्सचे वेष्टन सप्तरंगी झाले होते.

काळाप्रमाणे बदलत, लक्सच्या वेस्टनावर सतत नवीन




नवीन आकर्षक तरुण नायिका येत राहिल्या. 'लक्स'च्या वेष्टनावरून कोणती नायिका लोकप्रियतेच्या शिखरावर आहे ते सहजगत्या समजून येत असे. सौंदर्यवती नायिका आणि लक्स हे अतूट नाते हिंदुस्थान युनिलिव्हरने गेली. जवळजवळ सत्तर वर्षे निष्ठेने जपले आहे.

**'पोस्टर्सच्या दुनियेत'**

साधारणपणे १८६९ मध्ये, सर्वप्रथम फ्रान्समध्ये पोस्टर्स कलेचा उगम झाला. पहिले रंगीत पोस्टर, छापून प्रकाशित करणाऱ्या ज्यूल्स केरेट या फ्रेंच चित्रकाराला पोस्टर कलेचा जन्मदाता मानले जाते.

चांगले कलात्मक, आशयगर्भ पोस्टर बोलते, पाहणाऱ्याला खुणावते. त्याची उत्सुकता, जिज्ञासा, कुतूहल जागृत करते. लोकांचे लक्ष वेधून घेण्याची प्रचंड ताकद या पोस्टरमाध्यमामध्ये आहे याची जाणीव होताच, अल्पावधीतच पोस्टरकलेचा संपूर्ण युरोप खंडात प्रसार झाला. पोस्टर्सद्वारे विविध उत्पादनांचा, भव्य कार्यक्रमांचा व पर्यटनाचा जाहिरातीच्या रूपात सर्वत्र प्रसार होऊ लागला.

१८८८ मध्ये मुंबईत टाइम्स ऑफ इंडिया वृत्तपत्रात, लंडनच्या लेव्हर्स ब्रदर्सच्या 'सनलाईट' साबणाची पहिली पोस्टर जाहिरात प्रसिद्ध झाली. या जाहिरातीच्या माध्यमातून गृहिणींना सांगण्यात आले की गृहिणींनो, आता सकाळीच कपडे धुऊन, आरामात पतीसमवेत आपण सायंकाळी फिरायला जाऊ शकता! कपडे धुण्यासाठी आता सनलाईट साबण आहे.

१९१२ मध्ये प्रसिद्ध चित्रकार राजा रविवर्माकडून त्यांनी सनलाईटच्या जाहिरातीसाठी खास विष्णू गरूड वाहन चितारून घेतले. त्याची छपाई इंग्लंडमध्ये करून ते हिंदुस्थानात किरकोळ विक्रेत्यांना वाटले. त्यांची ही कल्पना प्रचंड यशस्वी झाली, हे सांगायला नको.

चित्रकार एम.व्ही. धुरंधर, हे मुंबईतील पोस्टरकलेचे पहिले जन्मदाते. १९१२ ते १९२० या काळात ते रेल्वेसाठी पोस्टर्स रंगवत. गोविंद ऊर्फ दादा भडसावळे हे चित्रकलेचे रीतसर शिक्षण घेतलेले पहिले कमर्शियल आर्टिस्ट. ते मेट्रो गोल्डविन मेअर्सची पोस्टर्स रंगवत.





## भारतीय सिनेपोस्टरकला आणि त्यांची वैशिष्ट्ये


सिनेमा हे हलत्या चित्रांनी गोष्ट सांगण्याचे तंत्र असल्याने निर्मात्यांना, विशेषत: मुळातच चित्रकलेचे कसब असलेल्या चित्रपटनिर्मात्यांना (दादासाहेब फाळके, बाबुराव पेंटर आणि प्रभातचे भागीदार) ध्वनीपेक्षा चित्रातूनच प्रसंग पटवण्याचे महत्त्व उत्तम कळले होते. याची साथ त्यांचे चित्रपटच काय पण त्यातील स्थिर छायाचित्रे (स्टील), जाहिरातींची सुंदर पोस्टर्स, विविध देखावे आणि थिएटर, सजावटदेखील पटवतात. बाबुराव पेंटरांनी काढलेली 'सिंहगड' या मूकपटाची पोस्टर्स पाहायला १९२१ मध्ये ग्रॅण्टरोडच्या नॉव्हेल्टीला प्रचंड जनसागर लोटला होता आणि त्यामध्ये जे.जे. कला महाविद्यालयाचे प्राचार्य सॉलोमनही होते. या निर्मात्यांच्या चित्रपटांइतकीच ती छायाचित्रे, पोस्टर्स आणि नटलेली थिएटर्सही लोकांच्या अजून लक्षात आहेत. अपेक्षित सिनेप्रेक्षकांचे वय, आवडनिवड लक्षात घेऊन, चित्र उभे करताना त्या कथाविषयातील वेधक प्रसंग, कलात्मकरीत्या चितारून ते प्रेक्षकांसमोर मांडत असत. त्या काळात भारतातील तीस टक्के लोक अशिक्षित, निरक्षर होते. ते सिनेपोस्टर पाहूनच आपले सिनेमाविषयक मत बनवत. 'तुकाराम' चित्रपटाला मराठी भाषेची अडचण पडली नाही, संपूर्ण भारतभर हा चित्रपट चालला. कारण चित्रकलेत मुरलेल्या दिग्दर्शकाच्या डोक्यात दृश्यरूपाने पटकथा निर्माण होत असते.


'कुंकू' सिनेमातील शांता आपटेच्या फणी-करंड्याच्या पेटीसमोर कुंकू लावत बसलेल्या पोजमधील कलात्मक फोटो घराघरातून दिसत होता. बाबुराव पेंटर, विश्वनाथ भिडे, गोपाळ कांबळे, एस.एम. पंडित, करकरे, परचुरे, दलाल, रघुवीर मुळगावकर यांच्या कसबी चित्रातील नट्यांचे सुंदर दर्शन मनाला गुदगुदल्या करत असे. तरुणमंडळी त्यावर लट्टू होत. उत्तान शृंगाराला पोस्टरवर स्थान नव्हते. (तो प्रकार १९७० नंतर सिनेउद्योगात आला.) ही चित्रकार मंडळी सौंदर्यलक्ष्यी होती, पण सौंदर्याचा बाजार मांडून स्त्री देहाची विक्री करणारी नव्हती.

पूर्वी मीडिया हा प्रकार नव्हता. प्रेक्षकांना कथा सांगणार कशी? म्हणून पोस्टर्सची निर्मिती झाली. कमीत कमी शब्दांत चांगले कलात्मक पोस्टर एका क्षणात मेसेज देते. बस! प्रत्येक पोस्टरवर त्या निर्मिती संस्थेच्या प्रतिष्ठेला साजेसे कलात्मक आकर्षक बोधचिन्ह असे. उदा. प्रभात, न्यू थिएटर्स, मिनर्व्हा,




*With Best Compliments From*


# BEETEE TEXTILE INDUSTRIES LTD.




Plot J196 MIDC Tarapur Boisar,
Thane - 401506

**Phone (Res.) : 272790**







मेहबूब, बी.आर. सिनेमाचे मुख्य आकर्षण काय आहे? तोच पोस्टरचा मुख्य विषय असे. जोधा-अकबराच्या पोस्टरवर फक्त दोनच व्यक्तिरेखा होत्या आणि सेट, बस! अमिताभच्या 'अँग्री यंग मॅन' व्यक्तिरेखेला, भूमिकेला अगदी साजेसे 'दीवार'चे पोस्टर होते. पॅलेट नाईफचा उपयोग करून पामार्टने त्याच्या चेहऱ्यावर ओबडधोबडपणाचे ओरखडे दाखवले होते. 'दीवार'च्या यशात या क्रांतिकारक पोस्टरचाही महत्त्वाचा सहभाग होता हे विसरून चालणार नाही.

परदेशात पोस्टर पेटिंग ही कला मानली जाते. त्यांच्या आणि आपल्या रंगांमध्ये, शेडस्‌मध्ये फरक असतो. भारतात कोलाज म्हणजे विविध घटक एकत्र करून पोस्टर बनवले जाते. हा स्पेशलाइज्ड जॉब आहे असे मानले जात नाही. हॉलिवूडमध्ये पोस्टर्स ही शोकेसमध्ये लावली जातात. भारतात पोस्टर्स भिंतीवर, बसथांब्यावर, गटारांवर, अक्षरश: जिथे मोकळी जागा मिळेल तिथे ओंगळवाण्याप्रकारे चिकटवली जातात. स्वस्त पातळ कागदावर लिथो प्रिंटिंगद्वारे ती छापली जात असत.

ऊनपाऊस व वाऱ्यामुळे त्यांचे आयुष्य महिन्याभरातच संपुष्टात येत असे. अलीकडे संगणकाच्या मदतीने व्हिनाइलवर (फ्लेक्सवर) पोस्टर्स छापली जातात. पेंटर्सचा स्वत:चा स्पर्श नसल्याने ती बेचव आणि अळणी भासतात. वितरकांकडे शिल्लक राहिलेली अशी पोस्टर्स पावसाळ्यात चक्क झोपड्या झाकण्यासाठी वापरली जातात. भायखळ्याचा गोळा आर्ट्स, सनी आर्ट्स एका रात्रीत संपूर्ण मुंबईतील मोकळ्या भिंतीवर हजारो पोस्टर्स एका रात्रीत लावत असत. हा प्रकार परदेशात नाही. पोस्टर आर्टला तिथे इज्जत आहे, प्रतिष्ठा आहे.

म्हणूनच १९३५ ते १९६५ या काळातील पोस्टर्सना आज सोन्याची किंमत आहे, परदेशातूनही त्यांना प्रचंड मागणी आहे. पंढरपूरहून अनवाणी पायाने चालत आलेला मकबूल १९३५ ने १९४० या काळात, बॉम्बे सेंट्रलच्या जयहिंद आर्ट्‌समध्ये, दीड रुपया रोजीवर, मध्यरात्री, सिनेमाची पोस्टर्स रंगवूनच उदरभरण करत असे. हाच मकबूल पुढे एम.एफ. हुसेन या नावाने जगप्रसिद्ध झाला.

**अरुण पुराणिक**
इ-१०३, महेश्वरीनगर,
एमआयडीसी, अंधेरी (पूर्व)
मुंबई-४०००९३
vgpuranik@gmail.com

*With Best Compliments From*



# Nikopas Engineering Private Limited

बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन, शिकागो

# ‘थिंक महाराष्ट्र’ प्रगतीची पावले

◆ *दिनकर गांगल*

‘थिंक महाराष्ट्र’ प्रकल्पामध्ये साधनसंपत्ती व मनुष्यबळ या दोन्हींची कमी आहे. परंतु अशा स्वेच्छाप्रयत्नांमध्ये हे स्वाभाविकच आहे. मात्र लोकांना ही कल्पना भावते खूप, मग प्रतिसाद उबदार व धो-धो का येत नाही? कारणे दोन जाणवतात: एक तर ज्या पिढीला फुरसत आहे व जी पिढी सुखस्वस्थ आहे तिला संगणक, महाजाल या गोष्टी दूरच्या वाटतात, आपल्या जमान्याच्या वाटत नाहीत. उलट, जी पिढी या माध्यमाजवळ आहे ती जीवनसंघर्षात, करिअरच्या प्रगतीत गुंतली आहे. तिला फेसबुक, ट्विटर ही दैनंदिन गप्पाष्टकांची सदरे फार प्रिय असतात.

थोडे वेगळे आणि अधिक ओळखीचे उदाहरण म्हणजे मोबाईल फोन हे अत्यंत उपयुक्त साधन, परंतु त्यावरील सत्तर ते ऐंशी टक्के संभाषण ही निव्वळ बडबड असते. विचार असा करू या, की एरवी घरात तरी असाच वायफळपणा चालू असतो ना? (असायचा ना?) घराघरातली माणसे कमी झाली म्हणून ती गरज आता मोबाईल फोनमधून जनात भागवली जाते. टेलिव्हिजनवरच्या सोप दैनंदिन मालिकांची महती तीच सांगतात. राहण्याची घरे, जागा आणि माणसे या दोन्ही गोष्टींनी लहान झाल्यावर कुटुंबाची ती गरज सासू-सून-दीर-भावजया अशा, मालिकांतील नाट्यातून, एकत्रितपणातून भागवली जाते. थोडक्यात, लोकांना नव्या माध्यमांच्या विरंगुळ्याच्या वैशिष्ट्यात सध्या जास्त रमायचे आहे. असो.

‘थिंक महाराष्ट्र’ची संकल्पना अशी माणसांना जोडण्याची असल्याने ती लोकांना पसंत पडते. ती जीवनात गंभीरपणाने काही करू इच्छिणाऱ्यांना विशेषच प्रिय वाटते. आतापर्यंत आपण परभणी, नांदेड, अंबाजोगाई, लातूर, धुळे, अमरावती, येथे बैठका घेऊन, तेथे मोठ्या पडद्यावर ‘थिंक महाराष्ट्र’चे पोर्टल दाखवून अनेक माणसांना या जाळ्यात आणले आहे.

कवयत्री अंजली कुळकर्णी यांनी गेल्या महिन्यात सुलभा ब्रह्मे यांच्या सहकार्याने पुण्यात अशी एक बैठक घेतली. तेथे ‘थिंक महाराष्ट्र’ पोर्टल माहिती-समृध्द करण्याच्या अनेक कल्पना सुचवल्या गेल्या. काही माणसे व्यक्तिगत पातळीवर असे सत्प्रवृती, सत्शक्ती जोडण्याचे काम करतच असतात, त्यांचे उल्लेख झाले. स्वत: अंजली कुळकर्णी यांनी पुण्यात ‘थिंक महाराष्ट्र’साठी समन्वय साधण्याचे काम अंगीकारले-सुध्दा व त्या नवनवी माहिती देऊ लागल्या! त्यांचे स्वत:चे अशा आशयाचे लेखनदेखील पोर्टलवर एवढ्यात येईल. आसावरी काकडे बैठकीस हजर होत्या. त्यांच्याकडे पुण्याला गोव्यात सध्या काम करत असलेले अरविंद पित्रे आले होते. काकडे यांनी आपल्या जीवनातील महत्त्वाची नवी घटना म्हणून ‘थिंक महाराष्ट्र’ बैठकीचा पित्रे यांच्याकडे उल्लेख केला. स्वाभाविकच, पित्रे या जाळ्यात आले. योगायोग असा की पित्रे त्यांच्या समविचारी मंडळींमार्फत अशीच एक हेल्पलाइन सुरू करण्याच्या विचारात आहेत..... तारा अशा जुळत जातात!

वेगवेगळी माणसे व्यक्तिगत पातळीवर बुध्दिप्रतिभेचे, चांगुलपणाचे काम करत आहेत. समाज धरला जातो व बांधला जातो तो अशा सांस्कृतिक विचारांनी, भावनांनी, घटनांनी; आज ते सारे विखुरलेले आहे. ते जर एका व्यासपीठावर (एका झेंड्याखाली नव्हे) व्यक्त झाले तर त्याचा समाजावर परिणाम होईल. एक छोटेसे उदाहरण. बीड जिल्ह्यातील केज येथे स्थानिक साहित्य संमेलन झाले. भास्कर चंदनशीव हे अध्यक्ष होते: ईश्वर मुंडे यांनी सर्व जबाबदारी वाहिली. त्यांच्या वृत्तांतातला एक परिच्छेद येथे नमूद करावासा वाटतो.

स.न.

'व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन' ही एक अभूतपूर्व संस्था निर्माण करण्यात आलेली आहे. या संस्थेमार्फत 'थिंक महाराष्ट्र डॉटकॉम' नावाची वेबसाईट चालवली जाते. ही वेबसाईट म्हणजे उद्याच्या महाराष्ट्राचे सांस्कृतिक व्यासपीठ आहे, असे वेबसाईटच्या एक वर्षाच्या अनुभवानंतर नि:शंकपणे म्हणता येते. साहित्य, कला, संस्कृतिसंचित, सामाजिक सेवेचे लहानमोठे उपक्रम आणि त्यात गुंतलेली माणसे हे या व्यासपीठाचे लक्ष्य असणार आहे. किंबहुना वर्षभरात तसा आरंभही झाला आहे. महाराष्ट्रातील गावोगावच्या छोट्यामोठ्या नोंदी या वेबसाईटवर असणार आहेत आणि एका क्लिकवर अवघ्या महाराष्ट्राचे चित्र उभे करण्याची क्षमता या साईटमध्ये येणार आहे. दिनकर गांगल हे या प्रकल्पाचे मुख्य संपादक आहेत.

यासाठी तालुकावार संस्कृतिसमन्वयक निर्माण करून महाराष्ट्रातील तीनशेचौपन्न तालुके त्यांच्या त्यांच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांसाठी पिंजून काढले जाणार आहेत. वेबसाईटचे वैशिष्ट्य व तिची कार्यपद्धत याबाबतचे तपशील सोबतच्या परिपत्रकामध्ये सापडतील, पण हे सारे साध्य करायचे तर अर्थसाहाय्याची गरज आहे. ते चार मार्गांनी उपलब्ध करून घ्यावे असा प्रयत्न आहे.

☞ दरवर्षाला तीनशे रुपये वर्गणी देऊन 'थिंक महाराष्ट्र प्रकल्पा'चे आश्रयदाते सभासद बनणे.
☞ दहा हजार रुपये देणगी देऊन व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशनचे आधारस्तंभ बनणे.
☞ 'थिंक महाराष्ट्र फाउंडेशन'चे भाग (शेअर) खरेदी करणे.
☞ मोठ्या व्यक्तिगत व कॉर्पोरेट देणग्या आणि वेबसाईटसाठी जाहिराती मिळवणे.

('झव्हजन महाराष्ट्र फाउंडेशन' ही कंपनी कायद्याच्या 'कलम २५' नुसार ना नफा प्रायव्हेट लिमिटेड कंपनी निर्माण करण्यात आली आहे. तिचे जास्तीत जास्त पन्नास भागधारक होऊ शकतात. भविष्यकाळात या वेबसाईटला महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व्यासपीठाचे खरोखर स्वरूप येईल तेव्हा या प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे रुपांतर पब्लिक लिमिटेड कंपनीत करण्याचा मानस आहे. ही अभूतपूर्व कल्पना आपल्या काळात निर्माण झाली व विकास पावली याबद्दल प्रत्येक मराठी माणसाला अभिमानच वाटेल!)

'व्हिजन महाराष्ट्र फांउडेशन' या कंपनीचे सध्या, कंपनीची नोंदणी करत असताना दोनच भागधारक आहेत! दिनकर गांगल व माधव शिरवळकर. 'व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन' या कंपनीतर्फे सध्या 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम' आणि 'साने गुरुजी डॉट नेट' या दोन वेबसाईट चालवल्या जातात आणि त्यांपैकी 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम' ही साईट सतत विस्तार पावणारी असली तरी फाउंडेशनतर्फे इतर काही उपक्रमांना चालना देण्याचा प्रयत्न आहे. ते असे :

१. मराठी भाषा शिक्षणाचा ऑन लाईन अभ्यासक्रम. मुख्यत: इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकणारी मुले आणि परदेशीय भारतीय यांच्यासाठी.

२. 'महाराष्ट्र २०२५' : व्हिजन डॉक्युमेंट बनवणे.

आपणास विनंती अशी, की वर उल्लेखलेल्या चारांपैकी कोणत्याही तऱ्हेने 'व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन'ला साहाय्य करावे. चेक/ड्राफ्ट 'व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन' नावाने पुढील पत्त्यावर पाठवावा.

'व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन', ३-वेणू अपार्टमेंट, केसर-बाग, बी. जे. देवरूखकर रोड, 'शिंदेवाडी' समोर, दादर (पूर्व), मुंबई - ४०००१४.)

(Vision Maharashtra Foundation, 3-Venu Apartment, Ground Floor, Kesar Baug, B. J. Devarukhakar Road, Opp. Shinde Wadi, Dadar (E), Mumbai - 400014.)

आपण परस्पर पुढील खात्यांमध्ये रक्कम जमा करू शकता.

Cosmos Bank - Account no.- 0121001015862

State Bank of India - Account no.- 31759182464

*मोठ्या साहित्य संमेलनांत बहुसंख्य श्रोते वक्त्याला नावाने ओळखत असतात. गावागावातल्या साहित्य संमेलनांत मात्र बहुसंख्य श्रोते वक्त्याला व्यक्तिश: ओळखत असतात आणि वक्ताही बहुसंख्य श्रोत्यांना ओळखत असतो. परिस्थितीच्या या बदलामुळे तेथील संवादाचे स्वरूपही बदलत असते. समोर बसलेल्या ओळखीच्या श्रोत्यांसमोर थापा मारता येत नाहीत. उक्ती आणि कृती यांमध्ये संतुलन ठेवावे लागते. म्हणून गावपातळीवर होणारे उपक्रम अधिक महत्त्वाचे ठरतात.*

म्हणूनच केज येथे एप्रिलमध्ये झालेले साहित्य संमेलन वेगळ्या मोलाचे ठरले. माणसे एकमेकांस ओळखत असली की जबाबदारीने बोलतात–वागतात. आज इंटरनेटसारखे प्रभावी लोकशाही माध्यम आपल्या वापरास उपलब्ध आहे. एकमेकांच्या भावना–विचार–कृती जाणून घेऊ या– एकमेकांशी जोडले जाऊ या. संपर्क– व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन, ३–वेणू अपार्टमेंट, केसरबाग, बी.जे. देवरूखकर रोड, शिंदेवाडीसमोर, दादर (पू), मुंबई ४०००१४

या अंकात नांदेडच्या रयत रुग्णालयाबाबतचा लेख येथे सादर करत आहोत. वैद्यकीय क्षेत्रातील भ्रष्टाचार साऱ्या जगाला माहीत आहे, पण काही सेवाभावी डॉक्टर्स व जनसामान्य यांनी एकत्र येऊन हा आगळावेगळा उपक्रम सुरू केला. फॅमिली डॉक्टरची पद्धत नष्ट झाली म्हणून आक्रंदन करत बसण्यापेक्षा डॉ. सुरेश खुरसाळे यांनी पुढाकार घेऊन नांदेडला योजलेला हा प्रयोग. त्यांच्याकडे लो कॉस्ट कंपनीची औषधे मिळतात, ती ब्रँडेड औषधांच्या एक तृतीयांश किमतीत! मी नांदेडचे ते रुग्णालय पाहिले व त्यामुळे प्रभावित झालो. आर.डी. लेले या ज्येष्ठातिज्येष्ठ डॉक्टरांपासून बदलापूरच्या योगेंद्र जावडेकरांपर्यंत अनेक डॉक्टर्स रुग्णसेवेच्या चांगल्या पर्यायांबाबत बोलत असतात. नांदेडचा हा एक नमुना आहे.

थिंक महाराष्ट्र डॉट कॉम या पोर्टलवर आपण रोज नवा मजकूर अपलोड करतो. त्यामध्ये काही टीकाटिप्पणी असते. डॉ. रवीन थत्ते, शिरीष गोपाळ देशपांडे, विजया चौहान, कमलाकर नाडकर्णी, शरद देशपांडे, अशोक जैन असे विविध क्षेत्रांतील लोक समाजात घडते आणि आपल्याला उत्कटपणे भावते ते येथे सादर करतात. असे अनेक लोकांनी आपापले भावनाविचार येथे नेमकेपणाने व्यक्त करावेत असे अभिप्रेत आहे. आपल्याला या योजनेत सामील व्हायचे असेल तर किरण क्षीरसागर ९०२९५५७७६७ या संपादकीय सहाय्यकास फोन करावा. तो सर्व मदत करील.

– दिनकर गांगल

thinkm2010@gmail.com

*With Best Compliments From*



**MAMA & MAYUR BHAI GROUP**
**INTERCITY EXPRESS**

## जिल्हा नांदेड

# रयतेचे दिवस

◆ *नरेंद्र पटवारी*

**एस.टी.** महामंडळामधून २००८ साली सेवानिवृत्त झाल्यानंतर दीड-दोन वर्षे इकडेतिकडे फिरण्यात घालवले. त्यानंतर दिवस कंटाळवाणे जात होते. तेवढ्यात रयत रुग्णालयाची प्रशासकीय अधिकारी पाहिजे अशी जाहिरात वाचली. म्हणून विचार केला, की बघावा अर्ज करून. माझा दिवस चांगला जाईल व एका सेवाभावी संस्थेमध्ये काम केल्याचे समाधानही मिळेल! रयत आरोग्य मंडळात एक नाव मी ऐकून होतो. ती व्यक्ती होती डॉ.एस.टी.खुरसाळे. खुरसाळे फार कडक आहेत, रागीट आहेत, कोणाला मदत वगैरे करत नाहीत इत्यादी. मी माझा अर्ज घेऊन मुलाखतीसाठी गेलो, इतरही पाच-सहा जण होते.

मुलाखत घेण्यासाठी खुरसाळे यांच्यासमवेत बोराळकर व के.ए. शेटे हे होते. मुलाखतीनंतर मला सांगण्यात आले, की तुम्हाला एक-दोन दिवसांत कळवू. त्यानंतर खरोखरच, एक-दोन दिवसांनी मला रयत रुग्णालयातून निरोप आला, की माझी निवड झाली आहे व मला त्वरित हजर व्हायचे आहे! त्याप्रमाणे मी रयत रुग्णालयात प्रशासकीय अधिकारी या पदावर रूजू झालो. एस.टी.महामंडळातील काम व रयत रुग्णालयातील काम एकदम भिन्न भिन्न स्वरूपाचे होते. तरी-परंतु तेथील सर्व पदाधिकारी, डॉक्टर्स व कर्मचारी यांच्या सहकार्यामुळे काही दिवसांतच मला कामाचे आकलन झाले व मी कामास सुरुवात केली. नांदेडमधील काही डॉक्टर्स, व्यापारी, प्रतिष्ठित नागरिक यांनी एकत्र येऊन गोरगरीब, गरजू रुग्णांसाठी माफक दरात सर्व वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी रयत आरोग्य मंडळ स्थापन करून 'कलामंदिर'च्या मागे, जुन्या बी.के.इन लॉजमध्ये भाड्याच्या वास्तूत रयत रुग्णालयाची मुहूर्तमेढ मे२००५ मध्ये रोवली. वैद्यकीय उपचार हा गोरगरिबांच्या आवाक्याबाहेर गेला आहे. इतर ठिकाणी रुग्णाची तपासणी दीडशे ते एकशेवीस रुपये एवढी फी आकारून केली जाते, रयत रुग्णालयात मात्र त्यासाठी केवळ चाळीस रुपये आकारले जातात. या रुग्णालयात इतर रुग्णालयांप्रमाणेच सर्व आवश्यक वैद्यकीय सेवा, सोयी आहेत; दोन ऑपरेशन थिएटर्स, जयपूर फूट विभाग, नेत्रतपासणी विभाग, स्त्रियांच्या आजारासाठी तज्ञ महिला डॉक्टर्स, पॅथॉलॉजिकल टेस्टसाठी अद्ययावत प्रयोगशाळा, डिजिटल एक्सरे मशीन, औषधी विभाग इत्यादी. खुरसाळेसरांच्या रुग्णालयात काम करणाऱ्या डॉक्टर्सना सक्त सूचना आहेत, की आवश्यक तेव्हाच पॅथॉलॉजिकल टेस्ट (गरजेएवढ्याच) करायच्या व योग्य तेवढ्याच औषध-गोळ्या रुग्णास द्यायच्या.

माझे जावई एका महिन्याच्या सुट्टीसाठी भारतात आले होते, तेव्हा त्यांनी त्यांचा गुडघा दुखत असल्याबाबत मला सांगितले. मी म्हणालो, की खुरसाळेसर हे अस्थितज्ञ आहेत. आपण त्यांच्याकडून वैद्यकीय सल्ला घेऊ. माझ्या जावयांनी त्यांना दुखण्याची कल्पना दिली. त्यानंतर डॉक्टरसाहेबांनी दोन-तीन व्यायाम सांगितले व महिन्याच्या गोळ्या लिहून दिल्या. खुरसाळे यांनी लिहून दिलेली औषधांची चिठ्ठी घेऊन माझे जावई औषधी विभागात गेले व त्यांनी गोळ्यांची मागणी केली. त्यांनी फार्मासिस्टला नेहमीच्या सवयीनुसार पाचशेची नोट दिली. तेव्हा फार्मासिस्ट म्हणाला, सत्तावीस रुपये फक्त.




**रुग्णालयातील जयपूर फूट विभागासमोर डॉ. अभय बंग**

चिल्लर द्या. ते ऐकून माझे जावई आश्चर्यचकित झाले. मी त्यांना म्हणालो, हे रयत रुग्णालय आहे. येथे अनावश्यक औषधे-गोळ्या रुग्णांच्या गळी उतरवत नाहीत आणि औषधंदेखील 'लो कॉस्ट'ची असतात.

रयत रुग्णालयामधील त्यांच्या डॉक्टर्स मंडळींची नावे पाहिली तर ही मंडळीपण त्यांच्या त्यांच्या विषयातील तज्ज्ञ आहेत. उदा. डॉ.अर्जुन मापारे, डॉ. अरुण रामकृष्ण महाले, डॉ. सुनील माधवराव गायकवाड. डॉ. अवधिया, डॉ. अजय खुरसाळे, डॉ. देवेंद्रसिंग लालासिंग पालीवाल, डॉ. मंगला देशमुख, डॉ. मनीषा खुरसाळे, डॉ. विजया अण्णाराव गऊळकर, डॉ. काझीमखाह मोझमाह, डॉ. चिलकेवार, डॉ. सुभाष विश्वनाथप्पा हुरणे इत्यादी. रयत रुग्णालय ही सेवाभावी संस्था आहे. त्यासाठी आपलेही योगदान असावे या भावनेपोटी डॉ. हुरणे हे प्रत्येक महिन्यात डोळ्याचे ऑपरेशन झालेल्या एका पेशंटची फी स्वत: देतात.

रयत रुग्णालयात काम करत असताना माझ्या असे लक्षात आले, की या मंडळामध्ये असलेले पदाधिकारी, सदस्य हे रुग्णांचे हित हेच ध्येय डोळ्यांपुढे ठेवून रुग्णालय चालवण्याची कसरत करतात. रयत रुग्णालय सुरू करण्यची मूळ कल्पना एस.टी.खुरसाळे यांची. ते या रुग्णालयाचे चांगले नाव होण्या-साठी या वयातदेखील तनाने व मनाने, वेळेचे भान सतत विसरून काम करतात. त्याचप्रमाणे त्यांच्या साथीला बोराळकर, सुधाकरराव टाक, डॉ. अर्जुन मापारेसर, कमलाकरराव शेटे, एम.आर.जाधव हे पदाधिकारीपण



**रुग्णालयास अण्णा हजारे यांची भेट. डॉ. सुरेश खुरसाळे व रुग्णालयातील अन्य मंडळी**

रुग्णालयाच्या दैनंदिन कामकाजावर बारीक लक्ष ठेवून असतात.

एकदा एका खेड्यातील आजी तिच्या मुलासह व तीन वर्षे वयाच्या नातवासह आली होती. नातू पडल्याने फ्रॅक्चर झाला होता व त्यावर उपचार करणे आवश्यक होते. खुरसाळेसरांनी त्या मुलाच्या वडिलांना कल्पना दिली व प्लास्टर घालण्याचे सांगितले. मुलाचे वडील त्यास तयार होत नव्हते व दोन-चार दिवसांनी परत येतो म्हणून जाण्यास निघाले. मुलावर त्वरित उपचारांची आवश्यकता होती, म्हणून मी व रुग्णालयाचे टेक्निशीयन हनुमंत पापडू यांनी त्या आजीबाईकडे चौकशी केली. त्यांनी पैशांची अडचण असल्याचे सांगितले. आम्ही सदर बाब खुरसाळेसरांच्या कानावर घातली, तेव्हा त्यांनी तात्काळ मुलास ॲडमिट करून घेऊन योग्य ते उपचार केले व त्याची फी व औषधोपचाराचा, प्लॅस्टरचा खर्च घेऊ नये अशा सूचना दिल्या.

संत पाचलेगावकर आश्रमाचे श्री गोविंदगुरू व त्यांच्या कुटुंबीयांच्या जीपला अपघात झाल्याचे समजताच सुधाकरराव टाक यांनी रयत रुग्णालयात फोन करून स्वतंत्र खोली तीन-चार बेडसह तयार ठेवण्याच्या व डॉक्टर्सनाही तयारीत राहण्याच्या सूचना दिल्या. जखमी परिवारास ॲडमिट

करून, त्वरित उपचारांची व्यवस्था करून घेतली. गोविंदगुरू व त्यांचा परिवार रुग्णालयात असेपर्यंत त्यांच्या वैद्यकीय उपचारावर देखरेख ठेवून होते. एवढेच नव्हे तर गोविंदगुरू यांच्या बिलाची रक्कम टाकसरांनी स्वत: भरली.

मिलिटरीतून सेवानिवृत्त झालेले एक वयस्कर अधिकारी त्यांच्या परिवारासह नांदेड येथे गुरुद्वारा दर्शनासाठी आले होते. त्यांच्या पत्नीची प्रकृती अचानक खूपच बिघडली व त्या बेशुद्धावस्थेत शासकीय रुग्णालयात चार-पाच दिवस राहिल्यानंतर सदर परिवाराने आर्थिक अडचणीमुळे अमृतसर येथे परत जाण्याचा निर्णय घेतला. त्यांना ॲम्ब्युलन्स व इतर वैद्यकीय मदतीसाठी रयत रुग्णालयात चौकशीसाठी पाठवले गेले. मी शेटेसरांना फोनवरून ही माहिती सांगितली. ते त्वरित रुग्णालयात आले. त्यांनी त्या परिवारास अमृतसर येथे जाण्यासाठी सेवानिवृत्त सैनिकांच्या महिलांद्वारे चालवण्यात येणारी रुग्णवाहिका, एक डॉक्टर, एक कंपाऊंडर व दोन चालकांची व्यवस्था उपलब्ध करून दिली.

या घटनांचा उल्लेख करायचे कारण म्हाणजे रयत रुग्णालयाचे सर्व पदाधिकारी रुग्णालयाच्या उत्पन्नास प्राधान्य न देता रुग्णसेवेस प्राधान्य देतात हे वाचकांच्या लक्षात आणून द्यावे, म्हणून.

एवढ्या चांगल्या संस्थेत काम करायची संधी मला मिळाली हे मी माझे भाग्य समजतो. तेथे काम करत असताना खुरसाळेसरांशी वारंवार संबंध यायचा, परंतु मला ते चांगले, सहृदय व गरजूंना मदत करणारे, कर्तव्यकठोर गृहस्थ वाटले. मला पूर्वी लोकांनी त्यांच्याबद्दल जे सांगितले तसे काही मला खुरसाळेसर वाटले नाहीत. 'रयत'चे पदाधिकारी प्रसिद्धीपासून दूर राहून काम करतात.

मला माझ्या कौटुंबिक कारणास्तव दु:खी मनाने 'रयत'चे काम सोडावे लागले.

**– नरेंद्र पटवारी**

(रयत आरोग्य मंडळ रयत आरोग्य पत्रिका नावाचे मासिक प्रसिध्द करते. ते माहितीपूर्ण व उदबोधक असते. त्यामधून हा लेख 'थिंक महाराष्ट्र'ने घेतला आहे.)

रयत आरोग्य रुग्णालय- फोन नंबर (०२४६२) ४७४४४

डॉ. सुरेश खुरसाळे ९४२२१७२८३२


*With Best Compliments From*

# Little Flower's English High School

**Jeena Cosmopolitan Education Trust, Estd. 1972 / Maharashtra Education Trust, Estd. 1969**

## C. K. JOSEPH

**Chairman & Managing Trustee**

Samel pada, Sapara, P.O., Dist.
Thane, Maharashtra - 401203

**Phone : 95250 - 402 017 (E) 95250 - 438 717**

# जन्मजात बहिरेपणावर उपाय

*लतिका भानुशाली*

**रामाचा** सेतू बांधताना खारीचा वाटा नगण्य वाटला तरी महत्त्वाचा होता. समाजाच्या जडणघडणीत असाच खारीचा वाटा अनेक जण उचलत असतात. कधी तो छोटा असतो तर कधी तो मोठा असतो पण तो वाटा फार महत्त्वाचा असतो. तीच तर माणसामधल्या माणुसकीची ओळख ठरत असते.

एरवी वैद्यकीय क्षेत्रात 'प्लॅस्टिक सर्जरी' हे फॅशनच्या ग्लॅमरस दुनियेतील फॅडच समजले जाते. कारण ती महागडी व अनावश्यक शस्त्रक्रिया आहे असा सर्वांचा समज आहे. पण जन्मजात वाकडे नाक, फाटलेले ओठ, चेहऱ्यावर व्रण, काळे डाग असे व्यंग घेऊन जगणाऱ्या मुलांचे; विशेषत: मुलींचे पुढील आयुष्य किती अवहेलनेचे असते या विचारातून अमेरिकास्तित डॉ. शरदकुमार दीक्षत दरवर्षी भारतात येऊन अशी व्यंग असणाऱ्या मुलांवर मोफत प्लॅस्टिक सर्जरी करून परमेश्वराने निर्माण केलेली चूक दुरुस्त करण्याचा प्रयत्न गेली अनेक वर्षे करताहेत.

अशीच दुसरी महागडी शस्त्रक्रिया म्हणजे श्रवणयंत्राचाही उपयोग न झालेल्या कर्णबधिरांवर केली जाणारी 'कॉक्लिअर इम्प्लांट' ही शस्त्रक्रिया. ही शस्त्रक्रिया मोफत करण्याचे व्रत घेतले आहे ते ठाण्यातील कान-नाक-घसा तज्ज्ञ डॉ. प्रदीप उप्पल यांनी. अमेरिकेच्या इंटरनोव्हेशन या वैद्यकीय सल्लागार संस्थेने डॉक्टरांच्या या कामगिरीची दखल घेतली आहे. या संस्थेने जाहीर केलेल्या उत्कृष्ट डॉक्टरांच्या यादीत डॉ. तात्याराव लहानेंबरोबर मुंबईतील ज्या डॉक्टरांचा समावेश करण्यात आला त्यात डॉ. प्रदीप उप्पल यांचाही समावेश आहे.

अशा प्रकारचे काम करण्यामागे डॉक्टरांचा दृष्टिकोन खूप मोठा व व्यापक आहे. ते म्हणतात, लहान बालक जे ऐकते ते बोलते, पण जर ते ऐकू शकले नाही तर ते कधीच बोलू शकणार नाही. या बाबतीतले शास्त्रीय सत्य असे आहे, की जन्मत: सर्वांच्याच मेंदूत वाचाकेंद्र (speech centre) असते पण ते निद्रावस्थेत असते. ज्यावेळी कानाद्वारे ध्वनी मेंदूतील या केंद्रापर्यंत पोचतो तेव्हा ते केंद्र कार्यान्वित होते. या केंद्राचा जास्तीत जास्त विकास वयाच्या एक ते तीन या वर्षांत होतो. काही कारणाने ध्वनी जर या केंद्राकडे पोचले नाहीत तर हे केंद्र सुप्तावस्थेतच राहते. ध्वनीरूपी पाणी जर या वाचाकेंद्ररूपी रोपट्याला मिळाले नाही तर हे रोपटे (वाचाकेंद्र) सुकून जाते. साधारणपणे पाच ते सहा वर्षांपर्यंत हे केंद्र आकुंचन पावण्याची प्रक्रिया पूर्ण होते व नंतर कितीही प्रयत्न केले तरी ते निरूपयोगी ठरते. जर हा दोष मुलांच्या जन्मानंतर लगेच लक्षात आला तर 'कॉक्लिअर इम्प्लांट' शस्त्रक्रिया करून कृत्रिमरीत्या ध्वनी केंद्रापर्यंत पोचवून हे केंद्र जिवंत ठेवणे शक्य असते.

श्रवणाच्या आनंदापासून एकही मूल वंचित राहू नये म्हणून परदेशात श्रवणदोष निदान चाचण्या जन्मापासून तीन महिन्यांच्या आत करणे व त्यानुसार सहा महिन्यांच्या आत योग्य तो उपचार श्रवणदोषग्रस्त बालकांवर करणे हे कायद्याने बंधनकारक आहे. जर डॉक्टरांनी अशा श्रवणचाचण्या केल्या नाहीत तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाते. सर्वसाधारणपणे दर एक हजार मुलांमागे दोन ते चार अर्भके श्रवणदोषाने ग्रस्त असतात. नवजात अर्भकात आढळून येणाऱ्या इतर दोषांपेक्षा श्रवणदोषांचे प्रमाण अधिक आहे.

म्हणजेच या दोषांमुळे निर्माण होणारे सामाजिक परिणाम

गंभीर आहेत हे सत्य पाश्चात्य देशांनी स्वीकारून त्यानुसार कायदा बनवला आहे. आपल्याकडे मात्र या विषयाबाबतचे गांभीर्य अजून तितकेसे नाही. सरकारी पातळीवर असा कायदा विचाराधीन आहे. मात्र कायद्याची वाट न पाहता डॉ. प्रदीप उप्पल यांनी पालक व बालरोगतज्ज्ञ यांच्यात जागृती निर्माण करण्यास सुरुवात केली आहे. आतापर्यंत दोन हजारांपेक्षा जास्त मुलांच्या श्रवणदोष निदान चाचण्या त्यांनी केल्या आहेत. जेणेकरून श्रवणयंत्राचाही फायदा न होणाऱ्या बाल्यांवर योग्य वयात 'कॉक्लिअर इम्प्लांट' शस्त्रक्रिया करणे शक्य होईल.

ऐकू येण्याच्या क्रियेत कानावर पडलेल्या ध्वनिलहरी इलेक्ट्रिकल इंम्पल्समध्ये रूपांतरित होऊन नर्व्हद्वारा मेंदूपर्यंत पोचतात. मेंदूत त्याची नोंद होते. आपल्याला ऐकू येते, मग पुढील प्रक्रिया घडते. ज्या मुलांच्या बाबतीत 'कॉक्लिआ' (जिथे मेकॅनिकल व्हेव्हज इलेक्ट्रिक व्हेव्हजमध्ये रूपांतरित होतात तो कानातील भाग) काम करत नाही अशा मुलांसाठी 'कॉक्लिअर इम्प्लांट' हा एकमेव पर्याय असतो. या उपकरणाचा एक भाग कानाच्या वर लावला जातो आणि डोक्यावरील त्वचेखालून त्याची एक वायर 'कॉक्लिआ'पर्यंत पोचवली जाते. या वायरच्या डोक्याकडील टोकाला चार आण्याच्या नाण्याच्या आकाराची चुंबकचकती लावलेली असते. ही चकती आणि वायर ध्वनिलहरीवहनाचे काम करते. आवाज चकतीमधून वायरमध्ये आणि वायरमधून मेंदूपर्यंत (श्रवणकेंद्रापर्यंत- ज्यामुळे वाचाकेंद्र कार्यान्वित होते) पोचवला जातो आणि पेशंटला ऐकायला येते.

श्रवणयंत्र व हे इम्प्लांट यांच्यात फरक आहे. श्रवणयंत्रामध्ये (Hearing aid) माईक, ॲम्प्लिफायर आणि स्पीकर असतात. त्यात आवाज 'ॲम्प्लिफाय' केला जातो म्हणजेच आवाजाची पातळी वाढवली जाते.

श्रवणयंत्र लावले, की सगळ्याच बहिऱ्या मुलांना ऐकू येऊ शकते हा एक सार्वत्रिक गैरसमज आहे. जेव्हा पालक पाच-सहा वर्षाच्या मुलाला 'ऐकू येत नाही' ही तक्रार घेऊन येतात, तेव्हा मेंदूतील वाचाकेंद्र आकुंचन पावल्यामुळे आपण काही करू शकत नाही हे शल्य डॉक्टरांना अस्वस्थ करत राहते. कारण दोन ते तीन वर्षापर्यंतचे मूल योग्य वेळी तज्ज्ञाकडे आणले व 'कॉक्लिअर इम्प्लांट सर्जरी' करून छोटी चीप डोक्याच्या त्वचेखाली बसवली तर मुलाच्या श्रवणक्षमतेत सुधारणा होऊ शकते व ते मूल बोलू शकते, हे डॉक्टरांना माहीत असते. परंतु अज्ञानामुळे उशीर होतो आणि वेळ निघून गेल्यामुळे जीवनातल्या सर्व सुखांना ते मूल वंचित होते. म्हणजेच विकसित तंत्रज्ञान



डॉ. प्रदीप उप्पल

उपलब्ध असूनसुद्धा त्याचा योग्य वयात वापर न केल्यामुळे, त्याबाबतच्या अज्ञानामुळे हजारो बालके बहिरेपणा व पर्यायाने मुकेपणाला सामोरी जातात. अंध मुलाचे व्यंग हे दृश्य स्वरूपातील असल्याने त्यांना समाजाची सहानुभूती मिळते. पण व्यंग न दिसणारी मूकबधिर मुले मात्र समाजात टिंगलटवाळीचा विषय ठरतात. कॅन्सर, हृदयरोग अशा मोठ्या मोठ्या आजारांच्या अवघड शस्त्रक्रिया नेहमीच समाजात चर्चेचा विषय ठरतात. पण या प्रकारच्या शस्त्रक्रियांना योग्य ती प्रसिद्धी मिळत नाही. पण डॉ. उप्पल मात्र या सर्वांची पर्वा न करता मोफत शस्त्रक्रिया करतात. शिवाय त्या बालकाचे हॉस्पिटलमधील वास्तव्य, औषधे या सर्वांचा भार स्वत:च उचलतात. शिवाय, 'कॉक्लिअर इम्प्लांट' ही परदेशातून आयात करावी लागणारी चीप महाग असल्याने त्यासाठीच्या पैशांची जुळवाजुळव करण्याचे कामसुद्धा सामाजिक संस्था व दानशूर व्यक्तींच्या मदतीने स्वत:च करतात. एखाद्या व्रतस्थ तपस्वीप्रमाणे त्यांनी घेतलेला हा वसा अनेक मुलांच्या जीवनात आनंद निर्माण करतोय व ती मुले सर्वसाधारण मुलांच्या शाळेत शिक्षण घेत आहेत.

डॉ. प्रदीप उप्पल यांनी आपल्या हॉस्पिटलमध्ये २५ जुलै २००९ रोजी ठाणे जिल्ह्यातील पहिली 'कॉक्लिअर इम्प्लांट' शस्त्रक्रिया सानवी या दोन वर्षे अकरा महिने वयाच्या मुलीवर केली तेव्हा तिच्या आई-वडिलांच्या आनंदाला पारावार उरला नाही. सानवीच्या डाव्या कानाच्या वर, त्वचेखाली एक छोटी 'चीप' बसवली गेली व ऑगस्ट महिन्यात ती 'ऑन' करण्यात आली. आज या शस्त्रक्रियेला दोन वर्षे झाली आहेत आणि सानवी सर्वसाधारण मुलांच्या शाळेत शिकत आहे.

सानवी दीड वर्षांची झाली तरी बोलत नाही हे तिच्या पालकांच्या वेळीच लक्षात आल्याने त्यांनी तिला डॉ. उप्पल यांच्या हॉस्पिटलमध्ये आणले. डॉक्टरांच्या ऑडिओलॉजिस्टने सानवीच्या विविध श्रवणदोष निदान चाचण्या केल्या. कानाला श्रवणयंत्र लावण्यात आले, पण त्या यंत्राचासुद्धा सानवीला उपयोग झाला नाही. सानवीच्या जीवनाला अंधकारात लोटणाऱ्या या बहिरेपणाला आशेचा किरण दाखवला तो डॉ. प्रदीप उप्पल ह्यांनी.

अर्थात, आज शस्त्रक्रिया झाली आणि मूल उद्या बोलायला लागले असे होत नाही. त्यासाठी श्रवणप्रशिक्षण व त्याआधारे भाषा आत्मसात करणे या दोन्हींसाठी विशेष प्रशिक्षणाची गरज आहे. थोडक्यात ही संपूर्ण शस्त्रक्रिया म्हणजे इ.एन.टी. शल्यविशारद, ऑडिओलॉजिस्ट, स्पीच थेरपीस्ट व विशेष प्रशिक्षित प्रशिक्षक यांचे एकत्रित काम आहे. शिवाय डॉक्टर उपल्ल यांचे आश्वासक बोलणे पालकांचा विश्वास संपादन करण्यास पूरक ठरते. पालकांना या सर्व गोष्टी एकाच ठिकाणी उपलब्ध नसल्यामुळे करावी लागणारी पायपीट कमी व्हावी म्हणून या सर्वच गोष्टींचे एकत्र आयोजन डॉ. उप्पल यांनी आपल्या हॉस्पिटलमध्ये केले आहे.

आपल्या देशातील सरकारी व एकूणच सामाजिक अनास्थेमुळे हा दोष तिसऱ्या ते चौथ्या वर्षी निदर्शनास येतो. अज्ञानामुळे तर काही वेळा पालक घरातील ज्येष्ठांच्या सल्ल्यानुसार वाट पाहणे पसंत करतात. उदाहरणार्थ, 'तुझी काकी, काका, अमका-तमकापण उशिरा बोलायला लागले होते. काळजी करू नको...' वगैरे. शिवाय, बालक मातेच्या चेहऱ्यावरील हावभावाला प्रतिसाद देत असेल तर 'बाळाला ऐकू येत आहे' असे गृहीत धरले जाते. याची तुलना आपण बासरीच्या हालचाली पाहून डोलणाऱ्या सापाबरोबर करू शकतो. सापाला ऐकू येत नाही हे शास्त्रीय सत्य आहे, याचे भान आपल्याला नसते.

काही वेळा फॅमिली डॉक्टरसुद्धा धीर धरून वाट पाहत बसत, कारण या दोषाचे निदान करणाऱ्या चाचण्या व त्यासाठी लागणारी अत्याधुनिक यंत्रणा आपल्याकडे सहज उपलब्ध नव्हती. त्यामुळे बालकाला वयाच्या तिसऱ्या-चौथ्या वर्षी तज्ज्ञांकडे आणले जाते. याचाच अर्थ, जाणारा प्रत्येक दिवस बाळाला बहिरेपणाच्या अंधारात ढकलत असतो. मुलांतील श्रवणदोष शोधण्यासाठी ज्या चाचण्या केल्या जातात त्यांना फक्त दोन ते तीन मिनिटे लागतात, पण त्याचाही लाभ पालकांकडून घेतला जात नाही.



कॉक्लिअर इम्प्लांट केलेला जोश हा मुलगा, वय १ वर्ष ३ महिने

साधारणपणे जन्मानंतर लगेच न रडणारी बालके, श्वसनासाठी कृत्रिम श्वासनलिकेचा आधार घ्यावी लागणारी बालके, गर्भावस्थेत मातेला झालेला एखादा संसर्ग, १५०० ग्रॅमपेक्षा कमी वजनाची जन्मलेली बालके, मेंदूचा संसर्ग (Meningitis), काविळीचा संसर्ग झालेली बालके अशी लक्षणे असलेल्या बालकांत श्रवणदोषाची शक्यता दहापट जास्त असते.

श्रवणदोष असणारी बालके संवादकौशल्य, भाषिक कौशल्य यांत अधिक वेळ घेतात. पर्यायाने ही मुले आकलन, संभाषण, वाचन, सामाजिक-भावनिक विकास, ज्ञान आत्मसात करणे या सर्वच पातळीवर सर्वसामान्य मुलांपेक्षा मागे पडतात. जरी ती मतिमंद नसली तरीसुद्धा.

आवाजाच्या दिशेने मान वळवणे किंवा 'ना-ना', 'टा-टा'सारख्या शब्दांना प्रतिसाद देणे इत्यादी सामान्य विकासाची लक्षणे जर दिसत नसतील तर आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने श्रवणदोष प्राथमिक अवस्थेतच शोधता येतो. त्यासाठी पुढील चाचण्या उपलब्ध आहेत.

OAE (Oto Acaustic Emission) - या चाचणीद्वारे श्रवणकेंद्रातील दोष शोधला जातो. एका सूक्ष्म इयरफोनमधून ध्वनीचे प्रक्षेपण केले जाते. जर श्रवणनलिकेत ध्वनीचा प्रतिध्वनी



(echo) आला तर अर्भकाची श्रवणक्षमता निर्दोष आहे हे समजते. श्रवणदोष असणाऱ्या बालकात या प्रतिध्वनीची नोंद होत नाही. या चाचणीत कानाची ध्वनी ग्रहण करण्याची क्षमता आहे किंवा नाही ते समजते. याला 'स्क्रिनिंग टेस्ट' असे म्हणतात.

BERA (Brainstem Evoked Response Audiometry) - या चाचणीत एका छोट्याशा इयरफोनद्वारे कानात ध्वनी उद्दिपित केला जातो आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या विद्युत ध्वनिलहरींमधील प्रतिसादाची नोंद केली जाते. म्हणजेच ध्वनीला प्रतिसाद देण्याची मेंदूची क्षमता याद्वारे तपासली जाते. त्याच्याआधारे किती व कोणत्या प्रकारचा श्रवणदोष आहे याचे सहज आकलन होते.

ASSR (Audiometry Steady State Response) - BERAमध्ये ध्वनीच्या सगळ्याच पट्ट्या (फ्रिक्वेन्सी) मोजता येत नाहीत. पण ASSR चाचणीमध्ये ध्वनीची फ्रिक्वेन्सी स्वतंत्रपणे मोजता येते.

BOA (Bahavioural Observation Audiometry) - यात बाळाचे सर्वसाधारण वर्तन तपासले जाते. उदा. दचकणे, रडणे, हसणे, बघणे व त्यावरून अंदाज घेऊन निर्णय घेतला जातो. दुर्दैवाने या चाचण्यांसाठी लागणारी यंत्रणा मोठ्या पंचतारांकित हॉस्पिटलांमध्येही उपलब्ध नाही.

ज्या प्रौढ व्यक्तींना श्रवणयंत्राचा उपयोग होत नाही त्यांच्यासाठीसुद्धा ही शस्त्रक्रिया उपयोगी ठरते.

डॉक्टरांच्या मते, श्रवणदोषामुळे बालक मतिमंद नसूनसुद्धा त्याच्या मेंदूचा अपेक्षित विकास होत नाही. ही मानवी चूक आहे, कारण वेळेत उपचार झाले तर शस्त्रक्रियेच्या आधारे बाळाला ऐकू येणे शक्य आहे.

आज ज्या बालकांवर डॉक्टरांनी या शस्त्रक्रिया केल्या त्या सर्वांचेच पालक जागरूकपणे नंतरचे 'श्रवण-प्रशिक्षण' मुलांना देण्यासाठी तत्पर आहेत. डोक्याच्या त्वचेखाली बसवलेल्या 'चीप'कडे ध्वनी पाठवताना साधारणपणे एकच भाषा वापरावी असा संकेत आहे, नाही तर मुलाचा गोंधळ उडण्याची शक्यता असते. अशा पालकांपैकी एक तेलगू माता (जिला तेलगू सोडून दुसरे काहीच येत नाही) चक्क हिंदी भाषेचे शिक्षण घेत आहे, कारण ऑडिओलॉजिस्ट व श्रवणप्रशिक्षक हिंदीतून प्रशिक्षण देतात. सानवीच्या आईने तर नवीनच प्रयोग केला. दोन भाषा एकत्र शिकवल्यास बालकाचा विकास इतर मुलांच्या तुलनेने लवकर होणार नाही हे माहीत असूनसुद्धा सानवीच्या आईने इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषा एकाच वेळी शिकवण्यास सुरुवात केली आणि सुदैवाने, हळुहळू का होईना, सानवी या दोन्ही भाषांना प्रतिसाद देत आहे.

ठाणे व त्या पुढच्या लोकांना छोट्या श्रवणचाचण्या करण्यासाठीही मोठ्या हॉस्पिटलमध्ये मुंबईला जाणे म्हणजे कठीण काम असते. ठाण्यातील डॉक्टर उप्पल यांच्या क्लिनिकमध्ये या सर्व यंत्रणा उपलब्ध असून, गरजू बालकांसाठी चाचणी मोफत करून दिली जाते. डॉक्टरांच्या पत्नी, कान-नाक-घसा तज्ज्ञ डॉ. उमा उप्पल यांचाही या कार्यात मोलाचा सहभाग आहे. त्या आपल्या ऑडिओलॉजिस्टला मुद्दामहून कल्याण, डोंबिवली, मुलुंड येथील हॉस्पिटलांत पाठवतात. मुलांमधील श्रवणदोष वेळीच लक्षात यावा व त्यावर लगेच उपचार व्हावेत यासाठी या डॉक्टर दांपत्याचा हा प्रामाणिक प्रयत्न!

या प्रकारच्या ऑपरेशन्सची मोठ्या शहरांत किरकोळ स्वरूपात सुरुवात झाली आहे, पण प्रमाण नगण्य आहे. अशी विविध सेंटर जर सर्वत्र उपलब्ध झाली तर त्या दृष्टीने जनजागृती शक्य आहे.

या संदर्भात जागृती निर्माण करण्यासाठी डॉक्टर उप्पल सतत चर्चासत्रे आयोजित करतात. विविध बालरोगतज्ज्ञांना मार्गदर्शन करतात. श्रवणदोषाचे निदान करणाऱ्या चाचण्या पालकांनी कराव्या म्हणून त्यांना उद्युक्त करतात. श्रवणदोषग्रस्त बालकांच्या पालकांच्या सभा भरवून त्यांना आपापसांत चर्चा करायला लावतात. जेणेकरून एकाचे अनुभव दुसऱ्यांच्या उपयोगी पडावेत.

कान-नाक-घसा तज्ज्ञांचे एक शिष्टमंडळ माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम यांना भेटायला गेले होते, तेव्हा लहान मुलांशी विशेष मैत्री असणाऱ्या अब्दुल कलाम यांनी भारतात 'कॉक्लिअर इम्प्लांट' तयार करण्याच्या दृष्टीने इस्रोचे शास्त्रज्ञ प्रयत्न करत असल्याचे सांगितले. भारतात ही उपकरणे तयार होऊ लागली तर त्यांच्या किमती खूपच कमी होतील व सामान्य माणसाला परवडू लागतील. तोपर्यंत मात्र परदेशी उपकरणांवर आपल्याला अवलंबून राहावे लागेल हे सत्य आहे. पैशांअभावी अनेक बालके आज डॉ. उप्पल यांच्या इस्पितळात दात्यांची वाट पाहत आहेत. कोणी जमीन, दागिने विकून थोड्या पैशांची तजवीज देखील केली आहे. कॅन्सरसारख्या दुर्धर रोगांसाठी रूग्णांना जशी सहज मदत उपलब्ध होते तसे मात्र मूकबधीर बालकांच्या बाबतीत घडत नाही ही दुर्दैवाची बाब आहे. समाजसेवी संस्था आणि व्यक्ती या आवाहनाला प्रतिसाद देतील असे वाटते.

**लतिका भानुशाली**
१० सी, एन्जालिका कॉसमॉस लाँज,
नीलकंठ ग्रीनसमोर, मानपाडा, ठाणे (प.) ४०० ६०६
latikabhanushali@yahoo.co.in

*With Best Compliments From*

# K. C. Fixtures

: Mfgs. of :

**Luminaires, Modular Furniture & Sheet Metal Components**

Survey No. 377/1(13), Zaricauseway Road,
Kachigam, Nahi Daman 396 210
**Phone : 0260 - 2243592**

*With Best Compliments From*

# POONAM DEVELOPERS

Building Houses, Creating Homes

POONAM™
SKYLINE
CONSTRUCTION
building Houses, creating Homes

## Ramesh Mehta

**Admn. Off.:** 12, Poonam Plaza, Tirupati Nagar - 1,
Virar (W) - 401303
Tel.: 95250-2504010 / 2515263 / 2513205 / 2503153

---

**Regd. Off.**: 66 B, Podar Chamber, 3rd floor, 23-E,
Sayed Abdulla Brelvi Road,
(Mumbai Samachar Marg), Fort, Mumbai - 400001.
Tel.: 022 - 22641140

# टेलरमेड जीन्स

डॉ. उज्ज्वला दळवी

कोळ्याच्या जाळ्याचा धागा रेशमाहून लवचिक, हलका असतो आणि तरीही त्याची ताण पेलायची ताकद पोलादाहून अधिक असते. त्या धाग्याचं प्रथिन बनवणारी कोळ्याची जनुकं शास्त्रज्ञांनी काही शेळ्यांना बहाल केली. अशा तयार झालेल्या 'Spidergoats' ना त्या जाळ्याच्या मौल्यवान प्रथिनाचा पान्हा फुटला. हा हलका, टणक धागा विमानांत, शर्यतीच्या गाड्यांत फारच उपयोगाचा आहे. शिवाय, डोळ्यांच्या शस्त्रक्रियेत वापरले जाणारे टाके, पोलिसांचे, सैनिकांचे बुलेट-प्रूफ कपडे यांसाठीही त्याला मागणी आहे.

**मी** कसा झालो हा प्रश्न लहान मुलांना पडतो तसाच विद्वान शास्त्रज्ञांनाही पडला. त्या प्रश्नाच्या उत्तराचा मागोवा घेताघेता त्यांना समस्त सजीव पेशींच्या गाभ्यात जपलेलं, जीवसृष्टीचं इन्स्ट्रक्शन मॅन्युअल (Human Genome, मानवी जनुककोश) सापडलं.

प्रत्येक सजीव पेशीचं केंद्रक एखाद्या संदर्भ ग्रंथालयासारखं असतं. संदर्भग्रंथांतून तिथंच बसून हवं तेवढं वाचा. पण एकही ग्रंथ बाहेर नेता येत नाही. पेशीकेंद्रातला जनुककोशही तसाच, कधीही तिथून बाहेर नेता येत नाही. म्हणून त्या ग्रंथात डीएनएच्या लिपीमध्ये लिहिलेल्या इन्स्ट्रक्शन मॅन्युअलची म्हणजेच जनुकांची, आरएनएच्या लिपीत कॉपी करून घेतली जाते. ती कॉपी निरोप्या आरएनएच्या रूपात न्युक्लियसच्या बाहेर पडते. बाहेर पेशीद्रवात रायबोसोम नावाची यंत्रणा असते. तिथे त्या कॉपीवरून प्रथिनं बनतात. हा कारखाना अव्याहत चालतो. हे आपण गेल्या लेखात पाहिलं.


साऱ्या जीवसृष्टीचा डोलारा उभारताना दगड-विटा-सिमेंट-चुना म्हणून ही प्रथिनंच वापरलेली असतात. इतकंच नव्हे तर या जीवनाच्या इमारतीतली रोजची सगळी कामं करणारे मजूर-कारागीर-मुकादम हेदेखील प्रथिनंच असतात. सारी सजीवसृष्टी या प्रथिनांचीच बनलेली असते आणि प्रथिनांच्या कामानंच ती सुरळीत चालत राहते. तुम्ही-आम्ही, आपण सारे डीएनएच्या या आरएनए-कॉप्यांबरहुकूमच बनून तयार होतो. आपले दैनंदिन व्यवहारही अशा बनलेल्या प्रथिनांद्वारेच चालतात.

या पेशींच्या कारखान्याची नुसती तोंडओळख झाल्याबरोबर मानवाच्या अभियांत्रिकी बुध्दीनं त्यातल्या खिळ्या-मोळ्यांसाठी, म्हणजेच प्रथिनांमधल्या एकेका नत्राम्लासाठी वापरले जाणारे जनुक-शब्द, समजून घेतले (उदा. phenylalanine साठी UUU) आणि तसे खिळे प्रयोगशाळेत बनवून पाहिले. तेवढं जमलं आणि शास्त्रज्ञांनी पेशींच्या कारखान्यात मोड-तोड-जोड सुरू केली. काही बदल करण्याच्या उद्दिष्टानं कुठल्याही पेशीच्या जनुककोशात केलेला हस्तक्षेप, तिथल्या जनुकांमध्ये केलेली तोडणी-

जुळणी, बेरीज-वजाबाकी  म्हणजेच जेनेटिक इंजिनीयरिंग.

अशी अभियांत्रिकी कारागिरी करण्यापूर्वी शास्त्रज्ञांना पेशीकेंद्राचं आवरण (nuclear membrane) रसायनांनी भेदून, गाभ्यात जपलेल्या जनुकग्रंथाची लांबलचक सुरळी उलगडून त्यातल्या सार्थ वाक्यांचा म्हणजेच जनुकांचा अभ्यास करावा लागला (Human Genome Project). तो करताकरता, ज्या ज्या चुका समजल्या त्या दुरुस्त करायचा विचारही त्यांनी केला.

या इन्स्ट्रक्शन्समध्ये जेव्हा काही चुका राहिलेल्या असतात तेव्हा त्यांच्यावरून बनवलेली प्रथिनं बिनसतात किंवा अपुरी पडतात. त्यांची कामं नीट होत नाहीत. दैनंदिन व्यवहारात गोंधळ उडतो. हा गोंधळ म्हणजेच जानुकीय आजार.





आकृती १. जनुकांची तोड-जोड

मधुमेह झालेल्या माणसांच्या शरीरात इन्शुलिन हे प्रथिन कमी पडत असतं. ते बाहेरून, म्हणजे गाय किंवा डुक्कर या प्राण्यांकडून मिळवलं आणि मानवी शरीरात सोडलं तर मानवी शरीराच्या संरक्षक पांढऱ्या रक्तपेशींना ते परकं असल्याचं कळतं. त्या त्याच्यावर हल्ला चढवतात. त्यामुळे ॲलर्जीसारखे त्रास होतात. म्हणून शास्त्रज्ञांनी इन्शुलिनचं मानवी जनुक जीवाणूंच्या पेशीकेंद्रात घालून जीवाणूंकडून मानवी इन्शुलिन तयार करून घेतलं.

यासाठी जीवशास्त्रातल्या काही शोधांचा उपयोग झाला. जीवशास्त्रज्ञांनी जनुकवाक्यं नेमकी हवी तिथे कापू शकणाऱ्या restriction endonucleases या रामबाण कातऱ्या आधीच शोधून काढल्या होत्या. तशी कातरी वापरून हवं असलेलं नेमकं जनुकवाक्य सुटं करता आलं. ते नुसतं सुटं करून शास्त्रज्ञ थांबले नाहीत. जोडा, तोडा, अशा सूचना देणारे शब्दही त्याच्या आगेमागे लावले. तो तुकडा जीवाणूमध्ये स्थानापन्न झाला की नाही हे कळण्यासाठी एक टेहळ्या जीनही त्याच्याबरोबर जोडला. (साधारणपणे या टेहळ्यामुळे प्रतिजैविकांना(antibiotics) न जुमानण्याची शक्ती जीवाणूंना मिळते.)

मग  PCR पध्दतीने DNA polymerase नावाची प्रथिन-कळ वापरून त्या संपूर्ण वाक्याच्या लाखो प्रती करून घेतल्या. असे बेतून घेतलेले तुकडे जीवाणूंच्या (bacterium) जनुकांमध्ये कलम करून जोडले. ते कापलेले तुकडे हवे तिथे चिकटवण्यासाठी जीवशास्त्रज्ञांनीच शोधलेला ligasesचा गोंद वापरता आला. जीवाणूच्या डीएनएमध्ये मानवी जनुकतुकडा चिकटवून किंवा रोपण करून जो नवं संकरित डीएनए मिळाला तोच recombinant DNA.




आकृती २. प्लाझ्मिड्स्

Agrobacter tumefaciensसारख्या काही जीवाणूंमधली काही जनुकं मुख्य जनुककोशापासून वेगळी, सुटी, भटकी  असतात. ती कधी एका जीवाणूत तर कधी दुसऱ्या, अशी मुक्तसंचार करत असतात. त्यांना प्लाझ्मिड (plasmid) म्हणतात. ही गोल कड्यांच्या आकाराची असतात. ती सहजपणे जीवाणूंच्या केंद्रातही घुसतात (agrolistics) आणि आपल्या डीएनएचं काम त्या जीवाणूच्या पेशीच्या कारखान्याकडून करून घेतात. अशा प्लाझ्मिडचं कडं कापून त्यात बेतून कापलेलं, हवं ते, मानवी जनुक चपखल चिकटवलं की ते हव्या त्या जीवाणू-केंद्रात अलगद पोचवता येतं. मग त्या जीवाणू-पेशीचा कारखाना आयता वापरून त्या मानवी जनुक-वाक्याचं प्रथिन (उदा. इन्शुलिन) प्रयोगशाळेत बनू शकतं.

जेव्हा जनुकासाठी हमाल म्हणून प्लाझ्मिड हजर नसेल तेव्हा विषाणूंना (bacteriophage) वेठीला धरलं जातं. या विषाणूंची जनुकं कापून त्यात हवं ते मानवी जनुक चिकटवून कलम करायचं आणि मग या कलमी विषाणूची जीवाणूला लागण करायची (infection). मग 'असुनि खास मालक घरचा' बापडा जीवाणू आपल्याच कारखान्यात त्या विषाणूचा आणि त्या कलमी जनुकाचा गुलाम बनतो आणि त्यांच्या हुकुमाप्रमाणे प्रथिनांच्या कॉप्या काढत बसतो.


गहू, तांदूळ यांसारख्या एकदल धान्यांच्या पेशीकेंद्रात नवं जनुक घालायला एक वेगळी पध्दत वापरावी लागते. जे जनुक घालायचं असतं ते सोन्याच्या अतिसूक्ष्म (nano) कणांवर चिकटवून मग खास बंदुकीतून (biolistics) ती सोन्याची गोळी पेशीच्या हृदयात झाडावी लागते. विजेच्या किंवा उच्च तापमानाच्या आकस्मिक धक्क्यानेही नवा डीएनए केंद्रात ढकलता येतो.

इन्सुलिनचं मानवी जनुक जीवाणूंच्या पेशीकेंद्रात पोचवायचं काम शास्त्रज्ञांनी प्लाझ्मिडमार्फत करून घेतलं आणि मग त्यांना जीवाणूंकडून हवं तेवढं मानवी इन्शुलिन (Humulin) तयार करून घेता आलं. आता बऱ्याच आंतरराष्ट्रीय कंपन्या अशा recombinant औषधांचं मोठ्या प्रमाणावर उत्पादन करतात ("pharming!"). त्यांत रक्तस्राव थांबवणारी प्रथिनं उदाहरणार्थ, Factor VIII, hepatitis B या काविळीची लस वगैरे महत्वाच्या औषधांचा समावेश आहे. अशा कॉप्या काढणं म्हणजेच क्लोनिंग. या प्रकारच्या क्लोनिंगला recombinant DNA cloning म्हणतात.

रेबीज हा विषाणूजन्य रोग पिसाळलेला कुत्रा चावल्यानं होतो. तो शंभर टक्के प्राणघातक असतो आणि एकदा झाला की त्यावर उपाय नाही. पाळीव कुत्र्यांना याची लस टोचली जाते. पण रानटी कुत्रे, लांडगे, कोल्हे, वटवाघळं वगैरे प्राण्यांत या विषाणूंचं कायम वास्तव्य असतं. तिथून पाळीव प्राण्यांना या विषाणूंचा नवा पुरवठा सतत होत राहतो. रेबीजची लागण होतच राहते. त्यावर उपाय म्हणून आता रेबीजची recombinant लस काढली आहे. विशेष म्हणजे, ती अन्नातून, तोंडाद्वारे देता येते आणि त्या मार्गानेही उत्तम काम करते. तिची छोटी पाकिटं मासळीच्या तुकड्यांत गुंडाळून जंगलात विखरून टाकतात. ती खाल्ल्यानं वन्य श्वापदांची रेबीजविरुध्द प्रतिकारशक्ती वाढते. युरोप-अमेरिकेत हा प्रयोग केला गेला व त्यावरून वन्य श्वापदांत आणि पर्यायानं पाळीव कुत्र्यांत रेबीज आटोक्यात येण्याची शक्यता दिसून आली.

अशी प्रथिनं तयार करूनच शास्त्रज्ञ थांबले नाहीत. असं जनुकारोपण करून मानवी जनुककोशातले काही नेमके दोष दूर करायचाही प्रयत्न त्यांनी केला. Severe Congenital Immuno Deficiency ऊर्फ SCID या भयानक जन्मजात आजारामुळे तान्ह्या मुलांची रोगप्रतिकारशक्ती जवळजवळ नाहीशी झालेली असते. साधं सर्दी-पडसंही त्यांच्यात जीवघेणं ठरतं. पहिल्या वाढदिवसापर्यंतही ती जगू शकत नाहीत.

अशा मुलांच्या जनुककोशातलं विकृत जनुक शास्त्रज्ञांनी हेरलं. एड्स्‌सारखे उलट्या चालीचे विषाणू (Retroviruses) वापरून प्रतिकाराचं निरोगी जनुक या मुलांच्या मूळ रक्तपेशींच्या (stem cells) केंद्रांत पोचवायचं




**आकृती ३. वाहक विषाणू वापरून जंतूंकडून प्रथिन बनवून घेणं**




*With Best Compliments From*

# VASUNDHARA

**CHEM PLAST INDUSTRIES**

## RAVI GUPTA

**MOBILE : 9324233431**


**Admin. Off.:** 7, 2nd Floor, New Metalage Indl. Premises, Subhash Road,
Jogeshwari (E), Mumbai - 400060. Tel.: 32958382/28223706/28240277 I Fax : 28230448

**Factory :** Survey No. 205/10(7), Hingraj Indl. Estate, Dabhel, Daman - 396210 (U.T.)
Tel.: (0260) 2244245 / 3253290 I E-mail : mppvcpssi@yahoo.com

काम त्यांनी केलं. त्या मुलांची प्रतिकारशक्ती परत आली. हा उपचार जपान-युरोप-अमेरिकेत गेली दहा वर्षं चालू आहे.

अशी जनुकं पेशीकेंद्रांत घुसवायला जसे उफर्टि विषाणू (retroviruses) वापरता येतात तसेच सर्दी-पडशाचे विषाणू (adenoviruses) किंवा सर्दीबरोबरच्या पुरळाचे विषाणू (Herpes simplex) हेही चालतात.

लंडनमध्ये असे विषाणू वापरून एक प्रकारच्या जन्मजात आंधळेपणावर इलाज केले गेले. दुसऱ्या एका प्रयोगात काही विवक्षित चिमुकले, लुडबुडे आरएनए (siRNA) पेशींमध्ये असेच पाठवले. त्यांनी एका दुष्ट जनुकाचं काम अडवलं. त्यायोगे मज्जासंस्थेचा एक गंभीर आजार (Huntington's Disease) आटोक्यात आणण्यात यश मिळालं. इतकंच कशाला, एड्सच्या हल्ल्याने निकामी न होणाऱ्या संरक्षक पेशी (CD4) तयार करून त्या विषाणूला रोखायचे प्रयत्नही सध्या चालू आहेत.




आकृती ४. क्लोनिंगने डॉली केली

मग एका वेगळ्या प्रकारचं क्लोनिंग केलं गेलं. ते म्हणजे therapeutic organ cloning.

पाच दिवस प्रयोगशाळेत उबवलेल्या फलित बीजांडाच्या पेशी या मानवी मूळपेशी (stem cells) असतात. त्यांच्या जनुककोशात बदल करून यकृत, मूत्रपिंड असे मानवी अवयव करून घेता येतील. पण तिथे काही नैतिक मुद्दे आड येतात.

दुसरी पद्धत म्हणजे मानवी बीजांडाचं पेशीकेंद्र काढून टाकून तिथं हृदयाच्या पेशीचं केंद्र चपखल बसवलं आणि विजेच्या छोट्याशा धक्क्यानं त्याचं विभाजन सुरू करून दिलं की ती पेशी मानवी हृदयाच्या स्नायूपेशीच्या कॉप्या काढत जाते आणि हृदयाचे स्नायू बनवते. याच पध्दतीनं मूत्रपिंड, यकृत असे अवयवही तयार करता येतील. मग अवयवारोपणासाठी अवयव-दाता शोधायला नको की तो अवयव स्वीकारला न जाण्याचीही भीती नको. हेच तत्व वापरून डुकरांच्या बीजांडाकडूनही मानवी अवयव बनवून घेता येण्याची शक्यता आहे.

(अ) मेंढीच्या स्तन-पेशीचं केंद्र आणि (ब) मेंढीचं बीजांड वापरून बनलेली जगप्रसिध्द डॉली तिसऱ्याच, (क) मेंढीच्या गर्भाशयात वाढली, जन्मली आणि तब्बल सहा वर्षं जगली. तिला मेंढरंही झाली! ही डॉली त्या (अ) मेंढीची हुबेहूब प्रतिकृती होती. म्हणून या प्रयोगाला animal cloning असं म्हणतात.


याच भरात गर्भ, बीजांड, शुक्रजंतू यांच्या जनुकांमध्ये फेरफार करून मनपसंत अपत्यनिर्मिती करायचेही प्रयत्न झाले.

पण तत्पूर्वी चिलटांवर, उंदरांवर केलेल्या प्रयोगांतून त्या महत्त्वाकांक्षेचे मातीचे पाय दिसून आले. मानवी-जानुकीय अभियांत्रिकीला असलेल्या मर्यादा ध्यानात आल्या.

जनुकशास्त्रीय संशोधन भरपूर वेळ आणि पैसा खातं. त्यातून निष्पन्न होणारे उपचार फार महागडे आहेत. रोगांवर उपचार करण्यासाठी केलेल्या जनुक-कलमांचे इष्ट परिणाम आईपेशींकडून कन्यापेशींमध्ये उतरत नाहीत. त्यामुळे हे महाग इलाज पुन्हा पुन्हा करावे लागतात.

रुग्णांच्या शरीरातल्या संरक्षक रक्तपेशी या परक्या जनुक-तुकड्याविरुद्ध लढायला उठतात.

हमाल म्हणून वापरलेले निरुपद्रवी विषाणू मानवी शरीरात शिरकाव मिळाल्यावर अस्तनीतल्या सापासारखे फणा काढू शकतात; दाह, ॲलर्जी, नव्या रोगाची लागण, अशा




आकृती ५. ॲग्रोलिस्टिक्सचा वापर

नव्याच बाधा होऊ शकतात.

अशी जनुकं विषाणूंबरोबर पेशीकेंद्रात पाठवली की ती मानवी जनुककोशात नेमकी कुठे जाऊन चिकटतील यावर शास्त्रज्ञांचं अद्याप पूर्ण नियंत्रण नाही. जनुककोशातली काही जनुकं कर्करोग निर्माण करू शकतात. ती एरवी सुप्तावस्थेत असतात. बाहेरून धाडलेलं नवं जनुक-ठिगळ जर चुकून अशा झोपलेल्या दुष्ट जनुकाला भिडलं तर ते खल-जनुक खडबडून जागं होतं आणि कर्करोग उद्भवतो. SCIDसाठी जानुकीय उपचार केलेल्या मुलांपैकी चार जणांना असा रक्ताचा कॅन्सर झाला. तेव्हापासून मानवी पेशींवरच्या प्रयोगांत अत्यंत सावधगिरी बाळगणं अत्यावश्यक झालं.

शिवाय, सध्याच्या प्रयोगांत वेळेला जेमतेम एखादंच जनुक कलम करता येतं. पण रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार, बुध्दिभ्रंश (Alzeimer's), यांसारख्या नेहमीच्या आजारांत एकाच व्यक्तीच्या अनेक जनुकांमध्ये दोष असतो. तिथे या उपचारपध्दतीचा काहीच फायदा होत नाही.

मग शास्त्रज्ञांनी मार्ग बदलला. केंद्रातून जनुकाचा संदेश घेऊन येणाऱ्या निरोप्या आरएनएची प्रतिबिंब-रूपं असलेल्या न्यूक्लेइक ॲसिड्स्च्या साखळ्या (oligo-nucleotides) त्यांनी बनवल्या. या साखळ्या पेशीकेंद्रात घुसत नाहीत. मगरमिठी घालून त्या आरएनएला निकामी करतात. त्यामुळे त्या आरएनएशी निगडित असलेल्या खल-जनुकाचं काम अप्रत्यक्षपणे बंद पडतं. एड्स्, कॅन्सर, कोलेस्टेरॉलचा अतिरेक, वगैरे रोगांवर अशा प्रकारे इलाज होऊ शकतो.

मानवी जनुककोशात ढवळाढवळ करणं शास्त्रज्ञांनी कमी केलं तरी त्यांना वनस्पतींचे, प्राण्यांचे जनुककोश आव्हान देतच होते.

ॲग्रोबॅक्टरची प्लाझ्मिड्स् वापरून वनस्पतींच्या पेशींतही नवी जनुकं घालता येतात. माणसाच्या एका पेशीपासून अख्खा माणूस बनवता येत नाही. पण वनस्पतीच्या एका संकरित पेशीपासून संपूर्ण नवं, कलमी झाड जोपासता येतं.

अशाच प्रकारचे फेरफार करून टिकाऊ टोमॅटो, सोनेरी तांदूळ, भरदार मका अशी जोमदार पैदास निर्माण झाली. कीड न लागणारी, तणनाशकं मारल्यावरही तगून राहणारी पिकं तयार झाली. सूक्ष्म जनुक-चिंधीनं भुकेलेल्या जगाला द्रौपदीची थाळीच मिळाली. अशा संकरित घासातून तोंडी घेतल्यानं काम करणाऱ्या स्वस्त लशी बनवायचा प्रयत्नही झाला. आपल्या भाभा अणुकेंद्रातल्या शास्त्रज्ञांनी Hepatitis B या काविळीची लस केळ्यात तयार केली. हे रुचकर रक्षणकर्ते बाजारात यायला अजून थोडा अवकाश आहे.

प्राण्यांवरचे प्रयोगही चालू राहिले. एखादंच जनुक निकामी केलेले (knockout mice), एखादं नवंच जनुक घातलेले किंवा एखाद्या जनुक-वाक्यातला एखादाच शब्द बदलून (point mutation) तयार केलेले, अशा वैविध्यपूर्ण उंदरांचा प्रयोगशाळांत सुळसुळाट झाला.

शास्त्रज्ञांनी बकऱ्यांच्या पेशीकेंद्रामध्ये मानवी जनुकं घातली. त्यामुळे त्या बकऱ्यांच्या पान्ह्यात रक्तस्राव थांबवणारं

जेनेटिक इंजिनीयरिंगने पौष्टिक, भरपूर खाऊ तयार होईल. त्याचा घास भुकेल्या जगाच्या तोंडी भरवण्यापूर्वी शास्त्रज्ञ तो निगुतीने न्याहळून, चाचपून, चाखून बघतील ना? त्याबद्दल बरेच वाद-प्रवाद आहेत. त्या GM अन्नाची माहिती पुढच्या अंकात पाहू.

मानवी प्रथिन (antithrombin III) झरायला लागलं, औषध म्हणून मान्यताही पावलं.

कोळ्याच्या जाळ्याचा धागा रेशमाहून लवचिक, हलका असतो आणि तरीही त्याची ताण पेलायची ताकद पोलादाहून अधिक असते. त्या धाग्याचं प्रथिन बनवणारी कोळ्याची जनुकं शास्त्रज्ञांनी काही शेळ्यांना बहाल केली. अशा तयार झालेल्या 'Spidergoats' ना त्या जाळ्याच्या मौल्यवान प्रथिनाचा पान्हा फुटला. हा हलका, टणक धागा विमानांत, शर्यतीच्या गाड्यांत फारच उपयोगाचा आहे. शिवाय, डोळ्यांच्या शस्त्रक्रियेत वापरले जाणारे टाके, पोलिसांचे, सैनिकांचे बुलेट-प्रूफ कपडे यांसाठीही त्याला मागणी आहे.

वृध्दिपोषक (growth hormone) वाढवून किंवा कमी करून मासळीचा आकार चौपट वाढवता आला. सहज उघडता येणारी, मोठ्ठाली आणि रुचकर कालवं तयार झाली.

जीवाणूंचा जनुकपालट तर कायदेशीररीत्या चाललाच होता. तिथेही नव्या क्लृप्त्या वापरल्या गेल्या. समुद्रात सांडलेल्या खनिज इंधनतेलानं तिथल्या जीवसृष्टीत हाहाकार माजतो. हे तेल चाटून-पुसून खाणारे, समुद्र साफ करून देणारे जंतू जनुकीय बदलांनी तयार केले गेले.

खनिज तेलाच्या, ऊर्जेच्या दुष्काळाची टांगती तलवार उभ्या जगावर लटकत असताना जनुकशास्त्राच्या करामतीनं जंतूंकरवी वनस्पतींच्या चिपाडांतून प्रोपेनयुक्त इंधन बनवून घेता येईल अशीही शक्यता वाटते आहे. सध्या तसे प्रयोग चालू आहेत.

जानुकीय प्रयोगांत नेहमी हमालीच करणारे विषाणूसुध्दा या चौफेर जानुकीय हल्ल्यातून सुटले नाहीत. सजीव-निर्जीवसृष्टीच्या सीमारेषेवरच्या या विमुक्त भटक्यांचं जनुक-परिवर्तन करून शास्त्रज्ञांनी त्यांना सोनं पांघरायच्या मोहात पाडलं. जानुकीय फेरफारांमुळे त्यांच्या बाह्य आवरणात एका खास नव्या प्रथिनांचा समावेश झाला. हे प्रथिन भोवतालच्या द्रावणातले कोबाल्टचे आणि सोन्याचे अतिसूक्ष्म कण जमा करतं. पॉलिमरच्या किंवा सिलिकॉनच्या टिकलीवर असे विषाणू पसरले की ते आणि त्यांची अशी धातूंनी भरलेली आवरणं यांचे व्यवस्थित थर त्या टिकलीवर रचले जातात. असे सुवर्णाच्छादित विषाणू म्हणजे सोन्याच्या अतिसूक्ष्म वाहिन्याच. हे सोन्याचे पिंजरे किंवा थडगी ऊर्फ नॅनोवाहिन्या वापरून बनवलेली बॅटरी अधिक टिकाऊ असते, अधिक चांगलं काम करते.

क्रेग व्हेन्टर या शास्त्रज्ञानं तर एका विषाणूचा संपूर्ण जनुककोश प्रयोगशाळेत तयार केला; तो एका जीवाणूच्या पेशीकेंद्रात पोचवला. तिथं त्या जीवाणूनं त्याला योग्य ती घोंगडी पांघरली आणि अख्खा विषाणू साकारला. तिथून पुढे तो त्याच्या जातीच्या इतर विषाणूंसारखाच वागला. आता हा ओळखीचा, निरुपद्रवी विषाणू होता म्हणून ठीक. पण असल्या प्रयोगांत घूणाक्षरन्यायानं कदाचित एखादा महासंहारक विषाणूही साकारू शकतो! त्यासाठी डोळ्यात तेल घालून अहोरात्र सजग आणि सज्ज राहायला हवं.

त्याहून पुढची पायरी म्हणून कुणी जीवाणूसारखा एखादा सजीवच प्रयोगशाळेत निर्माण करू पाहील! शिवाय, सगळे नियम धाब्यावर बसवून चिनी शास्त्रज्ञ मानवी बुध्दिमत्तेची जनुकं शोधताहेतच. ती वाढवण्याचेही प्रयत्न होतील!

मात्र, मिळालेल्या ज्ञानाचा वापर करून पंचतंत्रातल्या पढतमूर्खांसारखा वाघ जिवंत केला तर अनर्थ होईल. ब्रह्मदेवाची नक्कल करायला धजण्यापूर्वी त्या धाडसाचे दूरगामी परिणाम जाणले पाहिजेत. त्यांची नैतिक जबाबदारी समजून घेतली पाहिजे आणि ती पेलण्याचं सामर्थ्य अंगी बाणवलं पाहिजे. तेवढा सारासार विचार सतत झाला तरच या प्रतिसृष्टीच्या पाऊलवाटेनं नरकाऐवजी नंदनवन गाठता येईल.

**डॉ. उज्ज्वला दळवी**
ujjwalahd9@gmail.com

**ग्रंथालीचे नुकतेच प्रसिद्ध झालेले पुस्तक**




**वसुमती धुरू** लिखित

# माझ्या मनाचा मुरांबा

(आंबटगोड आठवणी)

**हे लेखन म्हणजे ब्याऐंशी वर्षांच्या दीर्घ जीवनातील आठवणींचा आंबटगोड मुरांबा आहे. डाएटिशियन म्हणून काम करताना आणि एक गृहिणी व रसिक म्हणून अनुभवलेले जीवनातील प्रसंग इथे रसाळ शैलीत उतरले आहेत. हे सलग आत्मचरित्र नाही, हा आहे आठवणींचा गोफ, वाचकाला सोबत नेणारा...**

**मूल्य २७५ रु. सवलतीत १६० रु.**

---

**बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या शिकागो अधिवेशनाला हार्दिक शुभेच्छा!**



# नरेंद्रभाई हिरालाल त्रिवेदी

बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन, शिकागो

## मराठी अभ्यासकेंद्र

# एक आवाहन

◆ *दीपक पवार*

दोन वर्षांपूर्वी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या फिलाडेल्फिया येथे झालेल्या अधिवेशनाच्या निमित्ताने 'रुची'च्याच अंकात मी एक लेख लिहिला होता. मराठी भाषा, समाज आणि संस्कृतीपुढील प्रश्न मांडणे आणि अनिवासी मराठीजनांना मराठी अभ्यास केंद्राने सुरू केलेल्या चळवळीत सहभागी करून घेणे हा त्या लेखामागचा उद्देश होता. महाजालावरून (इंटरनेट) हा लेख अनेकांपर्यंत पोहोचला. अनेकांनी तो इतरांना फॉरवर्ड केला. तो आवडल्याची ई-मेल्स मला मिळाली. पण गेल्या दोन वर्षात त्यातून मराठी अभ्यास केंद्राच्या कामाबद्दल बृहन्महाराष्ट्र मंडळाचे पदाधिकारी, सभासद यांच्यात फार उत्सुकता निर्माण झालेली आहे असे दिसले नाही. त्यामुळे यातून कार्यकर्ते निर्माण होण्याचा प्रश्न तर दूरच राहिला, त्यामुळे अशा प्रकारचे लेख लिहून मिळणारा बौध्दिक आनंद महत्त्वाचा मानायचा की लोक वाचून सर्व विसरून जातात, यातून येणाऱ्या वैफल्यासाठी मानसिक तयारी ठेवायची या अडचणीत मी सापडलो आहे. चळवळीच्या कार्यकर्त्याला निराश होणे परवडत नाही आणि सार्वजनिक कामे ही सहनशीलतेची कसोटी पाहणारी असतात या विचाराने लेखाच्या भवितव्याबद्दलचे माझे नैराश्य कमी झाले आहे. नेहमीच्या उत्सवी स्वरूपापासून दूर जाऊन मराठीसाठी मर्यादित का होईना काही काम करण्याची इच्छा बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनातील प्रतिनिधींना झाली तर या लेखाचा काही एक उपयोग झाला आहे असे मला वाटेल.

महाराष्ट्र राज्याचे सुवर्णमहोत्सवी वर्ष नुकतेच संपले. गेले वर्षभर शासनाला आणि राजकीय पक्षांना पत्रे लिहिताना आम्ही त्यांना यंदाचे वर्ष हे राज्याचे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे अशी सतत आठवण करून द्यायचो. प्रसारमाध्यमांतही त्याचा सातत्याने उल्लेख झाल्यामुळे असंवेदनशील आणि उदासीन राजकीय वर्ग, मुजोर नोकरशाही आणि आत्ममग्न अभिजन वर्ग यांना आपल्या नाकर्तेपणाची थोडीफार लाज वाटली असण्याची शक्यता आहे. त्या रेट्यामुळे मराठी अभ्यास केंद्राला शासनाकडून मराठी भाषा विभागाची स्थापना करून घेता आली. मात्र आमचा हा आनंद फार काळ टिकू शकला नाही. सरकारच्या मराठी भाषा विभागाचे प्रधान सचिव आणि भाषा सल्लागार समितीचे अध्यक्ष यांच्यातल्या सुंदोपसुंदीमुळे गेल्या दीड वर्षात हा विभाग मरणासन्न अवस्थेत जाऊन पोहोचला आहे. कधी नव्हे ते शासनाने मराठीसाठी लोकलज्जेस्तव का होईना काहीतरी करायचे ठरवले होते. त्याचेही परिश्रमपूर्वक वाटोळे करण्यात आले आहे. गेल्या दीड वर्षात मराठी भाषा विभाग कसा असावा याचा प्रस्ताव मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांपासून ते मराठीचा झेंडा मिरवणाऱ्या पक्षांच्या प्रमुखांपर्यंत सर्वांना आम्ही देऊन आलो. हा प्रस्ताव दखलपात्र नाही असे एक ओळीचे पत्रदेखील यांच्यापैकी कुणाला पाठवावेसे वाटले नाही. हा त्यांच्या मराठीप्रेमाचा पुरेसा बोलका पुरावा आहे.

राज्याच्या मुख्यमंत्र्यांना हा प्रस्ताव समजून घ्यायला वेळ मिळत नाही, उपमुख्यमंत्र्यांना हा विभाग आपल्या पक्षाकडे नाही असे प्रगल्भ(!) उत्तर द्यावेसे वाटते. मराठीवादी पक्षांना एक तर यातले कळत नाही किंवा ते टायमिंगच्या शोधात आहेत. अशा परिस्थितीत मराठी अभ्यास केंद्रासारखी एक

# ‘द ऑडियो बुक’

नमस्कार, हल्ली सगळे म्हणतात वाचायला वेळ नाही, वाचायला जमत नाही. मग ऐकायला काय हरकत आहे...

‘द ऑडियो बुक’ या नावाने साहित्याची नवी ओळख करण्याचे शिवधनुष्य पेलायचे जेव्हा ठरले तेव्हाच हे साहित्य एक दर्जा कायम राखेल असेच निवडायचे हे तर निश्चितच होते. साहित्यातले विविधरंग एकाच चित्रात भरताना संकल्पनाकार समीर लिमये यांनी प्रत्येक रंगाचे वैशिष्ट्य उठून येईल हे पाहिले. लाल, हिरवा, निळा हे रंग ज्याप्रमाणे वैविध्यपूर्ण वैशिष्ट्ये देतात तसेच साहित्याचे आहे. सावरकरांवरील वीरश्रीयुक्त श्री. सच्चिदानंद शेवडे यांचे भाष्य निवडताना नवीन पिढीला सावरकरांचे असामान्य धैर्य, ओज हे माहीत असणे आवश्यक आहे ह्या विचारानेच निवडले आहे. ‘तुमची गोष्ट’ ह्या निमित्ताने श्री. रत्नाकर मतकरी आमच्या परिवारात सामील झाले. श्री. समीर लिमये हे नाटककार त्यांची लिटमस ही एकांकिका घेऊन आलेत... प्रेमाचा वेगळाच रंग त्यांनी ह्या अनेक बक्षीसपात्र एकांकिकेतून दाखवला आहे... ‘अंतू बर्वा’बद्दल आम्ही काय बोलणार? पुलंच्या लेखणीने अजरामर झालेली ही व्यक्तीरेखा श्री. अरुण नलावडे यांनी अगदी मनापासून खुलवली.

आता शेवटची पाचवी श्रुतिकथा म्हणजे श्री. अच्युत गोडबोले यांच्या किमयागार पुस्तकातली ‘समुद्र’... समुद्र हे एक विचित्रच रसायन आहे... जेवढी वर विशालता तेवढीच अथांग खोली... मानवाच्या अथक प्रयत्नांना न जुमानता अजूनही गूढ, अतर्क्य, अपरिचितच आहे. समुद्र... धीरगंभीर समुद्र... त्याच्या अंतरंगात काय साठवून आहे हे ऐकतानाही थक्क व्हायला होतं. श्री. शरद पोंक्षे यांच्या धीरगंभीर आवाजात ही श्रवणीय श्रुतिकथा अजूनच गूढ छटा देते...

अशा ह्या ‘पाच श्रृतिकथां’चा सागर तुमच्यासाठी घेऊन येण्याचा हा छोटासा प्रयत्न... नक्की कळवा. आमचा प्रयत्न कसा वाटला... सूचनाही द्या... नवीन काय ऐकायला आवडेल तेही कळवा...

धन्यवाद.

**डॉ. अस्मिता निमकर / धनश्री नानिवडेकर**

ई–मेल : theaudiobook@gmail.com मोबाईल : ९८२१८११९५७ / ४७

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या शिकागो अधिवेशनाला हार्दिक शुभेच्छा!



# अजयभाई

## वापी

छोटी चळवळ या सार्वत्रिक अनास्थेला तोंड द्यायला पुरेशी पडेल अशा गैरसमजात मी नाही. राज्यातले बहुतांश नेते बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनांमध्ये येऊन उसनवारी केलेल्या कविता म्हणून मराठी भाषा आणि संस्कृतीचे गोडवे गातात. बृहन्महाराष्ट्रातला सुजाण वर्ग त्यांची सरबराई करण्यातच धन्यता मानणार आहे की त्यांना जाब विचारणार आहे हा खरा प्रश्न आहे.

लोकभाषा, व्यवहारभाषा आणि ज्ञानभाषा म्हणून मराठीचा झालेला पराभव जोवर आपल्या जिव्हारी लागत नाही तोवर यातून नवी भाषिक चळवळ उभी राहणार नाही. या चळवळीला आम्ही मराठीकारण म्हणजे मराठी भाषा, समाज आणि संस्कृतीचे अर्थकारण आणि राजकारण असे नाव दिले आहे. संयुक्त महाराष्ट्राचा लढा हा महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी होता. मात्र खरे मराठी राज्य उभे करण्याची आपली जबाबदारी आपण विसरून गेलो आहोत. या जबाबदाऱ्यांचे भान येणार नसले तर बृहन्महाराष्ट्राच्या कुठल्याही अधिवेशनांना उत्सवाचे स्वरुप आल्याशिवाय राहणार नाही. तसे व्हायला नको असेल तर महाराष्ट्र आणि बृहन्महाराष्ट्रातील मराठी माणसांना नव्या उमेदीने व नव्या वैचारिक भूमिकेला धरून मराठीच्या समकालीन व भविष्यकालीन प्रश्नांचा वेध घेणारी, खऱ्या अर्थाने बहुजनसमाजाचा वेध घेणारी चळवळ उभी करावी लागेल. त्यासाठी प्रस्थापित राजकीय चौकटी मोडून टाकाव्या लागतील. तसे केले तरच मराठी भाषा, समाज आणि संस्कृतीपुढील प्रश्नांची तड लावणे शक्य होणार आहे. महाराष्ट्रात या दृष्टीने काम करणारे लोक आहेत. बृहन्महाराष्ट्रातील मराठी समाज या समकालीन आंदोलनांशी जोडून घेणार की भूतकाळातील विशुध्द वाङ्मयीन आठवणींमध्येच रमून राहणार आहे हा निर्णय त्यांनी घ्यायचा आहे. त्यांनी काम करण्याचा निर्णय घेतला तर मराठी अभ्यास केंद्राची त्यांना सतत साथ मिळेल अशी खात्री देतो. दुर्दैवाने त्याने तटस्थ राहण्याचे ठरवले तर पश्चात्ताप करण्यासाठीसुध्दा आपल्याकडे फारसा वेळ नाही हा कळकळीचा इशाराही या निमित्ताने द्यावासा वाटतो.

**प्रा. दीपक पवार**
अध्यक्ष
मराठी अभ्यास केंद्र

**अभ्यास केंद्राचे प्रमुख पदाधिकारी**

अध्यक्ष प्रा. दीपक पवार ९८२०४ ३७६६५
deepak@marathivikas.org
उपाध्यक्ष डॉ. प्रकाश परब ९८९२८ १६२४०
prakash@marathivikas.org
कार्यवाह तुषार पवार ९८२०२ ९५७८५
tushar@marathivikas.org
कोषाध्यक्ष प्रा. वीणा सानेकर ९८१९३ ५८४५६
veena@marathivikas.org

**मराठी अभ्यास केंद्राचे कृतिगट**

१. मराठी माहितीकोष

मराठी भाषा व संस्कृती यांच्या संवर्धनासाठी कार्यरत असलेल्या व कार्य करू इच्छिणाऱ्या व्यक्ती, संस्था तसेच उपलब्ध साधनसामग्री यांची माहिती, आकडेवारी यांचे एकत्रीकरण करणे.

गटप्रमुख – राखी शेळके – ९६६४८९११३७
rakhee@marathivikas.org

२. मराठी संशोधन प्रकल्प

मराठी भाषा विषयक प्रश्नांसंबधी संशोधन, सर्वेक्षण प्रकल्प स्वतंत्रपणे व सहकार्याने राबविणे. ह्या संशोधनाचा मराठीच्या विकासासाठी उपयोग करून घेणे.

गटप्रमुख – आरती पवार – ९६१९९९८४७६
aarti@marathivikas.org

३. मराठी विद्याजगत

शालेय व उच्च शिक्षणातील मराठी भाषेचे प्रश्न समजून घेऊन मराठीचा शिक्षणाचे माध्यम म्हणून वापर वाढवण्यासाठी प्रयत्न करणे.

गटप्रमुख – वीणा सानेकर – ९८१९३५८४५६
veena@marathivikas.org

४. मराठी अर्थकारण

रोजगार, व्यवसाय, उद्योगक्षेत्रातील मराठीच्या वापराला चालना देणे. त्यासाठी विविध क्षेत्रांतील व्यक्ती व संस्था यांना एकत्र आणून मराठी दबावगट निर्माण करणे. औद्योगिक, व्यावसायिक अभ्यासक्रम/प्रशिक्षण मराठीतून उपलब्ध करणे.

गटप्रमुख – सागर विद्वांस – ९७६८०२६३०३
sagar@marathivikas.org

५. मराठी संस्था

महाविद्यालये, विद्यापीठांमधील मराठी विभाग/वाङमय मंडळे व इतर भाषा-साहित्य संस्था यांच्यात समन्वय साधून मराठीच्या संवर्धनाचे उपक्रम राबवणे.

गटप्रमुख – गीता मांजरेकर – ९७७३३२५३१५
geeta@marathivikas.org

६. माहितीचा अधिकार

माहितीच्या अधिकाराचा वापर करून राज्यात मराठीच्या वापराची वस्तुस्थिती जाणून घेणे व त्याआधारे शासनावर मराठीच्या वापरासाठी दबाव आणणे.

गटप्रमुख – शरद गोखले – ९८६९४४४७५७
sharad@marathivikas.org

७. संगणकीय मराठी व माहिती तंत्रज्ञान

मराठी भाषेला अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञानाची जोड देणे. महाजालावरील विविध साधनांच्याद्वारे मराठीचा प्रसार करणे. सर्वसामान्य जनतेला संगणकावर मराठीच्या वापराचे प्रशिक्षण देणे.

गटप्रमुख – तुषार पवार – ९८२०२९५७८५
tushar@marathivikas.org

८. न्यायव्यवहाराचे मराठीकरण

विधी व न्यायव्यवहारात मराठीचा पूर्णपणे वापर होण्यासाठी संबंधित सर्व संस्था, शासन यांच्याकडे प्रलंबित प्रश्नांची तड लागावी यासाठी सनदशीर मार्गाने पाठपुरावा करणे.

गटप्रमुख – संतोष आग्रे – ९३२४२७३५०५
santosh@marathivikas.org

**मराठी अभ्यास केंद्राचे कार्य–एक दृष्टिक्षेप**

१. अभ्यास केंद्राच्या प्रयत्नांनी राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात शासनाकडून मराठी भाषा विभागाची निर्मिती.

२. युनिकोड वापरून संगणकावर मराठीतून व्यवहार व्हावा यासाठी महाराष्ट्र शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, मायक्रोसॉफ्ट, सीडॅकसारख्या यंत्रणांशी संपर्क साधून अंमलबजावणीसाठी पाठपुरावा. मराठीसाठी इन्स्क्रिप्टचा कळफलक सर्वमान्य व्हावा, एम.एस.सी.आय.टी. च्या अभ्यासक्रमात युनिकोड आणि मराठीचा अनिवार्यपणे समावेश व्हावा यासाठी महाराष्ट्र ज्ञान महामंडळाकडे पाठपुरावा. युनिकोड-मराठीच्या प्रबोधनासाठी कार्यशाळांचे सातत्याने आयोजन.

३. मराठी शाळांच्या सक्षमीकरणासाठी कृतिआराखडा तयार करून शासनाकडे पाठपुरावा.

४. पदवी आणि पदव्युतर पातळीवरच्या मराठीच्या शिक्षणाचे विस्तारीकरण व्हावे यासाठी महाराष्ट्रातल्या विविध विद्यापीठांकडे प्रस्ताव सादर. काही विद्यापीठांमध्ये अंमलबजावणीला सुरुवात.

५. जिल्हा व तालुका पातळीवरच्या न्यायालयांचे मराठीकरण यशस्वी व्हावे यासाठी संगणकीकरण व इतर आघाड्यांवर पाठपुरावा.

६. घटनेच्या कलम ३४८(२) प्रमाणे मराठी ही मुंबई उच्च न्यायालयाची प्राधिकृत भाषा व्हावी यासाठी शासन व मुंबई उच्च न्यायालयाकडे पत्रव्यवहार.

७. माहितीच्या अधिकाराचा वापर करून केंद्र शासनाची कार्यालये, बँका, मोबाईल कंपन्या व इतर संस्थांमध्ये मराठीच्या वापरासंबंधी पत्रव्यवहार. मिळालेल्या माहितीच्या आधारे संबंधित यंत्रणांना मराठीचा वापर करण्यास भाग पाडणे.

८. विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयांमध्ये मराठी भाषा आणि वाङमय मंडळे अनिवार्य होऊन त्यांना स्थायी निधी उपलब्ध व्हावा यासाठी यशस्वी पाठपुरावा.

९. विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या मराठीकरणासाठी विद्यापीठे व शासनाकडे पाठपुरावा. मुंबई विद्यापीठाच्या बीएमएम (बॅचलर ऑफ मास मीडिया) अभ्यासक्रमाचे मराठीकरण यशस्वी.

महाराष्ट्र शासन



*बाळशास्त्री जांभेकर (१८१२-१८४६)*

## 'दर्पण'कार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतीस विनम्र

# अभिवादन

● **बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर** यांचा जन्म १८१२ मध्ये पोंभुर्ले, (जि.सिंधुदुर्ग) येथे झाला. वडिलांकडे घरीच बालपणी मराठी व संस्कृतचा अभ्यास. १८२५ मध्ये मुंबईत आगमन. एज्युकेशन सोसायटीच्या विद्यालयात पाच वर्षे अध्ययन करून तो मुलगा इतका विद्वान बनला की विशीच्या आत प्राध्यापक म्हणून नियुक्ती होण्याचा मान लाभलेला तो पहिला भारतीय ठरला.

● **महाराष्ट्रातील पहिले समाजसुधारक :** त्यांनी सतीची चाल, बालविवाह, स्त्रीभ्रूण हत्या, मुलींची विक्री व समाजातील अंधश्रद्धा या गोष्टींना विरोध केला. 'बाळशास्त्री जांभेकर हे आमचे आद्य समाजसुधारक होत' असे सर नारायणराव चंदावरकर म्हणत असत.

● **पहिले मराठी वृत्तपत्रकार व संपादक :** त्यांनी 'दर्पण' हे वृत्तपत्र मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांत सुरू केले आणि सर्व विषयांचा संग्रह असलेले 'दिग्दर्शन' हे मासिकही.

● **पहिले बहुभाषिकोविद :** त्यांना मराठी, संस्कृत, बंगाली, गुजराथी, कानडी, तेलुगू, फारशी, फ्रेंच, लॅटिन व ग्रीक या भाषांचे ज्ञान होते. फ्रेंच भाषेतील नैपुण्याबद्दल फ्रान्सच्या बादशहाकडून त्यांचा मानसन्मान झाला होता.

● **पहिले अष्टपैलू पंडित :** त्यांच्यात सखोल पांडित्य आणि अध्यापनपटुत्व यांचा मिलाफ होता. ते गणित व ज्योतिष यांत पारंगत होते. म्हणून कुलाबा वेधशाळेच्या संचालकपदी नियुक्ती. शिवाय त्यांना रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र, पाशवी विद्या, वनस्पतिशास्त्र, न्यायशास्त्र, इतिहास, मानसशास्त्र या विषयांचे उत्तम ज्ञान होते. त्यांचे शिष्य डॉ.दादाभाई नौरोजी म्हणतात, बाळशास्त्री हे अतिशय बुद्धिवान, चतुर, सालस व सुज्ञ गुरू होते. १८३४ मध्ये एल्फिन्स्टन कॉलेजात गणित, वाङ्मय व विज्ञान या विषयांचे पहिले एतद्देशीय लेक्चरर म्हणून नियुक्ती. १८३२ मध्ये शाळा खात्याकडून **'नेटिव्ह सेक्रेटरी'** म्हणून नियुक्ती.

● **महाराष्ट्रातील पहिले इतिहास संशोधक :** प्राचीन लिप्यांचा अभ्यास करून त्यांनी कोकणातील शिलालेख व ताम्रपट यांचे शोधनिबंध लिहिले.

● **लोकशिक्षणाचे आद्य प्रवर्तक :** त्यांनी लोकशिक्षणासाठी नेटिव्ह इम्प्रूव्हमेंट सोसायटी या नावाची संस्था काढली. त्या दृष्टीने सार्वजनिक वाचनालये व ग्रंथालये यांचे महत्त्वही बाळशास्त्री चांगले ओळखून होते. १८४५ मध्ये त्यांनी 'बॉंबे नेटिव्ह जनरल लायब्ररी' या ग्रंथालयाची स्थापना केली. अध्यापक घडवणाऱ्या नॉर्मल स्कूलच्या संचालकपदी नियुक्ती.

● **ज्ञानेश्वरीचे आद्य प्रकाशक :** ज्ञानेश्वरी मुद्रित स्वरूपात त्यांनीच प्रथम वाचकांच्या हाती दिली.

● **त्यांची अनेक विषयांशी संबंध असलेली ग्रंथसंपदा :** बाळव्याकरण, नीतिकथा, सारसंग्रह (यात छंदशास्त्र, नीतिशास्त्र, साहित्यशास्त्र वगैरे विषय), भूगोलविद्या, इंग्लंड देशाची बखर- भाग १ व भाग २, भूगोलशास्त्र, ('गणितशास्त्र' यांत भास्कराचार्यांच्या मतांचा शब्दाविषयी विचार) मरे यांच्या इंग्रजी व्याकरणाचा संक्षेप, शब्दसिद्धी निबंध, हिंदुस्थानचा इतिहास, हिंदुस्थानातील इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास, गणितशास्त्राच्या उपयोगाविषयीचे संवाद, पुनर्विवाह प्रकरण, मानसशक्तीविषयीचे कार्य, शिक्षानीति (कसे शिकावे याबद्दल), शून्य गणित, 'Differential and Integral calculus' या ग्रंथांचे भाषांतर.

● महाराष्ट्रातील हे आद्य समाजसुधारक, वृत्तपत्रकार, निबंधकार, भाषांतरकार, इतिहाससंशोधक, व्याकरणकार, गणितज्ञ, शिक्षणशास्त्रज्ञ व प्रकाशक १७ मे १८४६ रोजी वयाच्या ३४ व्या वर्षी मृत्यू पावले.



पृथ्वीराज चव्हाण
मुख्यमंत्री



अजित पवार
उपमुख्यमंत्री

***अमुचा महाराष्ट्र आघाडीचा - पुरस्कर्ता अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा***

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

*With Best Compliments From*

# A
# well
# Wisher

**बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या शिकागो अधिवेशनाला हार्दिक शुभेच्छा!**

महाराष्ट्र राज्य बँक्स असोसिएशनने सन २००१-२००२ चा
''सर्वोत्कृष्ट नागरी सहकारी बँक'' म्हणून प्रथम पुरस्कार देऊन गौरविलेली आपली बँक!
महाराष्ट्र कला निकेतनचा सन २००६ चा ''महाराष्ट्र गौरव पुरस्कार'' प्राप्त आपली बँक!
इंडियन अचिव्हर्स फोरम, नवी दिल्ली तर्फे सन २००८-०९ चा ''सहकारी बँकींग क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी'बद्दल पुरस्कार!

**२५ वर्षांच्या परंपरेची** (स्थापना १९८४)

# वसई विकास सहकारी बँक लिमिटेड

मुख्य कार्यालय व वसई शाखा : समाज मंदिर, न्यू इंग्लिश स्कूल समोर, ता.पो. वसई, जि. ठाणे, पिन - ४०१२०१
**दूरध्वनी : २३२२६१७ / २३२६९८४ / २३२६९९८ । फॅक्स : २३०१२११**

शाखा विस्तार

**वसई, विरार, नवघर, पालघर, सफाळे, नालासोपारा, बोरिवली, ठाणे**

## -: आमची ठळक वैशिष्ट्ये :-

- ज्येष्ठ नागरिकांना, नोंदणीकृत सहकारी संस्थांना व एकरकमी रु. १५ लाख व अधिक रकमेसाठी ०.५०% व्याजदर.
- विश्वस्त संस्थांच्या तसेच सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या ठेवी स्वीकारल्या जातात.
- रुपये १,००,०००/- पर्यंतच्या ठेवी, ठेव विमा महामंडळाकडून सुरक्षित.
- ग्राहकांच्या सोयीनुसार सकाळ-संध्याकाळ कामाच्या वेळा, विरार व नवघर शाखेत १२ तास अखंडीत सेवा.
- वसई, विरार, नवघर व बोरिवली शाखेत आठवड्याचे सातही दिवस बँकींग सेवा उपलब्ध.
- सर्व शाखांमध्ये संगणकीकृत सेवा व सेफ डिपॉझिट लॉकर्सची सुविधा.
- शेती व उच्च शिक्षणाच्या कर्जासाठी व्याज दरात सवलत.
- सुहाना सफर प्रवासी कर्ज योजना आकर्षक व्याजदार.
- विरार, वसई, नवघर, सफाळे, नालासोपारा, बोरिवली व ठाणे शाखेत ए.टी.एम. सुविधा उपलब्ध.

**कृपया अधिक माहितीसाठी बँकेच्या वेबसाईटवर संपर्क साधावा**

www.vasaivikasbank.com । E-mail : vvsb@vasaivikasbank.com

**''आपला विकास हेच आमचे उद्दिष्ट''**

**प्रभाकर दा. वर्तक**
व्हा. चेअरमन

**दिलीप शां. संत**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**जगदिश आ. राऊत**
चेअरमन

**संचालक मंडळ**

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या शिकागो अधिवेशनाला
हार्दिक शुभेच्छा!



# ना. श्री. राजेंद्र गावीत

राज्यमंत्री, आदिवासी विकास कामगार,
फलोत्पादन, विशेष लाभक्षेत्र, महाराष्ट्र राज्य

With Best Compliments From

RESORT

# SHANTASHIL

the peace of mind







***Our Services...***

*AC Deluxe Rooms & Executive Suites • Swimming Pool & Slide*
*Raindance & DJ • AC Conference Hall*
*Banquet Halls AC & Non-AC • Party Lawns*
*Multi cuisine restaurants • Separate Veg. Non-Veg. Kitchens*
*Indoor Games & Amusement Part*

Pool Naka, Mahim, Kelva Beach Road, Tal. Palghar, Dist. Thane - 401402
Tel.: 02525-222 222 / 333, 645 301 / 302
E-mail : shantashilresort@gmail.com I Website : www.shantashil.com

**Mumbai Off.:** 102, 2C Wing, Shri Ganesh Nagar,
Lalbaug Market, Mumbai - 400012. Tel.: 022-24711311 Mobile : 9969264242

With Best Compliments From

# Treat Resort

for all seasons & for all reasons



**A Unit of TIRUPATI SHELTERS LTD.**

Silvassa Sayli Road, Silvassa - 396230 **Tel.: 0260-2681033 / 2681044 I Fax : 2681066**

**-: Booking Office :-**




206, Aarohi Complex, Beside Rasranjan, Vijay Char Rasta, Navrangpura,
Ahmedabad - 380009 **Tel.: 079-27913204 / 40046284**
**Cell : 9924780001 I Email : treat.ahmedabad@gmail.com**

301, Simran Plaza, 3rd & 4th Road Corner, Khar (W), Mumbai - 400052
**Tel.: 022-42431200-205 I E-mail : mumbai@treatresort.com**

3005, 3rd Floor, Jash Textile Market, Ring Road, Surat - 395002
**Cell : 9824382000 / 9824124900 I E-mail : surat@treatresort.com**

Conference enquiry : E-mail : sunitaparia@treatresort.com
www.treatrerost.com I info@treatresort.com






थेंबा, थेंबात समृध्दीची गाथा
'सुप्रीम' पाईप हाच माझा पाठीराखा
Supreme©
People who know plastics best
• आरोग्य दृष्ट्या सुरक्षित आणि गंधविरहीत
• गंजरोधक
• रासायनिक प्रतिरोधकता
• अडथळा विरहीत प्रवाह
• देखभाल व दुरूस्तीचा खर्च नाही
• आर्थिकदृष्ट्या किफायतशीर
• दीर्घायुषी
एचडीपीई
पाईप्स् आणि फिटींग्ज्
रिजीड पी.व्ही.सी.
पाईप्स् आणि फिटींग्ज्
निर्माता : दि सुप्रीम इंडस्ट्रीज लि.
युनिट नं. ३, गट नं. ४७-४८, गाडेगांव, ता.-जामनेर, जि.-जळगांव. फोन : ०२५७-३०५०५४१,४२,४३,४४ फॅक्स -३०५०६११

RNI NO - 428 / 1987
RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011 POSTED AT MUMBAI PATRIKA CHANNEL STG OFFICE. MBI - 400 001


# महाराष्ट्र हा विद्येचा, उद्योगाचा अन् कृषी वैभवाचा!
# निर्धार करूया, जग जिंकण्याचा!

शेती व शेतकऱ्यांच्या सज्जड बांधिलकीने.
कठोर परिश्रमांनी सिंचित केलेला हा उद्योग व्यवसाय.

**आजमितीस जगात -**

- ठिबक सिंचन, कृषि पाईपांसहीत प्रथम
- टिश्युकल्चर केळी निर्मितीत प्रथम
- आंबा फळप्रक्रियेतही प्रथम
- कांदा व भाजीपाला प्रक्रियेसाठी तिसऱ्यास्थानी

**पुरस्कार व सन्मान -**

क्रॉफर्ड रिड मेमोरिअल अवार्ड (इरिगेशन असोसियशन यु.एस.ए.)
भारताचा जलरक्षक (युनेस्को आणि वेस्ट-नेट-नो)
जगातील सर्वोत्तम ब्ल्यू चिप कंपन्यांना आव्हान देणारे (स्टँडर्ड अँड पुअर)
आशियातील ४००० कोटी रुपयांपर्यंतच्या सर्वोत्तम २०० कंपन्यांमधील मानकरी (फोर्बेस आशिया)
पृथ्वीवरील हरिततंत्र धारक १०० भविष्यवर्ती कंपन्या (ग्लोबल क्लीनटेक आणि दी गार्डियन)
क्लायन्ट लिडरशिप अवार्ड (जागतिक बँक व आय.एफ.सी.)
राष्ट्रीय १४०, राज्यस्तरीय ३४ पुरस्कारांनी सन्मान.

आता थेट सुर्यदेवाच्या भागीदारीसाठी
कटीबद्ध असणारा समाजाभिमुख उद्योग.
एकात्मिकपणे ग्रामिण विकासासाठी
धडपडणारी ही एकमेव संस्था.



## महाराष्ट्रातील शेतक-यांची लाडकी कंपनी

जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.
कल्पना कणापरी. ब्रम्हांडाचा भेद करी.®
जळगाव - महाराष्ट्र - भारत
www.jains.com

प्रकल्प - भारत • अमेरिका • ब्राझील • चिली • पेरू • मेक्सिको • यु. के. • फ्रान्स • स्विझर्लॅन्ड • इटली • रुमानिया • स्पेन • टर्की • इस्त्राईल • तैवान • सिंगापूर • ऑस्ट्रेलिया


'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली'करता इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०० ०३१ येथे छापून ग्रंथाली, द्वारा संडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, दादर (प), मुंबई ४०००२८ येथे प्रकाशित केले.